म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ना.वा
दा. क्र. २८८५
BVBK-0402985

बा.वा.
२९८५
३१।३।९८

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २९८५ दिनांक ३१।३।९८
विषय बा.वा. क्र. ......

# * आधुनिक वेताळकथा *

BVBK-0402985

# * आधुनिक वेताळ कथा *

संदीप भगाडे

अंजनी प्रकाशन, पुणे

प्रकाशिका / सौ. अंजना अ. बुरटे
अंजनी प्रकाशन,
बी १६/८, इंदिरा नगर (लोअर)
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

सर्व हक्क / श्री. संदीप भगाडे, औरंगाबाद

मुखपृष्ठ / श्री. दत्ता वैद्य, पुणे

प्रथमावृत्ती / डिसेंबर, १९९३.

मुद्रक / सौ. मेघा अंबिके
अंबा मुद्रण
८९८, मंगळवार पेठ,
पुणे ४११ ०११.

मूल्य / रुपये तेवीस फक्त.

● या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेत अनुदान मिळाले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या पुस्तकास अनुदान दिलेले असले तरी या पुस्तकातील लेखकाच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

आदरणीय श्री. पु. ल. देशपांडे
यांस स्नेहपूर्वक ...... !

म. सं. सं. ग्रंथ, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. २९८५ दिनांक 3/3/87
विषय का.वा. क्र. ........

# ※ ऋणनिर्देश ※

नवनिर्मिती म्हटलं की, ' नॉर्मली ' नऊ महिने नऊ दिवस हा काळ अपेक्षित असतो. माझ्या ' आधुनिक वेताळकथा ' या कथासंग्रहास निर्मितीवेदना बऱ्याच झाल्या व नऊ वर्ष नऊ महिन्यांनी या कथा पुस्तकरुपानं प्रसिद्ध होत आहेत.

या कथासंग्रहास प्रस्तावना देण्याची विनंती मी श्री. द. मा. मिरासदार यांना केली व त्यांनीही माझ्या विनंतीस मान देऊन माझ्यासारख्या नवोदित लेखकाच्या कथासंग्रहास प्रस्तावना दिल्याबद्दल मी सर्वप्रथम श्री. द. मा. मिरासदार यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

१९८४ साली यातील पहिली कथा दैनिक लोकमतच्या ' रविवार साहित्य जत्रेत ' प्रसिद्ध झाली. मला दैनिक लोकमतचा ' सन्मार्ग ' दाखवण्यापासून तर पुस्तक प्रकाशनात येणाऱ्या प्रत्येक मार्गावर साथ देण्याचं अवघड काम माझे बँकेतील स्नेही व सुप्रसिद्ध सिने–नाट्य कलाकार श्री. पुरुषोत्तम खांबेटीकर यांनी चोख बजावलं आहे. दैनिक लोकमत, औरंगाबादचे संपादक श्री. संतोषभाऊ महाजन व समस्त लोकमत परिवार यांनी वेताळ कथांना दै. लोकमतमध्ये प्रसिद्धी देण्याचं मोलाचं काम केलं आहे. या कथा ' महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेअंतर्गत प्रसिद्धीस पाठविण्यासाठी मराठवाडा विद्यापीठ वृत्तपत्रविद्या विभागाचे श्री. सुधीर गव्हाणे यांची खूप मदत झाली. तसेच सुप्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य श्री. रा. रं. बोराडे, प्रा. वसंत कुंभोजकर यांचेही

वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन लाभले. बँकेतील कर्मचाऱ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून कर्मचाऱ्यांच्या सतत पाठीशी उभे राहणारे स्टेट बँक ऑफ हैद्राबाद कर्मचारी संघटनेचे महाराष्ट्र सचीव, श्री. का. न. थिगळे यांनीही या कामी मला प्रोत्साहन देऊन माझा उत्साह वाढवला.

अंजनी प्रकाशनचे प्रकाशक श्री. बुरटे, अंबा मुद्रणच्या सौ. मेघा अंबिके, मुखपृष्ठकार श्री. दत्ता वैद्य यांनी पुस्तक अतिशय परिश्रमपूर्वक, आकर्षक स्वरूपात तयार केले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सचीव व इतर पदाधिकारी यांचा उल्लेख केल्याशिवाय 'ऋणनिर्देश' पूर्णच होणार नाही. 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'च्या सहकार्यानंच या कथा पुस्तकरूपानं प्रसिद्ध होत आहेत.

उपरिनिर्दीष्ट सर्वांचाच मी मन:पूर्वक अतिशय ऋणी आहे. बँकेतील एक कर्मचारी या नात्यानं ऋण न फेडणाऱ्या 'डिफॉल्टर' लोकांशी नेहमीच संबंध येत असतो. आता अशाच 'डिफॉल्टर' लोकांच्या रांगेत बसायचा माझा विचार आहे. हा कथासंग्रह प्रसिद्ध करण्याच्या कामी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे ज्यांनी सहकार्य केलं त्या सर्वांच्याच मी कायम ऋणात राहू इच्छितो. हे ऋण माझ्याकडून फिटणं केवळ शक्य आहे.

दैनिक लोकमतच्या वाचकांनी या कथांवर मनापासून प्रेम केलं आहे. आशा करतो की, इतर वाचकांनाही त्या निश्चितच आवडतील. या कथासंग्रहात उणीवा असतील, त्या उणिवांची जाणीव ठेवून वाचकांच्या हातात हा कथासंग्रह देत आहे.

प्लॉट नंबर ७, सेक्टर सी-४,
टाऊ सेन्टर, सिडको बसस्टँडच्या मागे,
औरंगाबाद-४३१ ००३.

– संदीप भगाडे

# * वेताळकथांच्या निमित्ताने *

मराठीतील विनोदी साहित्याची निर्मिती या शंभर वर्षातली आहे. प्राचीन मराठी वाङ्मयात हास्यरस दुर्मीळच आहे. भक्ती आणि शृंगार यांनीच सर्व साहित्य-विश्व व्यापलेले दिसते. अपवादात्मक ठिकाणीच विनोद फुललेला आहे. याचे मुख्य कारण विनोदाकडे पाहण्याची समाजाची चुकीची दृष्टी. विनोद म्हणजे आचरटपणा, टारगटपणा. विनोद म्हणजे निंदानालस्ती किंवा टवाळकी असाच अर्थ रूढ झाला होता. म्हणून विद्वत्ता आणि विनोद यांचे फारसे सख्य नव्हते. विनोदाला त्यामुळे समाजात प्रतिष्ठा नव्हती. विनोद ही वास्तव जीवनाकडे पाहणारी एक निर्मळ अशी शक्ती आहे. ही दृष्टी इंग्रजी साहित्यामुळे आपल्याला प्राप्त झाली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे ' सुदाम्याचे पोहे ' हे मराठीतील पहिले विनोदी लेखन. त्यात शुद्ध विनोद तर आहेच, पण शाब्दिक कोटी, कल्पना., चमत्कृती, स्वभावनिष्ठ विनोदाचे नमुने, अतिशयोक्ती हे विनोदाचे विविध प्रकार आहेत. पण त्याचबरोबर उपहास आणि उपरोध (Sative) हेही विनोदाच्या भात्यातील प्रभावी शस्त्र आहे हे कोल्हटकरांनी जाणले आणि आपल्या सामाजिक जीवनातील वेगवेगळ्या अंगांना स्पर्श करणारे उपहासात्मक लेख त्यांनी लिहिले. विडंबनाचाही मार्मिक उपयोग केला. सामाजिक सुधारणेला असे लेखन फार उपयुक्त ठरते, त्यामुळे कोल्हटकरांच्या नंतर अनेक लेखकांनी विनोदी लेखन तर केलेच, पण प्रामुख्याने उपहासात्मक लेखनच केले किंबहुना उपहासात्मक लेखन म्हणजेच विनोद अशीही कित्येकांची समजूत झाली.

● नक

हे सर्व आज आठवण्याचे कारण, मराठवाड्यातील एक तरुण लेखक श्री. संदीप भगाडे यांनी लिहिलेल्या 'आधुनिक वेताळकथा'. जुन्या साहित्यात रंजनात्मक साहित्यही पुष्कळ लिहिले गेले. 'ठकसेन राजपुत्राच्या गोष्टी' 'गुलबकावली' यासारख्या पुस्तकांबरोबर 'वेताळ पंचविशी', 'लखू चाळिशी' 'सिंहासन बत्तिशी', 'शुक बहात्तरी' अशी पुस्तके म्हणजे मनोरंजनाबरोबरच नीतीबोध यांचे खजिनेच असत. 'वेताळ पंचविशी'मध्ये वेताळ आणि राजा विक्रमादित्य यांच्या संभाषणाचे चतुर नाट्य आहे. त्यात अद्‌भुतताही आहे आणि सामान्य माणसाला उपयुक्त ठरणारा बोधवादही आहे. 'भोजराजा आणि कालिदास', 'बिरबल आणि बादशहा' यांच्या गोष्टी म्हणजे चातुर्यकथा आहेत. हे सर्व लेखन जुन्या मराठी साहित्याचा एक उत्तम नमुना म्हणून आजही वाचनीय आहे.

'वेताळ पंचविशी'मध्ये वेताळ विक्रमादित्याला निरनिराळ्या रंजक गोष्टींच्या रूपाने दर वेळेस एक कूट प्रश्न टाकतो आणि विक्रमादित्य त्याची मार्मिक उत्तरे देतो. याच पद्धतीचा उपयोग करून श्री. संदीप भगाडे यांनी आधुनिक वेताळकथा लिहिल्या आहेत. या सर्व कथातही वेताळ समाजजीवनातील वेगवेगळे प्रश्न विचारतो आहे आणि चक्रमादित्य राजा त्याची उत्तरे देत आहे. सर्व संदर्भ अर्थातच आपल्या आजच्या सामाजिक जीवनातले आहेत. आपले आजचे समाज-जीवन अनेक दोषांनी बरबटलेले दिसते. त्यात स्वाभिमानशून्य सरकारी नोकर आहेत. सिनामाचे वेड लागलेले 'फिल्माळलेले जग' आहे. केवळ परीक्षेतील मार्कांच्या पाठीमागे लागलेली 'मार्क्सवादी मुले' आहेत. कॅपिटेशन फी घेऊन केवळ धंदेवाईक पद्धतीने डॉक्टर आणि इंजिनीअर्स तयार करणारे 'कॉलेज' नावाचे कारखाने आहेत. बेजबाबदार कारभार करणारी महापालिका आहे. बँकांचा आडमुठेपणा आहे. सर्वत्र पसरलेली जाहिरातबाजीची साथ आहे. नाणे टंचाई आहे. फार काय, दादा कोंडके आणि अमिताभ बच्चन यांचेही महात्म्य आहे. थोडक्यात आजच्या अधोगतीला गेलेल्या समाज जीवनाचा हा आरसाच आहे. या समाजजीवनाचेच उपहासात्मक दर्शन लेखकाने घडवले आहे.

या वेताळकथांत आजच्या महाविद्यालयीन जीवनाचे चित्रण येते. ब्यूटी पार्लरचे माजलेले स्तोम येते आणि हुंडाबळीचेही दर्शन घडते. या आधुनिक वेताळकथांतील वेताळ सर्वत्र भ्रमण करणारा आहे. खेड्यापासून महानगरापर्यंत त्याचा सर्वत्र संचार दिसतो त्याचे निरीक्षण अत्यंत सूक्ष्म आणि मार्मिक आहे. आणि म्हणूनच तो नेमके, मर्माघाती प्रश्न चक्रमादित्य राजाला विचारतो राजाही त्याची यथायोग्य उत्तरे देतो. श्री. संदीप भगाडे यांनी उपहासाने केलेले हे समाज-चत्रण अत्युक्तीचे किंवा चुकीचे आहे असे कोण म्हणू शकेल ?

या उपहासात्मक विनोदी लेखनात एकच दोष मला जाणवला. वेताळाचा प्रश्न आणि राजाचे उत्तर हे सर्व प्रदीर्घ आणि व्याख्यानवजा झाले आहे. प्रत्येक कथेत ही दोन स्वतंत्र व्याख्यानेच वाटतात. मूळ वेताळ पंचविशीत या सर्व कथा आणि त्यांची उत्तरे फार मुद्देसूद रीतीने आणि पाल्हाळ न लावता येतात. त्यामुळे त्या चटकदार आणि वाचनीय झाल्या आहेत. कोठल्याच लेखनाला–विशेषत: विनोदी लेखनाला–पाल्हाळ मानवत नाही. त्यामुळे त्या लेखनाची वाचनीयता हळूहळू कमी होते. कलेच्या क्षेत्रात सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे संयम. हा संयम ठेवला गेला नाही तर त्या कलेचे सौंदर्य तितक्या प्रमाणात कमी होते. संगीत कलेबद्दल बोलताना एक वृद्ध तपस्वी गायक एकदा म्हणाले,

" गाणे हे नेमकं, जेवढयास तेवढे असावे लागते. ते थोडे जास्त झाले तरी खूप जास्ती होते. थोडे कमी झाले तरी खूप कमी होते. "

त्या तपस्वी गवयांनी संगीत कलेबद्दल जो नियम सांगितला, तो खरं तर कुठल्याही कलेच्या बाबतीत खरा आहे. साहित्याच्या क्षेत्रातही तो तितकाच सत्य आहे. ललित स्वरूपाचे लेखन हे जास्तीही वाटता कामा नये आणि कमीही वाटता कामा नये. विशेषत: पाल्हाळ हा विनोदाला वर्ज्यच आहे. शब्दांचा मितव्यय ही लेखनाच्या क्षेत्रातली महत्त्वाची गोष्ट आहे. संयम हा कलेचा प्राण असतो, असे मी जे वर म्हटले ते या अर्थाने. या आधुनिक वेताळ कथांत हा एक प्रामुख्याने दोष वाटतो. लेखकाची भाषाशैली आणि त्याचे सूक्ष्म निरीक्षण, शाब्दिक कोटघा यांनी अनेक ठिकाणी हा पाल्हाळही रुचकर झाला आहे हे खरे. त्यामुळे या लेखनाची वाचनीयता कायम राहिली आहे हेही मान्य केले पाहिजे.

विनोदी लेखनाच्या क्षेत्रात श्री. भगाडे हे नव्यानेच या पुस्तकाच्या रूपाने प्रवेश करीत आहेत. त्यांचा वाङ्मयाचा अभ्यास चांगला आहे. चित्रपटसृष्टीचाही आहे. इतकेच नव्हे तर एकूण समाज जीवनाचे त्यांचे अवलोकन मार्मिक आहे. आजच्या सामाजिक जीवनातील व्यंगावर त्यांनी नेमके बोट ठेवले आहे. इतकेच नव्हे तर गंभीर चिंतनही केले आहे. यापुढील त्यांची लेखनाच्या क्षेत्रातील वाटचाल अधिकाधिक यशस्वी होत जाईल, असा दिलासा देणारे हे त्यांचे लेखन आहे. मी त्यांना सुयश चिंतितो.

–द. मा. मिरासदार

हे सर्व आज आठवण्याचे कारण, मराठवाड्यातील एक तरुण लेखक श्री. संदीप भगाडे यांनी लिहिलेल्या 'आधुनिक वेताळकथा'. जुन्या साहित्यात रंजनात्मक साहित्यही पुष्कळ लिहिले गेले. 'ठकसेन राजपुत्राच्या गोष्टी' 'गुलबकावली' यासारख्या पुस्तकांबरोबर 'वेताळ पंचविशी', 'लखू चाळिशी' 'सिंहासन बत्तिशी', 'शुक बहात्तरी' अशी पुस्तके म्हणजे मनोरंजनाबरोबरच नीतीबोध यांचे खजिनेच असत. 'वेताळ पंचविशी'मध्ये वेताळ आणि राजा विक्रमादित्य यांच्या संभाषणाचे चतुर नाट्य आहे. त्यात अद्भुतताही आहे आणि सामान्य माणसाला उपयुक्त ठरणारा बोधवादही आहे. 'भोजराजा आणि कालिदास', 'बिरबल आणि बादशहा' यांच्या गोष्टी म्हणजे चातुर्यकथा आहेत. हे सर्व लेखन जुन्या मराठी साहित्याचा एक उत्तम नमुना म्हणून आजही वाचनीय आहे.

'वेताळ पंचविशी'मध्ये वेताळ विक्रमादित्याला निरनिराळ्या रंजक गोष्टींच्या रूपाने दर वेळेस एक कूट प्रश्न टाकतो आणि विक्रमादित्य त्याची मार्मिक उत्तरे देतो. याच पद्धतीचा उपयोग करून श्री. संदीप भगाडे यांनी आधुनिक वेताळकथा लिहिल्या आहेत. या सर्व कथातही वेताळ समाजजीवनातील वेगवेगळे प्रश्न विचारतो आहे आणि चक्रमादित्य राजा त्याची उत्तरे देत आहे. सर्व संदर्भ अर्थातच आपल्या आजच्या सामाजिक जीवनातले आहेत. आपले आजचे समाज-जीवन अनेक दोषांनी बरबटलेले दिसते. त्यात स्वाभिमानशून्य सरकारी नोकर आहेत. सिनामाचे वेड लागलेले 'फिल्माळलेले जग' आहे. केवळ परीक्षेतील मार्कांच्या पाठीमागे लागलेली 'मार्क्सवादी मुले' आहेत. कॅपिटेशन फी घेऊन केवळ धंदेवाईक पद्धतीने डॉक्टर आणि इंजिनीअर्स तयार करणारे 'कॉलेज' नावाचे कारखाने आहेत. बेजबाबदार कारभार करणारी महापालिका आहे. बँकांचा आडमुठेपणा आहे. सर्वत्र पसरलेली जाहिरातबाजीची साथ आहे. नाणे टंचाई आहे. फार काय, दादा कोंडके आणि अमिताभ बच्चन यांचेही महात्म्य आहे. थोडक्यात आजच्या अधोगतीला गेलेल्या समाज जीवनाचा हा आरसाच आहे. या समाजजीवनाचेच उपहासात्मक दर्शन लेखकाने घडवले आहे.

या वेताळकथांत आजच्या महाविद्यालयीन जीवनाचे चित्रण येते. ब्यूटी पार्लरचे माजलेले स्तोम येते आणि हुंडाबळीचेही दर्शन घडते. या आधुनिक वेताळकथांतील वेताळ सर्वत्र भ्रमण करणारा आहे. खेड्यापासून महानगरापर्यंत त्याचा सर्वत्र संचार दिसतो त्याचे निरीक्षण अत्यंत सूक्ष्म आणि मार्मिक आहे. आणि म्हणूनच तो नेमके, मर्माघाती प्रश्न चक्रमादित्य राजाला विचारतो राजाही त्याची यथायोग्य उत्तरे देतो. श्री. संदीप भगाडे यांनी उपहासाने केलेले हे समाज-चत्रण अत्युक्तीचे किंवा चुकीचे आहे असे कोण म्हणू शकेल ?

या उपहासात्मक विनोदी लेखनात एकच दोष मला जाणवला. वेताळाचा प्रश्न आणि राजाचे उत्तर हे सर्व प्रदीर्घ आणि व्याख्यानवजा झाले आहे. प्रत्येक कथेत ही दोन स्वतंत्र व्याख्यानेच वाटतात. मूळ वेताळ पंचविशीत या सर्व कथा आणि त्यांची उत्तरे फार मुद्देसूद रीतीने आणि पाल्हाळ न लावता येतात. त्यामुळे त्या चटकदार आणि वाचनीय झाल्या आहेत. कोठल्याच लेखनाला-विशेषतः विनोदी लेखनाला-पाल्हाळ मानवत नाही. त्यामुळे त्या लेखनाची वाचनीयता हळूहळू कमी होते. कलेच्या क्षेत्रात सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे संयम. हा संयम ठेवला गेला नाही तर त्या कलेचे सौंदर्य तितक्या प्रमाणात कमी होते. संगीत कलेबद्दल बोलताना एक वृद्ध तपस्वी गायक एकदा म्हणाले,

" गाणे हे नेमकं, जेवढ्यास तेवढे असावे लागते. ते थोडे जास्त झाले तरी खूप जास्ती होते. थोडे कमी झाले तरी खूप कमी होते. "

त्या तपस्वी गवयांनी संगीत कलेबद्दल जो नियम सांगितला, तो खरं तर कुठल्याही कलेच्या बाबतीत खरा आहे. साहित्याच्या क्षेत्रातही तो तितकाच सत्य आहे. ललित स्वरूपाचे लेखन हे जास्तीही वाटता कामा नये आणि कमीही वाटता कामा नये. विशेषतः पाल्हाळ हा विनोदाला वर्ज्यच आहे. शब्दांचा मितव्यय ही लेखनाच्या क्षेत्रातली महत्त्वाची गोष्ट आहे. संयम हा कलेचा प्राण असतो, असे मी जे वर म्हटले ते या अर्थाने. या आधुनिक वेताळ कथांत हा एक प्रामुख्याने दोष वाटतो. लेखकाची भाषाशैली आणि त्याचे सूक्ष्म निरीक्षण, शाब्दिक कोट्या यांनी अनेक ठिकाणी हा पाल्हाळही रुचकर झाला आहे हे खरे. त्यामुळे या लेखनाची वाचनीयता कायम राहिली आहे हेही मान्य केले पाहिजे.

विनोदी लेखनाच्या क्षेत्रात श्री. भगाडे हे नव्यानेच या पुस्तकाच्या रूपाने प्रवेश करीत आहेत. त्यांचा वाङ्मयाचा अभ्यास चांगला आहे. चित्रपटसृष्टीचाही आहे. इतकेच नव्हे तर एकूण समाज जीवनाचे त्यांचे अवलोकन मार्मिक आहे. आजच्या सामाजिक जीवनातील व्यंगावर त्यांनी नेमके बोट ठेवले आहे. इतकेच नव्हे तर गंभीर चिंतनही केले आहे. यापुढील त्यांची लेखनाच्या क्षेत्रातील वाटचाल अधिकाधिक यशस्वी होत जाईल, असा दिलासा देणारे हे त्यांचे लेखन आहे. मी त्यांना सुयश चिंतितो.

**—द. मा. मिरासदार**

# ❋ अनुक्रम ❋


१. कपिलवस्तू नगरीत / १
२. आधुनिक सिकंदर / ४
३. आर्य चाणक्याच्या टायची गाठ / ७
४. कारकुनी चक्रम कथा / ९
५. फिल्माळलेले / १२
६. डॉ. कात्रे / १६
७. लहान लहान मुले / १९
८. मारूतीचे अश्रू / २२.
९. हाफपँटवाला दादा / २६
१०. नियोजनाचे प्रयोजन / ३१
११. चिल्लर खुर्दा / ३६
१२. बहुगुणी अमिताब / ४०
१३. अल्लड बालिका आणि महापालिका / ४३
१४. सोळावं वरीस बँकांचं / ४७
१५. जाहिरातबाजी / ५१
१६. कॉलेज : एक चिंतन / ५६
१७. चलेती फिरती शायरी / ६०
१८. मार्क्सवादी मुले / ६६
१९. ज्योतिषाचे भविष्य / ७१
२०. सरकारी फिल्मस् / ७६
२१. रस्त्यावरची वरात / ८१
२२. ब्युटी पार्लर / ८६
२३. माय मरो मावशी जगो / ९१
२४. थँक्यू मि. गॉड / ९७
२५. दि एन्ड / १०२

# १.

## * कपिलवस्तू नगरीत *

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. तेव्हा प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला," राजा, माझ्या जुन्या गोष्टी ऐकून तू कंटाळलेला दिसतोस. तुला या चालू जमान्यातील तितक्याच 'चालू' गोष्टी सांगतो. फार फार वर्षांपूर्वी इतिहास घडविण्याचं (आणि बिघडविण्याचं) काम थोर थोर माणसं करीत होती. 'तो आला, त्यानं पाहिले, त्याने जिंकले.' असे वर्णन असणारी, अशक्य हा शब्द शब्दकोशात नसणारी, हिंदवी किंवा अन्य धर्मिय स्वराज्यासाठी तलवार गाजवणारी ही सर्व मंडळी जुनीच. सातवाहनकालीन इतिहास, शिवकालीन इतिहास तसाच आजचा हा कारकूनकालीन इतिहास. तूर्त तलवारी जाऊन त्याची जागा बॉलपेनने घेतली आहे. 'पुराने जमानेमे जब जवान बेटा घरसे बाहर निकलता था, तब बडे लोग उसके हाथमे तलवार दिया करते थे, आजकल हाथमे पेन देते है, क्यों की इस जमानेमे पेनसेही लढा जा सकता है.' हा कडक डायलॉग मी नुकतंच ब्लॅक तिकिट घेऊन पाहिलेल्या एका चित्रपटातील आहे तेव्हा राजा, आता अधिक पाल्हाळ न लावता तुला कारकूनकालीन इतिहासातील सुरस आणि चमत्कारिक कथा सांगतो.

कपिलवस्तू नगरीतील नोकरीसाठी मुलाखत द्यायला गेलेल्या तरुणाची ही कथा तुला खूप आवडेल. तीच सर्वप्रथम मी तुला सांगतो. कपिलवस्तू नगरीतला एक तरुण ऑटोरिक्षात बसून कोठल्यातरी नोकरीसाठी इंटरव्ह्यू द्यायला चालला

होता. जाता जाता त्याला एक म्हातारा मनुष्य दिसला. काठी टेकीत तो कसाबसा चालला होता. मधूनच दचकत तो स्वत:जवळची कागदपत्रे चाचपडत होता. त्या तरुणाला आश्चर्य वाटले. अशा अवस्थेत असलेला मनुष्य त्यानं कधी पाहिला नव्हता त्याने चौकशी केली. तेव्हा ऑटोवाला म्हणाला, "हा पेन्शनर मनुष्य आहे. पेन्शनरांची अशीच अवस्था होते." तरुणाला वाईट वाटले. तो विचार करत होता. ऑटोरिक्षा पुढे जात होती. दुसऱ्या प्रसंगी एक मनुष्य रस्त्याच्या कडेला तळमळत पडलेला त्याला दिसला. त्या माणसाला कोठलासा ऑक्युपेशनल डिसीज झाला होता. कापूस गिरणीत आयुष्यभर काम केल्यामुळे फुप्फुसात कापसाचे बारीक बारीक तंतू अडकले होते. त्यामुळे तो माणूस खोक खोक खोकत होता. असा माणूस पाहून तरुणाला धक्का बसला. त्याच्या मनात विचारांचे वादळ उठले तिसऱ्या प्रसंगी एक प्रेतयात्रा येताना त्याच्या दृष्टीस पडली. तीजबरोबर चाललेले लोक दु:खाने आक्रोश करीत होते. त्यांचे रडणे त्या तरुणाला ऐकवेना. तो उदास झाला. त्याने ऑटोरिक्षावाल्यास विचारले, "मी हे काय पाहतो आहे !"

ऑटोवाला म्हणाला, "साहेब, हा मृत इसम एका कंपनीत मॅनेजर होता तो 'ऑन ड्यूटी' म्हणजे ड्युटीवर असताना मेला असं त्याच्या नातेवाईकांचं म्हणणं आहे. पण कोर्टात ते तसं सिद्ध करू शकले नाहीत. त्यामुळे 'ऑन ड्यूटी' डेथ झाल्याबद्दलचे कॉम्पेनसेशन त्यांना मिळालं नाही. त्यांच्या आक्रोशाचं मुख्य कारण हेच." ऑटोवाल्याचे हे शब्द ऐकून तरुणाला मोठा धक्का बसला. त्याला चैन पडेना. तो घरी परतला, विचार करीत राहिला. मन:शांतीसाठी जंगलात गेला. दिव्य ज्ञानप्राप्तीसाठी एका मोठ्या झाडाखाली बसला. तोच फॉरेस्ट रेंजरने त्याच्या बखोटयाला धरत, "साब, ये लडका लकडी चुराने आया था." असा ऐहिक आरोप करत, तरुणाच्या पारमार्थिक विचारांना पायदळी तुडवत फॉरेस्ट ऑफिसरसमोर उभा केला. फॉरेस्ट ऑफिसरने तरुणाच्या राहणीमानावरून खिशाचं आकारमान ताडलं व खास ठेवणीतल्या शिव्या देऊन हाकलून लावलं.

येथवर गोष्ट सांगून वेताळ म्हणाला, "राजा, सरकारी नोकरीत प्रचंड गैरव्यवहार असताना, पदोपदी मानहानी होत असतानासुद्धा कथेतल्या या तरुणानं मग नोकरीच्या मागे न लागता स्वतंत्र धंदा का नाही उभारला ? या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू सत्तारूढ पक्षाच्या मंत्र्याप्रमाणे उत्तर द्यायची टाळाटाळ केल्यास तुझ्या डोक्याची शंभर शकले होऊन तुझ्याच पायावर लोळू लागतील."

चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा ! स्वत:चा धंदा वगैरे सुरू करणं हे माझ्यासारख्या लोकांनाच शक्य आहे. त्या तरुणाला ते शक्य असतं तर तो नोकरीकडे

वळलाच नसता. नोकरशाहीत पदोपदी मानहानी होते, आपले सत्त्व, आपले विचार हे आपल्याच बामनात ठेवावे लागतात. स्वतःचे असे काही खास विचार नसणं हेच नोकरशाहीत भूषण मानलं जातं. स्वाभिमान वगैरे बाजूला ठेवून 'इमाने–इतबारे' जो चाकरी करेल त्याचीच या जमान्यात चलती आहे."

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा होऊन असंख्य कारकून दिवसभर वावरतात त्या सचिवालयाच्या टोलेजंग इमारती समोरील विजेच्या खांबाला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# २.

## ※ आधुनिक सिकंदर ※

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले आणि नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला,

" राजा, मागल्या खेपेला तू कपिलवस्तू नगरीतील मुलाखतीला जाणाऱ्या तरुणाची कथा ऐकली त्यावेळी तू स्वाभिमान वगैरे बाजूला ठेवून, इमाने-इतबारे जो चाकरी करील त्याचीच या जमान्यात चलती आहे असे म्हणाला होतास, तुझ्या वाक्याचा खरेपणा जाणून घ्यायला मी निरनिराळ्या सरकारी, निमसरकारी, गैरसरकारी ऑफिसेसला सरप्राईज व्हिजिटस् दिल्या. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सरप्राईज व्हिजिटस् बुमरँगसारख्या त्यांच्यावरच उलटतात. कनिष्ठांना वरिष्ठ अमुक अमुक दिवशी, अमुक अमुक वेळी सरप्राईज व्हिजिटस् देणार आहेत, हे किमान आठवडाभर माहीत असतं. मग ते चहा-पानाची जय्यत तयारी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच सरप्राईज करतात. माझ्या बाबतीत तसं काही होण्याचा संभव नव्हता. एक तर मी वेताळ आहे, माणूस नव्हे. दुसरं म्हणजे 'सुपरमॅन' ज्याप्रमाणे उडू शकतो, नुसतंच उडू शकत नाही तर अदृश्यही होऊ शकतो. याबाबतीत मी माझा प्रतिस्पर्धी आजचा सुप्रसिद्ध 'सुपरमॅन' यालाही मागे टाकलं. हं, तर सांगायचा मुद्दा असा की, मी अदृश्य होऊन ऑफिसमधील सिलिंग फॅनच्या दांड्याला उलटा जाऊन लोंबकळायचो. तर कधी व्हेंटीलेटरला चिपकून आतली गंमत बघायचो. अदृश्य होऊ शकत असल्यामुळे बॉसपासून प्यूनपर्यंत कोणाऱ्याही

बाजूला उभं राहून निरीक्षण करायचो. या निरीक्षणात मला तुझ्या वाक्याची सत्यता पटली. मी निराश होऊन परतणार–तेवढ्यात–राजा, नाईलाजास्तव नोकरीकडे वळूनसुद्धा स्वत:चा स्वाभिमान शाबूत ठेवणाऱ्या एका कनिष्ठ कारकुनाची म्हणजे एल. डी. सी. ची कथा तुला निश्चितच आवडेल. तीच मी आता तुला सांगतो." असे म्हणून वेताळ सांगू लागला.

"कोठल्याशा गव्हर्नमेंट ऑफिसमधील एका डिपार्टमेंटमध्ये असंख्य कारकून मंडळी खर्डेघाशीत गुंतली होती. कारकुनीचा कळकट्ट अर्क कोळून प्यायलेल्या एका खेडूत हेडक्लार्कचा त्या सर्वांवर एकछत्री अंमल होता. निरनिराळ्या डिपार्टमेंट-मधील कारकून मंडळींना त्याने सतावले होते. 'मला सारं जग जिंकायचंय' या सिकंदरी थाटात तो 'मला ऑफिसमधील साऱ्या डिपार्टमेंटसूना सतवायचंय' अशी फुशारकी मारी. त्यासाठी तो विनाकारण हाताखालील मंडळींना फायर करी.

त्या दिवशीही तसंच झालं. एका नव्यानंच आलेल्या कनिष्ठ कारकुनाला तो झापू लागला. "तुमच्यासारख्यांना कसं वागवावं काही कळत नाही." नेहमी प्रमाणे हेडक्लार्क निर्वाणीचं बोलला अन् त्या नव्या कारकुनानं 'पोरसच्या' बाणेदारपणे उत्तर दिलं. "तुम्ही गव्हर्नमेंट सर्व्हंट, मीही गव्हर्नमेंट सर्व्हंट तेव्हा तुम्ही मला गव्हर्नमेंट सर्व्हंटप्रमाणेच वागवा." कनिष्ठ कारकुनाचे हे बाणेदार उत्तर ऐकून हेडक्लार्क खजील झाला. त्याने कनिष्ठ कारकुनाला आपल्या फुटक्या कपातील अर्धा कप चहा दिला. आपल्या अठ्ठावीस वर्षांच्या सर्व्हिसमध्ये हेडक्लार्कने कधी कोणाला चहा पाजल्याचे स्मरत नाही, अशी शपथेवर डिपार्टमेंटची जुनी, जाणती मंडळी सांगू लागली. पुढे हेडक्लार्कने आपला निर्धार बदलला व स्वेच्छेने निवृत्त झाला."

येथवर गोष्ट सांगून वेताळ म्हणाला, "राजा, जर एक नव्यानं आलेला कनिष्ठ कारकून हेडक्लार्कला त्याची योग्य जागा दाखवू शकतो तर मग इतरांना ते का शक्य झालं नाही? या प्रश्नाचे उत्तर माहीत असूनही रात्री उशिरा येणाऱ्या नवऱ्यांसारखी तू उत्तर द्यायची टाळाटाळ केल्यास तुझ्या डोक्याची शंभर शकले होऊन तुझ्याच पायांवर लोळू लागतील."

चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, त्या हेडक्लार्कला वठणीवर आणणं इतरांना जमलं नाही याचं कारण म्हणजे सरकारी नोकरीत वरिष्ठ अधिकारी कधी चुकत नसतो हे प्रथमपासून मनावर बिंबवलेलं असतं. शिवाय इंग्रजांनी येथे एक कायमचा अल्पसंतुष्ट वर्ग निर्माण करून ठेवला आहे. पोटार्थी म्हणून आलेल्या या मंडळींना छातीचा अभिमान नसतो. मुकी बिचारी जनावरं, कुणीही कशीही हाका,

हे या बोलक्या जनावरांच्या बाबतीतही लागू पडतं. फक्त नव्यानं आलेला कनिष्ठ कारकून या सर्व गोष्टींना अपवाद होता, तो स्पष्टवक्ता होता म्हणूनच त्याला ते जमलं."

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा होऊन जेथे असंख्य कारकून दिवसभर वावरतात त्या सचिवालयाच्या इमारती-समोरील इलेक्ट्रिकच्या खांबाला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# ३.

## ❋ आर्य चाणक्यच्या टायची गाठ ❋

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. तेव्हा प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला,

" राजा, स्पष्टवक्तेपणाचा बराचवेळा उलटाच प्रत्यय येतो. नोकरीत तर हमखास. स्पष्टवक्तेपणामुळे नंदकुमार नावाच्या एका कारकुनावर कोसळलेल्या संकटांची कथा तुला नक्कीच आवडेल. तीच मी आता तुला सांगतो. असंच एक सरकारी ऑफिसमधील सेक्शन. आता सेक्शन म्हटल्यावर एक ऑफिसर, कारकून, टायपिस्ट, पट्टेवाला ही मंडळी ओघाने आलीच. आपला कथानायक नंदकुमार हा तिथला कारकून. मिस् पिंकी परेरा नावाची मॉड अन् गोड छोकरी तिथली टायपिस्ट, हरीभाऊ तिथला चपराशी अन् येळकोट्टम हा नुकतंच प्रमोशन मिळून 'बॉस' झालेला. निव्वळ सिनियॉरिटीच्या भरवशावर चढलेला. येळकोट्टम हा अत्यंत लटपटचा अन् खटपटचा माणूस. शेवटी प्रमोशन पदरात पाडूनच घेतलं. प्रमोशन मिळाल्याच्या पहिल्याच दिवशी येळकोट्टम आपल्या मूळ मल्लखांबी रंगाला न शोभणारा भडक रंगाचा सफारी व त्यावर कुत्र्याच्या गळ्यात पट्टा बांधावा तसा टॉय बांधून आला. त्याचे ते ' सुंदर ते ध्यान ' पाहून पिंकी परेरा लिपस्टीक पुसणार नाही याची दक्षता घेत बेतातच पण कुचेष्ठेने हसली. हरीभाऊ तंबाखू थुंकायचं निमित्त करून बाहेर जाऊन मनसोक्त हसून आला. स्पष्टवक्ता नंदकुमारचं काम नुसतं हसण्यावरच भागलं नाही, त्यानं तोंडानं कॉमेंट्री सुरू ठेवत येळकोट्टम-

साहेबांना टाय कसा बांधायचा त्याचं प्रात्यक्षिक करून दाखवलं. अन् इथेच येळकोट्टम भडकला. अरे, वरिष्ठ अधिकारी कधी चुकतो का ? मग ते फाईल पेंडिंग ठेवण्याचं अति महत्त्वाचं सरकारी काम असो, की टायची गाठ बांधण्यासारखं गैर–सरकारी काम असो. वरचा साहेब म्हटला की, तो बरोबरच आहे असंच समजून चालायचं.? पण नंदकुमार या सर्व गोष्टींबद्दल अनभिज्ञ होता. शिवाय पिंकी परेरासारखी टंच टंककुट्टीका कुचेष्टेने हसली, हे शल्य येळकोट्टमला बोचतच होतं. त्यात पिंकी परेराचं अन् नंदकुमारचं अलिकडेच सूत जमत असल्याचं येळकोट्टमला हरीभाऊच्या ' थ्रू ' कळलं होतं. झाले मग काय, येळकोट्टमनं रागाच्या भरात ' नंदकुमारची ट्रान्सफर केल्याशिवाय टायची गाठ बांधणार नाही. ' अशी आर्य चाणाक्य थाटाची प्रतिज्ञा मनातल्या मनात केली. मूळ खटपट्या स्वभावाला स्मरून त्यानं नंदकुमारची बदली मनुष्याच्या प्राथमिक गरजा मोठ्या मुश्किलीने पूर्ण होतील अशा एका खेड्यात केली. बिचाऱ्या नंदकुमाराच्या ऑफिसातील मंडळी मग कुजबुजू लागली. पिंकी परेराचं काय ? तिला एक नाही दहा बॉयफ्रेंडस् मिळतील पण तिच्या हसण्यानं बिचाऱ्या नंदकुमारचा नाहक बळी गेला."

कोणता प्रश्न विचारावा हेच वेताळाला सुचेना. शेवटी, ' राजा, मी तुला कोणता प्रश्न विचारू ? अन् त्या प्रश्नाचं उत्तर माहीत असून तू न दिल्यास तुझ्या डोक्याची शंभर शकले होऊन तुझ्या पायाशी लोळू लागतील ' अशी धमकी वेताळ देणार होता. पण असं काही केल्यास आपणात आणि कथेतील त्या अधिकाऱ्यात काय फरक असा सूज्ञ विचार करून वेताळ म्हणाला, " राजा, नोकरशाहीतील साहेब लोकांच्या वर्तनाबद्दल तुला काय वाटतं ? "

चक्रमादित्य म्हणाला, " खरोखरच वेताळा ! अरे राजेशाहीतील आमचं वर्तन एवढं बेगुमान नसतं, जेवढं की नोकरशाहीत या लोकांचं आहे. " अशाप्रकारे राजाचं मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व सचिवालयाच्या टोलेजंग इमारतीसमोरील विजेच्या खांबाला लोंबकळू लागला.

□ □

# ४.

## ❊ कारकुनी चक्रम कथा ❊

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टॅंडकडे चालू लागला. तेव्हा प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला, " राजा मागच्या रविवारी तू नंदकुमार नावाच्या कारकुनाची कथा ऐकलीस त्या कथेत टायपिस्टची अन् तिच्या बॉयफ्रेंडची ताटातूट करून तिची तात्पुरती गैरसोय केली आहे. खाजगी कंपन्यांमध्ये तर टाईपरायटर-प्रमाणेच टाइपिस्टही आपली खाजगी मालमत्ता असल्याचं समजून टाईपरायटर-प्रमाणेच तिच्या बटणांशी चाळा...आता सांगायलाही मला लाज वाटते. पण आता तू कथेची फर्माईश केलीच आहे म्हणून सांगतो...

एका मोठ्या खाजगी कंपनीचं मुंबईतलं आलिशान ऑफिस. तिथली वरिष्ठ मंडळी बहुतेक बिगरमराठी. हो, ' शिवा ' नावाचा एक मराठा मर्द ' पट्टेवाला ' म्हणून तिथं चाकरी करत होता. दिवसभर वरच्या मंडळीच्या शिव्या खाल्ल्या की या शिवाला आपण छत्रपतींच्या वंशातील आहोत याची विनाकारण आठवण होई व त्याचंच त्याला राहून राहून वाईट वाटे. ज्याच्या पूर्वजांनी अटकेपार झेंडे लावलेत त्याने नोकरशाहीचे दंडे खावेत, काय हा दैवदुर्विलास ! शहेनशहाच्या तंबूवरचे कळस बेधडक कापून आणणाऱ्यांच्या वंशजाला साहेबांसाठी पान, सिगारेट आणावी लागे. तर असा हा शूरवीर फावल्या वेळात इस्टूलावर बसून आरामात विडीचे झुरके घेत रहस्यकथा वाचत बसायचा. रहस्यकथेचा नायक खुनी इसमाच्या शोधार्थ मोहिमेवर असताना, याला न सापडणाऱ्या फाईलच्या

शोधार्थ मोहिमेवर जावे लागे. नाईलाजास्तव पुस्तक बंद करून हे महाशय 'इस्टूला'वरून उठायचे. फाईल सापडली की, बॉसच्या केबिनमध्ये अदबीने ठेवायचे. तिथं नुकतीच आत आलेली तंग अन् तोकड्या कपड्यातील 'स्टेनो-कम-टायपिस्ट' थोडा वेळ सरसावून बसायची.

पण त्या दिवशी शिवाची पूर्ण रहस्यकथा वाचून झाली तरी स्टेनो-कम-टायपिस्ट काही केबिनबाहेर आलीच नाही. काय रहस्य आहे हे जाणून घ्यायला आपला हा चतुर रहस्यकथा वाचक उठला. केबिनच्या फटीतून डोळे किलकिले करून त्याने पाहिले. अन् डिक्टेशनचा एक अजब नमुना त्याला पाहायला मिळाला. शिवा अडाणी असला तरी ऑफिसच्या कोणत्याही कामात एकमेकांना अगदी घट्ट बिलगून बसण्याची गरज नसते एवढं त्याला 'ठाव' होतं. मराठी बाण्याला जागून त्यानं 'सायेब, हे जे काय चाललंय ते बरोबर नाय' असं खडसावलं. त्याचा साहेब म्हणजे कॉन्व्हेंट संस्कृतीत वाढलेला तरणाबांड पोरगा होता. त्यानं शिवाला आपल्या मायबोली इंग्रजीत फर्रेदार फायर केलं. त्यातलं सगळंच जरी शिवाला कळलं नाही तरी 'रहना है तो रहो नही तो जाव भाडमें' हे देशी वाक्य कळलं. अपमानित शिवा केबिनबाहेर आला. 'ईस्टुला'वर बसला. मग जर्दा तंबाखू हातावर चोळून त्याचा फर्स्टक्लास बोकणा भरला व "अशीच आम्ही गेलो असतो कॉनवेंटमंदी, आम्हीही बिलगून बसलो असतो केबिनमंदी." ही स्वयंस्फूर्त कविता गुणगुणत केबीनच्या दरवाजावर जळजळीत कटाक्ष टाकून बसल्या जागेवर मान तिरपी करून एक जोरदार पिंक टाकली. पुढं शिवा शहाणा झाला. कॉन्व्हेंटवाला अन् स्टेनो कम टायपिस्ट 'केबीन'मंदी असताना आत कधीच गेला नाही." येथवर गोष्ट सांगून वेताळ म्हणाला,

"पण राजा, शिवासारख्या बाणेदार माणसानं या प्रकाराला विरोध का केला नाही? कर्तृत्ववान पूर्वजांचे हे असे वंशज? या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही..." त्याला मध्येच थांबवत राजा म्हणाला, " वेताळ, कादरखानासारखा तोच तोच डायलॉग रिपीट करू नकोस. तुझ्या प्रश्नाचं उत्तर मी देतो. शिवा हा कदाचित महाराष्ट्रातील एका दुष्काळी खेड्यातून मुंबईला नशीब अजमावयाला येणाऱ्या लोंढ्यामधला एक असावा. संपामुळे गिरण्या बंद. मग चिकटला कोठेतरी. कालांतराने संसारी बनला. आपल्या बाणेदारपणामुळे आप्त-स्वकीयांची आबाळ होऊ नाही म्हणून बाणेदारपणा गुंडाळून ठेवला असावा. यात शिवाचं काही चुकलं असं मला वाटत नाही. अल्पसंतुष्टांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व नोकरशाहीची पाळंमुळं खोलवर रुजत आहेत. इंग्रजांनी लावलेलं हे झाड वेडंवाकडं वाढतंच आहे."

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व जेथे असंख्य कारकून दिवसभर वावरतात त्या सचिवालयाच्या टोलेजंग इमारतीसमोरील इलेक्ट्रिकच्या खांबाला लोंबकळू लागला.

□ □

शोधार्थ मोहिमेवर जावे लागे. नाईलाजास्तव पुस्तक बंद करून हे महाशय 'इस्टूला'वरून उठायचे. फाईल सापडली की, बॉसच्या केबिनमध्ये अदबीने ठेवायचे. तिथं नुकतीच आत आलेली तंग अन् तोकड्या कपड्यातील 'स्टेनो-कम-टायपिस्ट' थोडा वेळ सरसावून बसायची.

पण त्या दिवशी शिवाची पूर्ण रहस्यकथा वाचून झाली तरी स्टेनो-कम-टायपिस्ट काही केबिनबाहेर आलीच नाही. काय रहस्य आहे हे जाणून घ्यायला आपला हा चतुर रहस्यकथा वाचक उठला. केबिनच्या फटीतून डोळे किलकिले करून त्याने पाहिले. अन् डिक्टेशनचा एक अजब नमुना त्याला पाहायला मिळाला. शिवा अडाणी असला तरी ऑफिसच्या कोणत्याही कामात एकमेकांना अगदी घट्ट बिलगून बसण्याची गरज नसते एवढं त्याला 'ठाव' होतं. मराठी बाण्याला जागून त्यानं 'सायेब, हे जे काय चाललंय ते बरोबर नाय' असं खडसावलं. त्याचा साहेब म्हणजे कॉन्व्हेंट संस्कृतीत वाढलेला तरणाबांड पोरगा होता. त्यानं शिवाला आपल्या मायबोली इंग्रजीत फर्रेदार फायर केलं. त्यातलं सगळंच जरी शिवाला कळलं नाही तरी 'रहना है तो रहो नही तो जाव भाडमें' हे देशी वाक्य कळलं. अपमानित शिवा केबिनबाहेर आला. 'ईस्टुला'वर बसला. मग जर्दा तंबाखू हातावर चोळून त्याचा फर्स्टक्लास बोकणा भरला व "अशेच आम्ही गेलो असतो कॉनवेंटमंदी, आम्हीही बिलगून बसलो असतो केबिनमंदी." ही स्वयंस्फूर्त कविता गुणगुणत केबीनच्या दरवाजावर जळजळीत कटाक्ष टाकून बसल्या जागेवर मान तिरपी करून एक जोरदार पिंक टाकली. पुढं शिवा शहाणा झाला. कॉन्व्हेंटवाला अन् स्टेनो कम टायपिस्ट 'केबीन'मंदी असताना आत कधीच गेला नाही." येथवर गोष्ट सांगून वेताळ म्हणाला,

"पण राजा, शिवासारख्या बाणेदार माणसानं या प्रकाराला विरोध का केला नाही? कर्तृत्ववान पूर्वजांचे हे असे वंशज? या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही..." त्याला मध्येच थांबवत राजा म्हणाला, "वेताळ, कादरखानासारखा तोच तोच डायलॉग रिपीट करू नकोस. तुझ्या प्रश्नाचं उत्तर मी देतो. शिवा हा कदाचित महाराष्ट्रातील एका दुष्काळी खेड्यातून मुंबईला नशीब अजमावयाला येणाऱ्या लोंढ्यामधला एक असावा. संपामुळे गिरण्या बंद. मग चिकटला कोठेतरी. कालांतराने संसारी बनला. आपल्या बाणेदारपणामुळे आत्म-स्वकीयांची आबाळ होऊ नाही म्हणून बाणेदारपणा गुंडाळून ठेवला असावा. यात शिवाचं काही चुकलं असं मला वाटत नाही. अल्पसंतुष्टांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व नोकरशाहीची पाळंमुळं खोलवर रुजत आहेत. इंग्रजांनी लावलेलं हे झाड वेडंवाकडं वाढतंच आहे."

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व जेथे असंख्य कारकून दिवसभर वावरतात त्या सचिवालयाच्या टोलेजंग इमारतीसमोरील इलेक्ट्रिकच्या खांबाला लोंबकळू लागला.

☐ ☐

# ५.

## ✱ फिल्माळलेले ✱

विक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले आणि नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. तेव्हा प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला, " राजा, गेला महिनाभर तू ऑफिसच्या रूक्ष वातावरणातील मजेदार कथा ऐकत होतास. आता एखाद्या ' लाईट सब्जेक्ट 'वर बोलू.

' हिंदी सिनेमा ' हा विषय शेपटी पिरगळायला कसा मस्त आहे. राजा भारत हा कृषिप्रधान देश आहे, असं आपण ऐकलं होतं. अगदी परवा परवापर्यंत मलाही ते खरंच वाटायचं. ती कृषिप्रधानता पाहायला मी ' बाभूळखेडा ' नावाच्या एका खेड्यात गेलो. तिथं भल्या पहाटेच हातात लोटा अन् तोंडात कडुनिंबाची काडी धरून दोन शेतकरीदादा चालले होते. त्यातल्या एकानं दुसऱ्याला विचारलं, " काय रं हणम्या, मोहित्यांची शेवंता डिट्टो बो डेरेकवानी दिसते नाही ? " ' पचाक् ' संमतदर्शक मान हलवत हणम्या थुंकला. आता हीं बो डेरेक कोण ? तर टारझन फेम एरॉटिक ॲटव्हेंचर्सवाली. या शेतकरीदादाकडून मला एकाधिकार कापूस खरेदी योजना ही काय भानगड आहे ते समजावून घ्यायचं होतं, पण त्या एकाधिकार योजनेऐवजी त्या दोन्ही शेतकरीदादांनी प्रातर्विधीसाठी अवघडलेल्या अवस्थेतही ' दाक्षिणात्य नट्यांची हिंदी चित्रपटसृष्टीतील एकाधिकारशाही ' या विषयावर लेक्चर दिले. आता बाभूळखेडा – लोकसंख्या अंदाजे एक हजार. या असल्या गावातल्या लोकांचा ' जनरल अवेअरनेस ' एवढा वाढण्याचं मुख्य कारण

म्हणजे व्हिडिओ. गावात 'यष्टी' पोहचायच्या आधीच व्हिडिओ पोहचला. पूर्वी व्हिडिओ म्हणजे 'व्हिलेज डेव्हलपमेंट ऑफिसर.' कधीमधी मटन–मुर्गीचा आस्वाद घ्यायला खेडयात चकरा मारायचा. त्या डेव्हलपमेंट ऑफिसरला साध्य न झालेली डेव्हलपमेंट व्हिडिओनं करून दाखविली. कोणी सांगावं? आजची खेडयातली पहाट ही जात्यावरच्या ओवीनं न उजाडता कॅसेटवरच्या 'झ...झ झोपडीमें च... च...चारपाई' या गाण्याने उजाडत असावी. खेडयात हे झाले तर मग शहरात काय असावं?

राजा, तुला तर माहीतच आहे की, तुझ्या खांद्यावरून सुटका झाल्यावर मी दिवसभर सामान्य माणूस म्हणून वावरतो. मध्यरात्री परत खांबाला लोंबकळू लागतो. सकाळी परत ड्यूटीवर. तर सांगायची गोष्ट अशी की, त्या दिवशी सकाळी सामान्य माणूस बनून मी केश कर्तनालयात गेलो. कटिंगवाल्याने अत्यंत सावधपणे माझ्या बेसावधपणाचा फायदा घेऊन फस्सकन् पाण्याचा फवारा तोंडावर उडवला. 'नाकात पाणी गेलं' अशी तक्रार केल्यावर तो माझ्या नाकावरून सरळ श्रीदेवीच्या नाकावर घसरला. "सायेब, तुमी श्रीदेवीच नाक पायलं का?" त्यानं 'नकारार्थी' प्रश्न विचारला. खरं सांगायचं तर सगळेच जिथं पाहतात तिथंच मीही पाहतो. पण ह्या न्हाव्याला ही जाहीर वाच्यता कशाला हवी? "साहेब, श्रीदेवीच्या नाकावर प्लॅस्टिक सर्जरी केली आहे. कोणत्याच हिरोला ती नाकाला हात लावू देत नाही. तुमी पायलं कधी, इव्हन अमिताभनं डेअरिंग करून तिच्या नाकाला हात लावल्याचं? नशीलच पायलं." आता इतर 'प्रेक्षणीय' ठिकाणी पाहिल्यावर माणूस नाकाकडे कशाला पाहणार? पण या हजामत्याला कोण सांगणार की, बाबारे, श्रीदेवीच्या नाकाच्या बाबतीत कशाला विनाकारण नाक खुपसतोस? पण जिथं हे लोक शंभर टक्के फिलमाळलेले आहेत, तिथं हे असंच होणार. शेवटी 'अकलमंदी'नं डोकं वापरून मी न्हाव्याच्या तावडीतून माझं डोकं सोडवलं.

साधं किराणावाल्याकडे काही वस्तू घ्यायला जावं तर तराजूच्या एका पारडयात जणू श्रीदेवी व दुसरीकडे जयाप्रदा बसली आहे, असं समजून दोघींच्या सौंदर्याचं मूल्यमापन करीत वस्तूचं वजन चाललेलं असतं. "काही म्हणा, श्रीदेवी टॉपवर आहे आज." मूठभर शेंगदाणे पारडयातून काढले. "पण जयाप्रदा मॅच्युअर्ड वाटते." पंचवीस ग्रॅमचं वजन दुसऱ्या पारडयात पडलं. "पण श्रीदेवीचा चार्म तिच्यात नाही." परत शेंगदाणे काढले. "जयाप्रदा म्हणजे टिपिकल हाऊसवाईफ साला, हाऊस वाईफ असावी तर अशी." परत पंचवीस ग्रॅमचं वजन दुसऱ्या पारडयात पडलं असं त्याचं मूल्यमापन चालू असताना ज्वारीच्या पोत्याच्या बाजूला बसलेलं साधारण भरलेल्या पोत्याच्याचं आकाराचं किराणावाल्याचं

'कुटुंब' उठून उभं राहिलं अन् 'हाऊसवाईफ'बद्दल बोलणारी त्याची जीभ एकदाची थांबली.

म्हटलं, या फिल्माळलेल्या लोकांपासून आपला म्हातारा पानवाला रशीद-मिया अलिप्त असेल म्हणून पान घ्यायला त्याच्याकडे गेलो. पण पानापेक्षा हा – "कुछ भी बोलो, मगर युसुफभाईकी अदाकरी लाजवाब है" हेच जास्त रंगवत बसला. आजच्या सुपरस्टारची अन् दिलीपकुमारची तुलना करण्याच्या नादात मसाला पान खाणाऱ्या गिऱ्हाईकाला गुलकंदाऐवजी तेवढाच अस्मानतारा टाकून भर दुपारी अस्मानातले तारे पाहायला लावले. बऱ्याच वेळापासून नुकतंच मिसरूड फुटलेलं अन् हनुवटीवर किंचित दाढी वाढविलेलं एक किरटं पोरगं जळत्या सिगारेटकडे 'गम मे डुबा हुआ' फिल्मी हिरो जसा पाहतो तसा पाहत उभा होता. रशीदमियानं खुलासा केला, "सलमा आगा हिंदुस्थान छोडके जा रही है, इस गम मे है बेचारा!"

घरी जायला गल्लीच्या तोंडाशी आलो तर क्रिकेट खेळणाऱ्या पोरांपैकी एक पोरगं ओरडलं, "काका, ऑल राऊंडर कुमार गौरवच्या हातून रती अग्निहोत्रीचा कॅच सुटल . रती सध्या बेडरेस्ट घेत आहे." तुम्हाला तिला भेटायचं असेल तर भेटा एवढंच म्हणायचं राहिलं होतं. यावर काय बोलणार? काहीतरी पोक्तपणे विचारायचं म्हणून विचारलं – "अरे, काय हे केसांचे हाल केलेत? तेलबील लावत जा जरा." त्यावर 'यू फूल' असा चेहरा करून पाहात ते पोरगं म्हणालं, "तुम्ही 'फिल्म फेअर' वगैरे वाचत नाहीत असं दिसतं. कुमार गौरव खोबरेल तेल वापरीत नाही. म्हणून लव्ह स्टोरीत पाहा, त्याचे केस कसे मस्त..." पुढच ऐकायला मी तिथं थांबलो नाही.

पोरासोरांचं एक सोडा हो. पण ऑफिसमध्येही तेच. आमचा नाना तिरळया तो 'तिरळा' आहे म्हणून त्याला ते नाव सन्मानपूर्वक बहाल केलंय. या नान्याच म्हणणं आहे की, "केसाच्या बटीवरून नटी ओळखावी." आपली तेवढी स्टडी नाही.

एकदा गहन-गंभीर विचार करीत नान्या मला म्हणाला, "रतीच्या ओठावर उजवीकडे तीळ आहे की, डावीकडे रे? आपल्याला उजवीकडे दिसतो अन् रती म्हणजे पडदा आपल्या उलटया बाजूला असतो. म्हणजे तीळ डावीकडेच असावा." मी माझं सायंटिफिक डोकं वापरत उत्तर दिलं. "तो उजवीकडे असावा." नान्याचं समाधान झालं नव्हतं. मग आपले टायपिंग थांबवून टायपिस्टही, "खरं सांगायचे तर उजवीकडे नाही आणि डावीकडेही नाही. इटस् आर्टीफीशियल. आजकाल काय कृत्रिमरित्या डिंपल म्हणजे गालावरची खळीसुद्धा पाडून मिळते." अशी

जनरल नॉलेजमध्ये भर टाकून,पर्समधून लिपस्टिक काढून ओष्ट आणि गोष्ट दोन्हीही रंगवू लागली.

आमचा 'बॉस' 'एच. एम. व्ही. के. सुंदरबंदरम्' कामाच्या बाबतीत एकदम खडूस. पण 'हेमामालिनी' हा विषय निघाला की, एकदम पाघळतो. 'हेमा' आपल्याच गावाकडची आहे, असं लाजत लाजत त्यानं मला एकदा सांगितलं होतं. हेमामालिनीनं अन् यान लहानपणी एकाच वाटीतला सांबार ओरपला असल्याच्या थाटात तो 'हेमा'च्या गप्पा सांगतो. ('हेमा' हा शॉटफॉर्म त्याचाच. स्वतःचं नाव मात्र बदराच्या शेपटीसारखं लांबलचक.)

तर असं आहे राजा, आजचं हे फिल्माळलेलं जग. राजा, लोक एवढे फिल्माळलेले का आहेत? या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू न दिल्यास तुला आतापर्यंतचे सर्व सुपर फ्लॉप हिंदी सिनेमे पाहावे लागतील."

"नको वेताळा, एवढी भयानक शिक्षा नको देऊस. मी तुझ्या प्रश्नाचं उत्तर देतो. हिंदी सिनेमा हे आपल्याकडचं स्वस्त आणि मस्त मनोरंजन. विदेशातून ही कला आपण आत्मसात केली. पण त्यांनाही या क्षेत्रात आपण मागं टाकलं. मी हे क्वॉन्टिटीच्या संदर्भात बोलतोय. क्वालिटीच्या नव्हे. तिकडे मनोरंजनासाठी साधनं बरीच आहेत. हे ॲडव्हेंचर्स 'जॉन बुल' किंवा 'अंकल सॅम' एखाद्या नावेत बसून वल्हवत राहतील नाहीतर स्वतःच्या कारमधून भटकून येतील. भारतीय खिशाला ते परवडणारं नसतं. ट्रेकिंग, ग्लायडिंग आपल्या प्रकृतीला मानवत नाही, डेटींग, बेटिंग संस्कृतीला पटत नाही, आपल्याकडे पाच लाखाच्या शहरात डझनभर चित्रपटगृहे सहज सापडतात. पण स्विमिंग पूल किंवा टेनिस कोर्ट आढळलाच तर सामान्यांनी दूर राहावं याच अपेक्षेनं तो बांधलेला असतो. 'नाटक' तसं पाहिलं तर चित्रपटाचा मोठा भाऊ पण लहान्याच्या जन्मानंतर मोठ्याचं कौतुक ओसरलं. मला तर नाटक म्हणजे खेड्यात राहून शेती करणाऱ्या मोठ्या भावासारखं व सिनेमा म्हणजे शहरात राहून कुशलतेनं स्वतःचा बिझिनेस सांभाळणाऱ्या लहान भावासारखा वाटतो. तूर्त या लहान भावावर लोक फिदा आहेत. म्हणून ते फिल्माळलेले आहेत."

अशाप्रकारे राजाचं मौन भंग होताच प्रेतातील वेताळ नाहीसा झाला व अंजली टॉकीजसमोरील खांबाला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# ६.

## ❋ डॉ. कात्रे ❋

चक्रमादित्यानं आपला हट्ट सोडला नाही. तो अंजली टॉकीजसमोरील इलेक्ट्रीकच्या खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले आणि नेहमीप्रमाणे मौन होऊन बस स्टँडकडे चालू लागला. तेव्हा प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला, " राजा, सारख इकडे तिकडे लोंबकळून माझ्या हाताला कळ लागली होती, म्हणून मी हॉस्पिटलमध्ये ' इलाज ' करण्यासाठी (नाईलाजास्तव) गेलो. तिथं एक डॉक्टर ऑपरेशन थिएटरच्या बाहेर आले. कपाळावरचा घाम पुसला, खिशात रुमाल शोधू लागले पण रुमाल सापडेना. " अरेच्या ! ऑपरेशनला आलेल्या पेशंटच्या पोटात राहिला वाटतं. जाऊ द्या." डॉक्टर स्वतःशीच पुटपुटले व माझ्याकडे वळून म्हणाले, " जरा तुमचा रुमाल दाखवा बघू." रुमाल देत मी विचारले, " रुमाल खरोखरच पेशंटच्या पोटात विसरलात वाटतं डॉक्टर ?" " हे तर काहीच नाही." डॉक्टर महोदय कपाळावरचा घाम पुसत म्हणाले, " मागच्या खेपेला तर मी सबंध कात्रीच एका पेशंट महिलेच्या पोटात विसरून गेली होती. " " मग ? पुढं काय ?" आता घाम पुसायची पाळी माझी होती. " मग काय ? चार सहा महिन्यांनी पोटात दुखायला लागल्यावर येतात परत एक्स रे काढायला. दुसरं काय ?" असं म्हणत माझा रुमाल नीट घडी करून स्वतःच्या खिशात कोंबून डॉक्टर महोदय निघाले अन् कधी नव्हे तो ' डॉक्टर ' या प्राण्याबद्दल मी सिरीअसली विचार करू लागलो.

वरील रुमाल व कात्री पेशंटच्या पोटातं विसरणं हे प्रकार विनोदी

या सदरात मोडणारे असले तरी ते प्रत्यक्ष घडलेले असल्यामुळे त्यात गांभिर्याचाच भाग अधिक आहे. वर्तमानपत्रात असल्या बातम्या वाचून मन सुन्न होते. या बिचाऱ्या पेशंट महिलेचे काय झालं असेल ? तारक म्हणून ज्याच्याकडे मोठ्या आशेने पहावं तोच डॉक्टर मारक निघावा ! चुका सर्वांकडून होतात, पण वैद्यकीय पेशात त्या अक्षम्य ठरतात अपवादानेच असा एखादा डॉक्टर कात्रे निघतो व सर्व एम. बी. बी. एस्. पाटयांना काळा रंग फासून जातो. गाडी चालवताना ड्रायव्हरला डुलकी लागू नये अशी समस्त प्रवाशांची इच्छा असते. कारकुनांनीही कार्यालयीन कामकाजाच्या वेळात 'डुलकी' घेऊ नये अशी माफक इच्छा असतेच. पण ड्रायव्हरबाबूची डुलकी अन् दप्तरबाबूची डुलकी यात पहिल्याची डुलकी मृत्यूच्या खाईत लोटू शकते म्हणून जास्त घातक. तसंच एखादा कविमनाचा पायलट कल्पनेच्या भराऱ्या मारत वास्तवाचं भान न ठेवता इंधन संपेपर्यंत विमान चालवतच राहिला तर बिचाऱ्या प्रवाशांचे काय हाल होतील ? म्हणूनच डॉक्टर, इंजिनिअर, पायलट यांसारख्या व्यवसायाकरिता 'खास निवडक' असेच लोक हवेत.

पण 'कॅपिटेशन फी' नामक भयानक प्रकारानं आपल्या या कल्पनेला सुरुंग लावला. पोराच्या प्रोग्रेस बुकापेक्षा बापाच्या पासबुकास जास्त महत्त्व आलं. महाराष्ट्र सरकारजवळ वैद्यकीय महाविद्यालये उभारण्यासाठी लागणारी साधारण वीस पंचवीस कोटी रुपयांची रक्कम नसल्यामुळे महाराष्ट्र सरकारने खाजगी संस्थांच्या महाविद्यालयांस परवानगी दिली. इतका पैसा साखर कारखानदारांकडे असल्यामुळे 'नाईलास्तव हे 'मेडीकल कॉलीज' उघडायला निघाले. झॅक, साखर कारखाना उभारावा त्याच धर्तीवर मेडिकल कॉलीज उभारले जाईल. मग 'प्रत्येक पोत्यामागे किती पैसे कमिशन भेटताहेत' असा विचार करणारा मेंदू 'प्रत्येक पोरामागे किती पैसे कमिशन भेटल' याचा विचार करू लागला असेल. यात साखर कारखानदारच नव्हेत तर साखरेप्रमाणेच 'गोड' धंद्यात हात गुंतलेली मंडळीही हात धुऊन घेतील. थोडक्यात 'पैसेवाल्यांनी पैसेवाल्यांकरता चालवलेली कॉलेजेस' असंच या कॉलेजांचं स्वरूप राहील." येथवर आपली व्यथा सांगून वेताळ म्हणाला, "राजा, या कॅपिटेशन फीबद्दल तुझं मत काय? त्या-विरुद्ध डॉक्टर संपावर गेले होते. ते बरोबर होतं का ? इतर नोकरीवाले खेड्यात जायची टाळाटाळ करतात, मग डॉक्टरांनीच खेड्यात जावं असं का वाटतं ? या सर्व प्रश्नांची उत्तरे माहीत असूनही तू न दिल्यास तुला कॅपिटेशन फीद्वारे तयार झालेल्या 'डागदरबाबुंकडे' मेडिकल चेकअप करता जावं लागेल."

यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा ! एकदम एवढे प्रश्न विचारू नकोस. मी एक एक करून उत्तर देतो डॉक्टरांनी खेड्यांत जावं वगैरे जे सामान्य लोकांना

वाटतं ते यासाठी की, मुळात 'डॉक्टर' या शब्दातच ठासून आदर भरला आहे. समाजातलं त्याचं स्थान अढळ आहे. इतर व्यावसायिकांपेक्षा डॉक्टरांकडून समाजाच्या अपेक्षा निराळ्या असतात. आणि एकदा का अपेक्षाभंग झाला की मग साबुदाण्याच्या पुड्या बांधणारा किराणावाला व 'साबुदाणा साईज' गोळ्या विकणारे डॉक्टर दोघंही एकाच रांगेत बसतील. आता तुझ्या दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर, डॉक्टरांनी संपावर जावं का ? या डॉक्टरांनी संपावर जाऊन सर्वसामान्य जनतेची सहानुभूती गमावू नये, कारण एवढंच की, भांडण सरकारशी अन् त्रास रोग्यांना हा प्रकार बरोबर नव्हे. रोग्याला अॅलोपॅथी लागू पडेल की होमिओपॅथी हे डॉक्टरांनीच ठरवावं. पण त्या आधी एक गोष्ट लक्षात ठेवावी की या अॅलोपॅथी व होमिओपॅथीच्या आधीही एका 'पॅथीची' रोग्याला गरज असते अन् ती म्हणजे 'सिम्पॅथी' ही सिम्पॅथी डॉक्टरांनी रोग्यांप्रती जरूर दाखवावी.

डॉक्टरांचा संप व रोग्यांचे झालेले हाल या सर्वांच्या मुळाशी आहे कॅपिटेशन फीवर चालणारी कॉलेजेस. सरकारला सध्या 'निवडणूक ज्वर' झालेला आहे असं सामान्य माणसं कुजबुजतात. मागे मुख्यमंत्र्यांनी "महाराष्ट्रातील मुलांनी निव्वळ कारकुनीच करायची काय ?" असा खडा सवाल टाकून अभियांत्रिकी विद्यालयांना परवानगी दिली. आता मेडिकल कॉलेजचं खूळ डोक्यात भरलंय. शहरात अनेक 'निरोगी' डॉक्टर असताना पुन्हा शहरातच डॉक्टरांची गर्दी वाढेल. स्वखुषीने खेड्यात जायला तयार होणाऱ्या मूठभर डॉक्टरांसाठी खास सोयी-सवलती उपलब्ध नाहीत. निव्वळ राजकारण खेळण्यासाठी हे सर्व चाललंय. महाराष्ट्रातील मुलांच्या भल्यासाठी हे चाललंय असाही देखावा केला जात आहे. महाराष्ट्रातल्या 'कोणत्या' मुलांना याचा फायदा होणार आहे हे लवकरच लोकांना कळेल. खास 'आपली माणसं' कॉलेजमध्ये नेमली जातील. कॅपिटेशन फीद्वारे आलेली लक्ष्मी निवडणुकीच्या जुगारात उधळली जाईल. राज्याच्या निवडणुका आल्या की, 'सन ऑफ सॉईल' या विचाराला खतपाणी घालायचं. दिल्लीत जायची वेळ आल्यास राष्ट्रीय एकात्मतेचा नारा लावायचा. असल्या बनवाबनवीतून बनलेल्या बनेल 'डॉक्टर कात्रेकडे' जायला पेशंटची छातीही 'बनलेली' हवी."

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच, प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा होऊन 'सोमाजी गोमाजी कापसे मेडिकल कॉलेज' या पाटीला जाऊन लोंबकळू लागला,

□ □

# ७.

## * लान लान मुले *

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो 'सोमाजी गोमाजी मेडिकल कॉलेज' अशी पाटी असलेल्या खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले आणि नेहमीप्रमाणे मौन होऊन, बसस्टॅंडकडे चालू लागला. तेव्हा प्रेतात असलेला वेताळ म्हणाला, " राजा मागच्या रविवारी तू डॉ. कात्रेला भेटलास. त्या महापुरुषानंतर आता आपण वळू ते लहान मुलांकडे. लहानांबद्दल असं काय बोलण्यासारखं असतं असा विचार करत असशील पण खरं सांगायचं तर लहानांच्याही काही कथा आहेत, व्यथा आहेत.

परवा मी एका हॉटेलात गेलो. तिथं तीन लहान मुली आल्या. असतील पाच-सहा वर्षांच्या. त्यांच्यातल्या एका पिटुकलीनं गल्ल्यावरच्या शेठला विचारलं, " शेठ हमको सिर्फ पानी पिना है, पानी पिनेके पैसे लगते क्या ? " तिच्या बोलण्यानं सेठ ओशाळला. " बेटी सिर्फ पानीके कैसे पैसे लगेंगे ? " असे म्हणत त्याने पाणी मागवले. " नही, पहलेही पुछ लिया तो अच्छा, नही तो बादमे मागेंगे. " पुन्हा मघाचीच बिटुकली चिवचिवली.

खरोखरच आजकाल लहान मुलांनाही व्यवहार, दिवसेंदिवस वाढणारी स्पर्धा, पैशाचे महत्त्व वगैरे बऱ्याच सटर-फटर गोष्टी नको त्या वयात कळू लागल्या आहेत. कदाचित कोण्या मोठ्या माणसांकडून तिनं 'दाम करी काम' किंवा 'पैशाशिवाय पान हलत नाही' वगैरे सुभाषितं ऐकली असावीत, असा विचार

करीत मी बसस्टॉपपाशी थांबलो. तिथं एक कॉन्व्हेंट-कन्यका, " मैं हूं अभी कमसीन, कमसीन, जानू ना कुछबीन, राते जवानीकी... " हे गाणं, गळणारी वॉटर बॅग व शरीराला न पेलणारं अवघड दप्तर यांना सांभाळण्याची सर्कस करत म्हणत होती. या लालीपॉप चोखणाऱ्या मुखातून 'राते जवानीकी' वगैरे ओळी ऐकून अवघडल्यासारखं झालं. आणि लहान मुलांमध्ये सदासर्वदा रमणाऱ्या त्या कोण्या गुरुजीला मी त्रिवार वंदन केलं, त्या गुरुजीनंच लहान मुलांचं मनोरंजन करणाऱ्यांचं एकदम प्रभूशी नातं जोडलं आहे. बहुधा लहान मुलेच असे वेळी-अवेळी आपलं मनोरंजन (?) करतात. त्यामुळे आपण त्यांचे मनोरंजन वगैरे करण्याचा उलटा प्रयत्न केला की, त्यांनी भोकाड पसरलेलं, हे ठरलंच म्हणून समजा. लहान मुलांकृत मनोरंजनाचा मम्मी-पप्पांना विशेष आवडलेला प्रकार म्हणजे मुलांकडून सिनेमाचे डॉयलॉग म्हणवून घेणे. मम्मी पप्पू किंवा चिंटूला डॉयलॉगची 'आग्रही' फर्माइश करते. ईलॅस्टीकची चड्डी एका हाताने सावरत मग हा पप्पू 'माई के लाल' पासून सुरू होणारा लंबाचौडा डॉयलॉग सुनावतो. त्या चार भिंतीच्या आत अवघडलेल्या वातावरणात लहान मुलांच्या तोंडून निघालेले 'बहेन की इज्जतपे' वगैरे शब्द कानांना खटकतात. पेल्यातलं सरबत संपेपर्यंत असले डॉयलॉग ऐकावेच लागतात. 'हुस्न की कत्तल' या चित्रपटातला तो डॉयलॉग असल्याची मम्मी माहिती पुरवते. नव्या हिंदी चित्रपटांशी माझं सूत जमणं कठीण. शेवटी मुलाच्या पाठांतराचं कौतुक करून तेथून मी सटकतो.

बिचारी लहान मुलं ! सकाळी उठलं की लोडेड दप्तर घेऊन शाळेत जातात. चौदा-पंधरा विषयांचा अभ्यास एकदम करतात. त्यामुळे त्यांना मॅथ्स–सायन्स डिफीकल्ट जातं. हिस्ट्री–जॉग्रफी समजत नाही व लँगवेजेस बोअर होतात अपवादात्मक एखाद–दुसराच हुशार निघतो. पण सर्वसामान्यांची काय कथा ? असे शाळेचे अति कंटाळवाणे सहा दिवस काढल्यावर 'संडे' येतो. आई–वडिलांबरोबर मग हे छोटे जीव पिक्चरला जातात. छोट्या मुलांना मोठ्या माणसांचे नवे हिंदी चित्रपट खूप आवडतात. अर्थात त्या चित्रपटांची बौद्धीक पातळी छोट्यांलायकच असते हा भाग निराळा. सिनेमाहून परतताना फिल्म इंडस्ट्रीबद्दल ऐकलेल्या गप्पा ते आई-बाबांना सुनावतात पोराची या क्षेत्रातील प्रगती पाहून वडील आश्चर्यचकित होतात तर आई पोराच्या 'ब्रिलियन्सी'वर खूष असते. संडे संपतो, परत रटाळ शाळेचे दिवस येतात. ते संपले की पुन्हा संडे, पुन्हा शाळा. वर्षानुवर्षं हेच चालतं. मग बाल्यावस्था वयाच्या हिशोबानी व निसर्ग नियमानं संपते. पण अभ्यासाबद्दल कडवटपणा व सटर-फटर गोष्टींमधली गोडी काही जात नाही एका अर्थशून्य जीवनाला मग सुरुवात होते. नवल वाटतं ते त्या लोकांचं. जे पोरांना वयाच्या सहाव्या–सातव्या वर्षी पोहणं, ज्युडो–कराटे वगैरेंचं

प्रशिक्षण देतात. उत्तमोत्तम पुस्तकं वाचून घेतात. मग पुढे यातूनच वयाच्या चौदाव्या वर्षीच ऑलिंपिकमध्ये चमक दाखवून जगाला थक्क करणारी 'नादीया' निघते. टीन-एजमध्ये अॅथलेटीक्स – जिम्नॅस्टीकमध्ये पदक पटकावणारे निघतात. राजा, या चांगल्या गोष्टी भारतात घडू शकत नाही काय? किती दिवस आम्ही स्वतःची निंदा व परक्यांची स्तुती करत राहणार? मुले म्हणजे मातीचे गोळे, आकार द्याल तसे वळतील हे आम्हाला ठाऊक असूनही त्यांना आकार देण्याचा प्रयत्न का होत नाही? या सर्व प्रश्नांची उत्तरे माहीत असूनही तू न दिल्यास तुला लहान मुलांसाठी लिहिलेली बडबडगीते पाठ करावी लागतील."

"वेताळा, मघाशी फार गंभीरपणे तू डॉयलॉगवाल्या पप्पूची गोष्ट सांगितलीस. पण निव्वळ पोपटपंची म्हणून तो तसले डॉयलॉग म्हणतो. नक्कल करणे, पाठ करणे, हा लहानांचा स्वभावधर्म जे दिसेल त्याची नक्कल करतात. ऐकतील ते पाठ करतात. आता हेच पाहाना – बाबांनी ठेवलेली स्कूटर एखादा बाळचा नकळत पळवतो. मस्तपैकी चक्कर मारून येतो. पण या सर्व गोष्टी तो बाबांना कळू न देण्याची खबरदारी घेतो. त्याला लहान वयानच स्पिडो मिटरची वायर कशी काढायची व कुठे बसवायची हे कळतं. त्याच्या बाबांपेक्षा बऱ्याच वेळा स्कूटरमधलं त्यालाच अधिक कळतं. पण स्पिडो मिटरची वायर व्यवस्थित बसवणाऱ्या बाळयाला शिक्षण दिलं जातं ते संस्कृत प्रत्यय व धातू बरोबर वापरण्याचे. त्याची त्याला अजिबात आवड नसते. पासिंग मार्क्स गाईड वगैरेंचं सहाय्य घेऊन तो मिळवतो. पण आवड नसलेल्या गोष्टी मोठ्यांच्या सक्तीमुळे लहानांना कराव्याच लागतात.

बोर्गनं वयाच्या नवव्या वर्षी रॅकेट हातात घेतली, म्हणूनच तो पाच वेळा विम्बल्डन जिंकू शकला. आपल्याकडेही सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर, अमृतराज बंधू, पी. टी. उषा वगैरे मंडळी लहानपणापासून योग्य मार्गदर्शन मिळाल्याने त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात अग्रेसर आहेत. इतर चांगल्या गोष्टींप्रमाणे या गोष्टींनासुद्धा भारतात यायला वेळ लागेल, पण येतील हे नक्कीच. अर्थात अज्ञानी लहान मुलांना आपलं हित–अहित कळत नसतं, त्यामुळं लहानांना हाताळणाऱ्या मोठ्यांनीच या गोष्टींचा सर्वंकश विचार करावा." अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहिसा होऊन 'शिशु विकास बालक मंदिरा'च्या पाटीला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# ८.

## * मारूतीचे अश्रू *

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो 'शिशु विकास बालक मंदिरा 'जवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन, बस स्टँडकडे चालू लागला. तेव्हा प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला, " राजा! नुकतीच मी पेपरात एक बातमी वाचली. नांदेडमध्ये देवळातला एक मारुती दोन दिवस रडत होता म्हणे ! भाविकांनी मारुती आपल्यावर नाराज आहे असं समजून भक्तीचे नेहमीचेच पोरखेळ केले. काही 'नतभ्रष्ट' विज्ञानवादी मंडळी मात्र, हा रासायनिक प्रक्रियेचा भाग असावा असं अज्ञानापोटी समजू लागली.

खरंच मारुतीला रडायला काय झालं असेल ? संसारी माणूस रडला असता तर 'नेहमीचंच आहे', 'चालायचंच' असं म्हणून सोडून दिलं असतं. पण मारुतीसारख्या ब्रह्मचाऱ्याला कसलं आलंय दुःख ? मारुतीची हिस्ट्री तपासून पाहिल्यावर हा माणूस रडणाऱ्यांपैकी नाही हे दिसून येईल. अगदी लहानपणीसुद्धा 'मला शून्य पायजे' असा रडून रडून अकांत करण्याऐवजी या पठ्ठ्यानं लहान वयातच सूर्याकडे झेप घेतली. म्हणजे एकंदरीत प्रयत्नवादी माणूस. त्यात पुन्हा चिरंजीव. म्हणजे मृत्यूचंही भय नाही. पण रडायला काय झालं असेल ? मी मारुतीबद्दल विचार करू लागलो.

कोठल्याही गावात 'एन्ट्री' करताना सर्वप्रथम लागतं ते मारुतीचं देऊळ. हल्ली नगरपालिकेचे बोर्ड 'आदराने' नको तितके लावून सहर्ष स्वागत करत असतात.

गावाचे रक्षण करण्यासाठी गावाच्या वेशीबाहेर मारुतीची स्थापना होई. पूर्वी एखादा दुसरा मारुती गावाला पुरत असे. आता गल्लोगल्ली ट्यूशन क्लासेस-प्रमाणेच देवळं निघालीत. त्यात भक्तजणांनी मारुतीरायाचं बारसं करून आपल्या आवडी-निवडीप्रमाणे नाव ठेवलीत. देवांना 'नावं ठेवण्याचा' हा प्रकार आपल्या-शिवाय अन्यत्र कोठे आढळणार नाही. आपल्याकडं काहीही चालतं. एखादी कन्याकुमारी एखाद्या संन्याशाला 'तेरा चिमटा, मेरी चुडीया दोनो साथ बजायेंगे' असं बजावते. पुन्हा याचं चालीवर मारुतीच्या देवळात कन्याकुमारी 'तेरा सिंदूर मेरी लिपस्टीक दोनो साथ रंगाएगे' असंही म्हणताना दाखवलं जाईल. कदाचित हे खपवूनही घेतलं जाईल. आमच्या भावना केव्हा दुखावतील व केव्हा सुखावतील हे आमचं आम्हालाच सांगता येणार नाही. तसं 'मारुती' या शब्दालाच आता अर्थ उरला नाही. हल्ली याच नावाची एक 'कार' बाजारात आली आहे असं ऐकतो. खास मध्यमवर्गीयांसाठी गरजूंनी नोंद घ्यावी. खरं पाहिलं तर बजरंगबली हा आखाडेवाल्यांचा देव. आखाडा–कुस्ती वगैरे म्हटल्यावर फार पूर्वी वाचलेल्या एका कवितेच्या दोन ओळी पुसटशा आठवतात –

तरुण आखाड्याकडे धाव घेती
वृद्ध भूपाळच्या प्रभूस आळविती.

आता गावोगावचे आखाडे उखडण्यात आले असून, त्या जागी व्हिडिओची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. रात्रभर व्हिडिओवर पिक्चर पाहिल्यामुळे तरुणांना उशिरा उठणं क्रमप्राप्तच असतं. आखाड्याकडे धाव घेणे वगैरे फालतू गोष्टींसाठी त्यांना वेळ नसतो. राहता राहिले वृद्ध. बिचाऱ्यांना प्रभूस आळवण्याऐवजी भल्या पहाटेच हातात दुधाच्या बाटल्या घेऊन रांगेत उभं राहावं लागतं. एकंदरीत आजचं चित्र असं आहे. तरीही कुठं–कुठं हिरवळ दिसते. तांबड्या मातीत जोर, बैठका मारणारे दिसतात. कुस्त्या लढवणारे भेटतात. हे सर्व घडतं ते 'मारुतीच्या' तसबीरीच्या साक्षीनं. आखाड्यात मारुती तुम्हाला हमखास भेटेल. इतर ठिकाणच्या मारुतीपेक्षा आखाड्यातला मारुती सदाप्रसन्न वाटतो. बाकी ठिकाणी हा देव बळे–बळेच उभा केल्यासारखा दिसतो. खास तौरपर, एखाद्या मंगलकार्यालयाच्या आसपासचा मारुती जास्त दीनवाणा वाटतो. बहुधा कार्याच्या आदल्या दिवशी मारुतीची शोधाशोध होते. कोट, टोपी सावरत चार-दोन मंडळी 'इन-सर्च ऑफ गॉड मारोती' पायपीट करतात. जिर्णोद्धाराची नितांत गरज असलेले, एक पडकं देऊळ मारुतीचंच आहे असं त्यांना कळतं. 'कामचलाऊ आहे, आपल्याला काय रोज थोडीच यायचं इथं.' असं म्हणत मंडळी दुसऱ्या दिवशी नवरदेवाला तिथं घेऊन येतात. कडक इस्त्रीतला नवरदेव आपल्या स्टेटसला न शोभणाऱ्या त्या मंदिरावर नाराज असतो. " साला, अपना विश्वास नही ईन फजूल बातोंपर, पण

करावं लागतं मोठ्यांच्या मर्जीखातर" असं काहीसं पुटपुटत तो मारुतीरायाला कडक सॅल्यूट ठोकतो व नवे कोरे बूट कर्र-कर्र वाजवत मारुतीरायाचा निरोप घेतो, तो आयुष्यात पुन्हा कधी न भेटण्यासाठी. तर असं चाललंय राजा, बिचाऱ्या मारुतीचं आजकाल. तरीही मारुतीसारख्या पॉवरफूल देवानं रडावं हे मनाला पटत नाही. रावणाची लंका जाळून राख करणाऱ्या अंजनीसुताला आपल्या मनातल्या दुःखाची राख का करता येऊ नये ? त्यासाठी त्याने सामान्य माणसां-प्रमाणे अश्रूंचा सहारा का घ्यावा ? मारुतीच्या डोळ्यांतून अश्रू का यावेत ? राजा, या प्रश्नाचे उत्तर माहीत असूनही तू न दिल्यास तुला सच्च्या बजरंग भक्ताप्रमाणे हजार दंड व दोन हजार बैठका माराव्या लागतील."

"बापरे ! वेताळा, त्यापेक्षा मी तुझ्या प्रश्नाचं उत्तर द्यायचा माझ्यापरीनं प्रयत्न करतो." असं म्हणून चक्रमादित्य पुढं बोलू लागला, "मराठवाड्यातील नांदेड येथील मारुतीच्या अश्रूंचं कारण हे साता समुद्रापलीकडे अमेरिका या देशातील लॉस एंजेल्स या ठिकाणी नुकत्याच पार पडलेल्या ऑलिंपिक स्पर्धेत दडलेले आहे. 'मंदाद्रीसारिखा द्रोणु' उचलणाऱ्या हनुमंताच्या या देशातील वेट लिफ्टर्सनी पार निराशा केली. इतर देशांतील खेळाडू भराभर वजन उचलीत होते. भारतीय स्पर्धक मात्र चाचणी फेरीतच बाद अशा प्रसंगी हनुमंतानं अश्रू गाळावे नाहीत तर मग काय आनंदाने गडबडा लोळावं ? तीच गत धावण्याच्या शर्यतीची. 'गतीसी तुलना कैसी' असंच वर्णन करावं लागेल. एकट्या बिचाऱ्या पी. टी. उषाचा अपवाद. पण मारुतीचे सच्चे भक्त 'मर्द लोक' मागे राहिले ते राहिलेच. जिथे खेळाडू कोणते पाठवायचे यापेक्षा व्यवस्थापक कोण पाठवायचा यालाच जास्त महत्त्व दिलं जातं, तिथं हे असंच होणार व तोपर्यंत बिचाऱ्या मारुतीला अश्रूच ढाळावे लागणार. युवराज पाटील, रामचंद्र सारंग वगैरे अस्सल कसलेली पहिलवान मंडळी राजकारण्यांच्या डावपेचांपुढं चित झाली. या राजकारण्यांच्या धावपळीत उत्कृष्ट धावक आदिक सुमारीवालाही मागे पडला. या उपेक्षितांचे अंतरंग जाणून घेण्याऐवजी राजकारणी मंडळी, राजकारणाचा सारीपाट खेळण्यात मग्न होती. सुमारीवाला, सारंग, पाटील यांच्याप्रमाणे कितीतरी एकलव्य गुरुविना अंधारात चाचपडत असतील. एकलव्याचे अंगठे हे असे निर्दयपणे कापले जातात, म्हणूनच तर सत्तर कोटी लोकसंख्या असलेल्या या देशातील ऑलिंपिक स्पर्धेत वैयक्तिक पदक मिळवणारा एकही 'माईका लाल' निघत नाही. हेलसिंकी येथील स्पर्धेत कुस्तीचं ब्रॉंझ मेडल पटकवणारे व ऑलिंपिकमध्ये वैयक्तिक पदक मिळ-विणारे एकमेव भारतीय खाशबा जाधव, या ऑलिंपिक स्पर्धेनंतर दोनच दिवसांनी दिवंगत झाले. जणू भारतीय कुस्तीगीरांचं अपयश ते पचवू शकले नाहीत. दर चार वर्षांनी ऑलिंपिक स्पर्धा होतील. पण त्यावेळी मात्र ८४ ची पुनरावृत्ती होऊ

नये. तसं झालं तर मारुतीला पुन्हा अश्रू ढाळावे लागतील. मारुतीरायानं पुन्हा अश्रू ढाळण्यास माझी हरकत नाही, पण ते अश्रू मात्र आनंदाश्रू असावेत हीच माफक इच्छा."

अशा प्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा होऊन, 'टगे व आडदाडे व्यायामशाळे'च्या मलखांबाला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# ९.

## * हाफपँटवाला दादा *

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व झकासपैकी 'एक सौ बीस तीन सौ 'चा बार तोंडात टाकून, नेहमीप्रमाणे मौन धारण करून चालू लागला. तेव्हा प्रेतात असलेला वेताळ, दादा कोंडकेच्या जोकला पब्लिक जसे पोट धरून धरून हसते तसे हसत म्हणाला, " राजा, नुकतीच दादांच्या 'तेरे मेरे बिचमे' या पहिल्या हिंदी चित्रपटाने मुंबईत सिल्व्हर ज्युबली साजरी केली. दादा कोंडके हे काय लफडं आहे, ते डबल मिनींगवाल्या तमाम पब्लिकप्रमाणे तुलाही माहीतच असेल. त्यामुळे आता अधिक तपशीलात न शिरता सरळ मुद्यालाच हात घालतो. कृपया माझ्या कोणत्याही वाक्याचं डबल मिनींग वगैरे शोधायच्या भानगडीत पडू नको.

हं, तर काय सांगत होतो की, महाराष्ट्रात इतरत्र फारसा न चाललेल्या दादांच्या 'तेरे मेरेनं' म्हमईत सिल्व्हर मारली. खरं तर हा चित्रपट त्या लायक होता असं मला वाटत नाही. दादांनी मराठी गावंढळपणा हिंदीतहीं ओतप्रोत भरला होता. तसं दादा चित्रपटात चालवण्यासाठी लई डोस्कं खाजवतात. स्वत: तर खाजवतातच अन पब्लिकलाही खाजवायला लावतात. पांडू हवालदारपर्यंतचे पहिले चार चित्रपट खरोखरच चांगले होते. पांडूला तर जन्ता-जनार्दन या जन्मात विसरणार नाही. पण पुढे दादा घसरले हो, अगदी कमरेखाली घसरले. 'कंबरपट्ट्यात घुंगरू का हसलं ?' ही ओळ काय सुचवते ? अशी खूप उदाहरणं देता येतील. अगदी चित्रपटाच्या नावापासून दादा धुमाकूळ घालायला सुरुवात करतात.

आता त्यांच्या आगामी चित्रपटाचंच नाव घ्या. 'अंधेरी रातमे दिया तेरे हाथमे' काई आलं का माज्या राजा ध्यानामंदी ? अंधाऱ्या रात्री हातात दिवा घेऊन जखमी सैनिकांची सेवा करणारी फ्लॉरेन्स नाईटींगेल सर्वांना ठाऊक आहे. आता दादांच्या उषाबाई चव्हाण अंधाऱ्या राती हातात दिवा घेऊन कोणाची सेवा करतात ते दादाच जाणे ! तसा बऱ्याच गोष्टींचा खरेखोटेपणा दादांनाच ठाऊक. दादा अमक्या अमक्या नावाचा चित्रपट बनवणार अशा सारख्या वावड्या उठत असतात. जसं 'हात चोळीत गेला' वगैरे वगैरे. याबाबत समक्ष दादांनाच भेटून विचारावं लागेल. आता एकाचवेळी एका हिंदी व एका मराठी चित्रपटाची अवजड जबाबदारी खांद्यावर असल्यामुळे दादा सध्या बिझी आहेत. त्यात हिंदीकरता कोणती 'बाई' आपल्या 'मापाची' होईल हा गोड प्रश्नही त्यांना सुटेनासा झाला आहे. दादा काही बाबतीत नशीबवानच. एवढ्या अवाढव्य चित्रपटसृष्टीत प्रतिस्पर्धी नसल्यामुळे कॉम्पिटीशन वगैरे फेस करण्याची पाळी अशी की, जी अमिताभसारख्या सुपरस्टारला, चुकवता आली नाही. ती पाळी दादांनी सहज चुकवली. 'या सम हाच' हे दादांच्या बाबतीत एकदम लागू पडते. प्रति दादा कोंडके अजून निर्माण व्हायचा आहे. मराठीतही अन् हिंदीतही. आता दादांनी हिंदीत घूसखोरी सुरू केली आहे. दादा 'लव्ह डे' (?) नावाचा चित्रपट काढणार म्हणे ? राजा, मनात काही भलता सलता विचार आणू नको. दादांना थोपवणं आपल्या हातात नाही. शिवाय दादा स्पष्टीकरण देतील. "आपल्या लव्ह स्टोरी-सारखा 'लव्ह डे' हो ! मंजी हिंदीत 'प्रेम दीन'" मग या प्रेमदिनात अस्सल गावरान प्रेम करायला दादांनी खास लोकाग्रहास्तव सिल्क स्मिताला घ्यावं. मग लव्ह स्टोरीतल्या हिरॉईनवानी सिल्क स्मिता नाचत नाचत, हातात सकाळच्यापारी घेतात तसला डबा घेऊन म्हणेल, 'अच्छा ये बताओ कहां पे है पानी ?' अन दादा आपल्या खास आविर्भावात उत्तर देतात–'बाहर बह रहा है झरना दिवानी' आता बोला की हो राजासाब ?

राजा, एखाद्याला हेवा वाटावा असे अमाप यश दादांना मिळालं आहे. पैसा मिळाला, प्रसिद्धी मिळाली तेव्हा यापुढे गावंढळपणा सोडून दादांनी चार्ली–चॅप्लीन किंवा लॉरेल हार्डीप्रमाणे दर्जेदार विनोदी चित्रपट काढावेत. माजघरात वाचलं जाऊ शकेल ते साहित्य म्हणजे उत्कृष्ट साहित्य असं म्हणतात. आजकाल पुस्तकांप्रमाणेच टी. व्ही पण माजघरापर्यंत पोहोचले आहेत. पण दादांच्या चित्र-पटाचे दूरदर्शनवर दर्शन होणं म्हणजे दूरची गोष्ट. कुटुंबवत्सल माणसं दादांचा आचरटपणा पाहू शकणार नाहीत. म्हणजेच साहित्याचा निकष लावायचा तर दादांचे चित्रपट उत्कृष्ट या सदरात मोडू शकणार नाहीत. कारण सभ्य माणूस कुटुंबातल्या चारचौघांबरोबर वा चारचौघींबरोबर असले चित्रपट पाहू शकत

नाही. या पार्श्वभूमीवर मला दादा कोंडके या प्राण्याबद्दल तुला काही प्रश्न विचारायचे आहेत. ज्यातून दोन अर्थ निघतील असे 'शब्द' दादा का निवडतात? दादांच्या आगामी हिंदी चित्रपटांचे भवितव्य काय? या प्रश्नांची उत्तरं तू न दिल्यास, तुला दादा कोंडकेसारखी हाफपॅन्ट घालून भर दरबारात जावं लागेल."

चक्रमादित्याने अधीरतेने एकसो बीस तीनसोला मुखावाटे बाहेर फेकले व गळणारा तांबूल रस शर्टच्या बाहीला पुसत तो म्हणाला, "वेताळा, मुळात तू दादा कोंडकेंबद्दल वरवर विचार केला आहेस, खोलवर नव्हे.

तेव्हा 'फ्लॅशब्लॅक' पद्धतीनं आपण दादा कोंडके हे काय प्रकरण आहे ते बघू. कोठल्याही महापुरुषावर भाष्य करताना 'त्यांचे संपूर्ण नाव अमूक अमूक होते.' अशी सुरुवात करतो. गंमत म्हणजे आबालवृद्धांना प्यारा दादा कोंडके यांचे संपूर्ण नाव फारच थोडयांना ठाऊक आहे. ते जाणून घ्यायच्या भानगडीत कोणी पडलं नाही. 'दादा कोंडके' एवढयाच नावाने ते उभ्या महाराष्ट्राला अन आता तर 'अख्या होल इंडियाला' परिचित.

कोंडक्यांचा आठवा पुत्र 'कृष्णा' जन्मताच रडला नाही म्हणे! म्हणजे आपण पुढे लोकांना हसवणार, हे या पाळण्यातल्या पोरानं पायाचा अंगठा दाखवून सूचित केलं असावं. पुढं पोटापाण्याच्या चिंतेत कुठं मिल मजूर म्हणून काम कर, कुठं दुकानात पुडया बांध, तर वरातीत बँड वाजव असं चाललं होतं. हे सर्व करत असताना आतला कलाकार स्वस्थ बसू देत नव्हता. दादांचा मूळ स्वभाव तसा भिडस्त, लाजरा बुजरा आता पडद्यावरचे त्यांचे संवाद ऐकून हा माणूस एकदम निर्लज्ज असावा असंच वाटतं, पण तसं नव्हे. मूळ लाजऱ्या स्वभावामुळे दादा स्टेजवर कुठंतरी 'मॉबसीन'मध्ये अंग चोरून उभे असायचे. तशात भालजी पेंढारकरांनी दादांचं पाणी ओळखलं. त्यांना आपल्या तालमीत ओढलं. 'तांबडी माती' या सिनेमात पहिलवान म्हणून दादा सर्वप्रथम पडद्यावर आले. पण पहिल्या कुस्तीत हा पहिलवान चारीमुंडया चीत झाला. दादांना टीकाकारांनी हैराण केलं. वेडयाविद्रया शरीराच्या या माणसाला फिल्मी दुनियेच्या चॉकलेटी जगात स्थान नाही हे ठासून सांगितलं. आज सेन्सॉरची ऐसी की तैसी करताना दादा त्याकाळी भिडस्त स्वभावामुळे टीकाकारांना शरण आले. चित्रपटांच्या वाटयाला पुन्हा कधी जायचं नाही असं ठरवून 'विच्छा'चा पिच्छा पुरवला. शाहीर दादा कोंडके यांच्या 'विच्छा माझी पुरी करा'नं अख्ख्या महाराष्ट्राला पिंजारलं. या शाहीरानं ना. सि. फडक्यांपासून यशवंतराव चव्हाणांपर्यंत सर्वांना शाब्दिक बाणानं घायाळ केलं. इथं पुन्हा भालजी धावून आले. विच्छावर चित्रपट काढण्याची इच्छा त्यांनी बोलून दाखवली. नुसते बोललेच नाहीत तर आर्थिक कारणांसाठी 'सोंगाडया' अडला असता त्याला मदतही केली.

पण पुढं सोंगाड्याला थिएटर मिळेना. मराठी चित्रपटांचा वनवास सुरू होता. महाराष्ट्रात मराठी चित्रपटाला चित्रपटगृह मिळू नये यासारखी दुर्दैवी दुसरी गोष्ट कोणती ? इथं शिवसेना मदतीला धावून आली. सोंगाड्याला वाट मोकळी झाली अन् तब्बल ३२ आठवडे हा मराठी सिनेमा एकाच टॉकीजमध्ये चालल्याचं पाहून 'बॉम्बे 'तल्या त्या अमराठी मॅनेजरचे डोळे खाडकन् उघडले. इथून दादांची यशस्वी कारकीर्द सुरू झाली ती आजतागायत चालू आहे अन् पुढेही चालूच राहणार. आता तुझ्या प्रश्नांची उत्तरं.

मराठी भाषा ही मुळातच लवचिक आहे. त्यामुळे बऱ्याच शब्दांचे दोन अर्थ सहज निघतात. दादांनी त्यांच्या आवडत्या मराठी भाषेप्रमाणेच मराठी मनाचाही विचार केला. एका बुक्कीत कांदा फोडून तो चटणी-भाकरीबरोबर खाणारा ग्रामीण 'मराठी माणूस' हाच दादांचा खरा प्रेक्षक.

नाजुकसाजुकपणा त्याच्या प्रकृती व प्रवृत्तीला खपत नाही. म्हणूनच 'नजर मिली भी तो खाली सलाम कर दुंगा' असं म्हणणारा व नायिकेसमोर मवाळ होणारा 'गडी' त्यांना आवडत नाही. त्यापेक्षा 'चल गवतात शिरू न् गंमत करू' ही दादांची डायरेक्ट मेथड त्या रांगड्या मनाला मानवते. दादांनी माणसाच्या स्वभावातला रांगडेपणा, भाषेतील लवचिकता यांचा पुरेपूर फायदा घेतला. त्यामुळेच दादांच्या डबल मिनींगबद्दल बरंच बोललं जातं. दादा म्हणतात, "एकाच शब्दाचे सभ्य व असभ्य असे दोन अर्थ निघत असताना तुम्ही सभ्य अर्थ का नाही घेत ? असभ्यच अर्थ का गृहीत धरता ?" खरं तर 'द्वैअर्थी शब्दांवरच दादांचं अर्थार्जन अवलंबून आहे. चित्रपट हा शेवटी धंदा आहे. त्यामुळे मागणीप्रमाणे पुरवठा करावाच लागतो. दारू ही वाईट गोष्ट आहे, असं सरकारही आपल्या सरकारी जाहिरातींत बोंबलून सांगतं अन् इकडे दुसऱ्या हातानं दारू विक्रीचे परवाने वाटणं सुरू असतं. हे का होतं याला उत्तर नाही. तसंच दादांच्या डबल मिनींगलाही नाही. आता दुसरा प्रश्न म्हणजे, दादांच्या कपड्यांचा. बावळट चेहरा व गबाळी राहणी हेच मुळात दादांचं भांडवल. कितीही चांगले कपडे घातले तरी आपण चांगले दिसणार नाही हे दादांना चांगलं ठाऊक आहे. मग दादा विनाकारण 'जितेंदर' बनायच्या का मागे लागतील ? वेताळा, तू कधी पाहिलं आहेस का की, एखादा कॉलेजकुमार आपल्याला 'दादा कोंडके ईस्टाइलची' पँट शिवायची म्हणून टेलरकडे हट्ट धरून बसलाय. मी तर नाही पाहिलं बुवा ! अन् तो योगही येणार नाही. बाह्य देखाव्यापेक्षा बुद्धीचातुर्यावर दादा पिक्चर तारुन नेतात अन् तेच खरं महत्वाचं, आता दादांच्या हिंदीतील भवितव्याविषयी दादांच्या 'राम राम गंगाराम' चा 'तेरे मेरे बिचमे' हा हिंदी अवतार. कोठलाही निर्माता आपल्या

प्रादेशिक चित्रपटाची ' रिमेक ' करायची जोखीम घेतो. गिनीज बुकावाल्या दादांचे सर्वच पिक्चर हीट. तरी सर्वांमध्ये ' राम राम ' हिंदीकरता फीट बसेल हे दादांच्या धंदेवाईक नजरेनं ताडलं, अन् ते तंतोतंत खरंही निघालं. महाराष्ट्रात ' रामराम ' अजूनही लोकांच्या स्मरणात आहे. अशोक सराफचा म्हमद्या विसरणे केवळ अशक्य. त्याच्या तुलनेत अमजद फिक्का वाटला. दादा उषाचं हिंदीही चलवेल आहे. बस, एवढंच जाणून घ्यायची महाराष्ट्रातील लोकांना घाई होती. पिक्चरची स्टोरी वगैरे सर्वच आधी माहीत होतं. त्यामुळे रामरामइतकं खेडोपाडी दादांच्या हिंदी सिनेमाचं स्वागत झालं नाही. त्यांची खरी परीक्षा होती ती अमराठी प्रदेशात. हाफपँटीतला हा हिरो मराठी माणसांप्रमाणे आंध्रवासियांनाही आवडला. ' बिनाका 'पर्यंत दादांच्या गीतांनी मजल मारली. म्हणजेच हसणं आणि हसवणं आवडणाऱ्या तमाम भारतीयांना दादा आवडायला हरकत नाही. एकूण दादांना बराच स्कोप आहे. काही माणसं मात्र जन्मतःच गंभीर असतात. असल्या ' ढढ्ढाचार्यां 'ना दादा आवडणारच नाहीत. ते दादांना खालच्या पातळीवरचा माणूस म्हणून हिणवतील. पण ' भूवन शोम ' सारख्या उत्कृष्ट चित्रपटासही हे ढढ्ढाचार्य दाद देत नाहीत. असल्या लोकांकडे लक्ष न देता नेहमीप्रमाणेच सेन्सॉरच्या धोकेबाज कैचीतून डोकेबाजपणे आपल्या चित्रपटाची सुटका करून दादांनी तमाम पब्लिकला असंच हसवत राहावं. "

अशा प्रकारे राजाचे मौन भंग होताच, प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व ' सदिच्छा चित्र 'च्या बोर्डाला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# १०.

## * नियोजनाचे प्रयोजन *

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. तेव्हा प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला, " राजा, तुझ्या खांद्यावरून प्रवास करताना बरं वाटतंय. कारण दिवसभर गर्दीचे निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या प्रकारचे धक्के खाऊन माझे खांदे दुखायला आले होते. एक तर आपल्याकडे गर्दी फार. कुठेही जा सिनेमाला जा, शाळा-कॉलेजात प्रवेश घ्यायला जा, गर्दी तुमच्या पुढेमागे असतेच. बसमध्ये, ट्रेनमध्ये, कुठं एखादं बिल भरण्याच्या रांगेपासून तर ' दिल ' हरवण्याच्या गार्डनपर्यंतही गर्दी आपला पिच्छा पुरवतेच. एकांत मिळावा म्हणून गार्डनमध्ये जावे तर तिथंही गर्दी असतेच संबंधितांनी याची नोंद घ्यावी. या गर्दीपुराणाचे प्रयोजन हेच की, देशाची लोकसंख्या केव्हाच सीमारेषेबाहेर गेली आहे. राजा, तुझ्या राजेशाही दिवसात वाढती लोकसंख्या ही फायद्याची बाब होती. शत्रूंच्या सैनिकांवर मानसिक दबाव आणायला त्यामुळे मनुष्यबळ कामी यायचं. बरेचदा कमी सैन्य असलेला सेनापती आधीच तहाचं निशाण फडकवायाचा. पण आता या न्यूट्रॉन बॉंबच्या युगात मनुष्यबळाचा असा काहीच फायदा नाही. निव्वळ मनुष्यबळावरच लढाया जिंकता येत असत्या तर चिन व भारत हे दोन देश महासत्ता म्हणून ओळखले गेले असते. पण या उलट बेताचीच लोकसंख्या असलेले देश आज सर्वच क्षेत्रांत आघाडीवर आहेत. याचं बरचसं श्रेय माल्थस, ज्युलियन हक्सले वगैरे लोकसंख्येवर संशोधन करणाऱ्या मंडळींना द्यावं लागेल. असं

आपल्याकडेही पंडित नेहरूंसारख्या द्रष्टयाने या समस्येचे गांभीर्य ओळखून प्रथम पंचवार्षिक योजनेत कुटुंब नियोजनाकरिता तरतूद केलीच होती. म्हणजे ही झाली १९५० च्या आसपासची गोष्ट पण त्याकाळी लोकांनी मात्र कुटुंब नियोजन हा शब्द या कानांनी ऐकला आणि त्या कानांनी सोडून दिला. सतत वाढणारी लोकसंख्या याची साक्ष देईल. किचकट आकडेवारीत न शिरता सभोवताली नजर टाकली तर या गोष्टीची सत्यता पटेल. १९५० ते ६० च्या दरम्यान लग्न झालेल्या जोडप्यांना सरासरी पाच मुले असायची. पुढं ६० ते ७० मध्ये हे प्रमाण चारवर आलं. त्याहीपुढे ७० ते ८० मध्ये तीनवर गेले व आता ८० ते ९० मध्ये दोन मुलं व पुढील दशकात एकच अपत्य स्वीकारायलाही लोक तयार होतील. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. हीच बाब जर १९५० सालीच लोकांच्या लक्षात आली असती तर लोकसंख्या विनाकारण इतकी वाढली नसती. पण नाकातोंडात पाणी गेल्याशिवाय हातपाय न हलवण्याची आपली सवयच, दुसरं काय ?

आता तर लोकसंख्येच्या समस्येवर एका मंत्रीणबाईनं असा तोडगा शोधून काढला की बायकांच्या प्रसूतीसमयी नवऱ्यालाही तिथं हजर असू द्यावं की, जेणे करून प्रसव वेदनांची तीव्रता त्याला कळेल व बायकोला त्या 'अवस्थेत' आणण्याचं धारीष्टय़ तो दाखवणार नाही. जिथं बायकोच्या अंगावर रॉकेल टाकून इतरेजणांच्या साह्याने तिला पेटवून आरामात सिगारेट ओढत त्या 'नयनरम्य' दृश्याकडे पाहात असणारे महाभाग भेटतात तिथं असल्या, 'भावनाप्रधान' योजना कामाच्या नाहीत. निर्ढावलेल्या लोकांसाठी कडक कायदेच पाहिजेत. चीनने याबाबतीत जबरदस्त आघाडी मारली आहे. 'वन चाईल्ड' फॅमिलीच्या जोरदार प्रसाराबरोबरच अंमलबजावणीही चालली आहे. भारतात हे का होऊ नये ? लोकांच्या सद्सद्विवेक बुद्धीला आव्हान करूनही जर काही फायदा होत नसेल तर चीनसारखा कडक कायदाच अंमलात आणायला हवा. चाळीस वर्षांपूर्वीची चूक आता तरी सुधारायला पाहिजे. लोकसंख्या वाढ हे मानवनिर्मित संकटांपैकी एक संकट आहे. नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यास विज्ञान पूर्णतः यशस्वी झालेले नाही. पण लोकसंख्या आपत्तीवर मात्र विज्ञानानं अनेक उपाय शोधून काढले आहेत. भारतासमोर लहानमोठी अशी अनेक प्रश्नचिन्हे आहेत. लोकसंख्या हे त्यातलं सर्वात मोठं प्रश्नचिन्ह. हे जर हटवलं गेलं तर बेकारी, गरिबीसारखी प्रश्नचिन्हे नष्ट होतील किंवा प्रभावहीन निश्चितच होतील. म्हणजे एका दगडात दोन पक्षी. पण प्रश्न असा आहे की, लोकसंख्येचे हे मोठं प्रश्नचिन्ह कसं हटवायचं? राजा, या प्रश्नाचं उत्तर तू न दिल्यास तुला शिक्षकाची नोकरी पत्करून, फावल्या वेळात पाठवले जाईल."

यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, सर्वप्रथम सद्सद्विवेकबुद्धीला

आव्हान देऊनच हा प्रश्न सुटू शकेल असे मला वाटते. ज्यांच्या खात्यात किमान डझन, अर्धा डझन पोरं आहेत अशी काही जुनी मंडळी 'फॅमिली प्लॅनिंग' वगैरे फॅड आमच्या काळात नव्हते असे अभिमानाने सांगतात. भारतीय माणूस वैयक्तिक हिताकडे जेवढं लक्ष देतो तेवढे सार्वजनिक हिताकडे देत नाही. एखाद्याला लागोपाठ मुली झाल्या, की तो पोराच्या आशेने अजून दोन-चार मुलींना जन्म देऊन टाकतो. मग फक्त पोरींनाच जन्म दिल्याबद्दल बायकोवर व मुलगी म्हणून जन्माला आल्याबद्दल पोरींवर सतत राग काढत, स्वत:चे व दुसऱ्याचेही आयुष्य बरबाद करतो. 'असं का केलं रे बाबा?' म्हणून विचारलं तर 'म्हातारीची इच्छा व्हती, नातवाला मांडीवर खेळवायची!' असे भावनेने ओतप्रोत भरलेलं उत्तर मिळतं. गमत म्हणजे त्याला मात्र इंडियाच्या हाकेला ओ द्यायला सवड नसते. पण घरातल्या म्हातारीच्या काही अवास्तव मागण्या असल्या की हे 'कर्तव्यदक्ष' पुरुष कंबर कसून तयार असतात. असल्या मनोवृत्तीला काय म्हणावं? असं म्हणतात को, इंदिराजींच्या जन्मानंतर कोणीतरी थोडया निरुत्साहानेच पं. नेहरूंना 'मुलगी झाली हो'ची बातमी दिली. प. नेहरूंवर त्याच्या निरुत्साहाचा काहीच परिणाम झाला नाही. उलट नेहमीच्या आशावादाने, उदंड उत्साहाने ते त्या गृहस्थास म्हणाले, "एखाद्या मुलापेक्षा माझी ही मुलगी जास्त कर्तृत्ववान निघेल." आणि इंदिराजींनी आपल्या कर्तृत्वाने पंडितजीचे शब्द खरे करून दाखविले.

कुटुंब नियोजन म्हटले की, एक सुभाषित मला हटकून आठवते. 'वरमेको गुणी नच मूर्ख शतान्यपि। एक: चन्द्र: नभो हन्ती नच तारांगणा अपी' अर्थ असा की, 'आकाशात असंख्य तारे चमकत असतानासुद्धा त्यांचा फारसा प्रकाश पडत नाही; याउलट चंद्र एकटाच भरपूर प्रकाश देतो. तद्वतच शंभर मूर्ख मुलं असण्यापेक्षा एकच गुणी पुत्र केव्हाही चांगला.' लोकसंख्येची समस्या भेडसावत नसताना जुन्या जमान्यातल्या एखाद्या ऋषीने हे लिहून ठेवले आहे. कदाचित त्याला पुढची कठीण परिस्थिती आधीच कळली असावी. काहीही असो, अशा सुभाषितांची आज नितांत गरज आहे. पुराण–कुराणात अशा बऱ्याचशा उपयुक्त गोष्टी आहेत. दैनंदिन जीवनात त्यांचा वापर न झाल्यास पुराणातील वांगी पुराणातच राहतील.

मागे एकदा वजीर पटेल औरंगाबादला आले होते त्यांनीसुद्धा कुराणाचा हवाला देऊन सांगितले की, "पोटभर खायला नसेल, राहायला जागा नसेल तर विनाकारण मुलांची पैदास वाढवण्यात काय हशील? या प्राथमिक गरजा पूर्ण झाल्याशिवाय लग्नच करू नका." वजीर पटेलांसारख्या सच्च्या कार्यकर्त्यांना सरकारने मदतीचा हात दिला पाहिजे. कुटुंब नियोजनासारखे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अशा लोकांची मदत घेतली पाहिजे. दुर्दैवानं आज भारतात या

समस्येला आर्थिक स्वरूप न देता धार्मिक स्वरूप देण्यात आलं आहे. पाकिस्तानातला कोणी एक नेता 'भारतात अल्पसंख्यांकच का ? पैदास वाढवायला हवी' अशी डरकाळी फोडतो. त्याला मुस्लिमांच्या दयनीय अवस्थेशी काही देणं-घेणं नसतं. अशाच ध्येय एकच—संख्याबळाच्या जोरावर सत्ता हस्तगत करण्याचं, त्याला प्रत्युत्तर म्हणून काही हिंदुत्ववादी मंडळींनी दहा मुलांना जन्म देणाऱ्या हिंदू स्त्री करता खास बक्षीस ठेवलं आहे. असाच मूर्खपणा चालत राहिला तर सर्वांनाच जगणं कठीण होईल.

कधी कधी 'लेकुरे उदंड' जाहल्यामुळे मायबाप सरकारचेही डोकं ठिकाणावर राहात नाही. अशाच बेचैन अवस्थेत नसबंदीचा कोठा भरून काढण्याकरता शिक्षकांना हाताशी धरलं जातं. हे सरकारी काम पूर्ण न केल्यास नोकरी जाण्याची भीती म्हणून गुरुजी लोक मिळेल ते सावज गाठतात. त्याचीच फलश्रुती म्हणून 'अविवाहित तरुणांवर नसबंदी शस्त्रक्रिया' वगैरे बातम्याही आपण अधूनमधून वाचतो. अशानं लोकांच्या भावनेचा उद्रेक होतो व हा उद्रेक सत्तारूढ पक्षाला सत्तेवरून खाली खेचू शकतो, हा आणीबाणीनंतरचा इतिहास ताजाच आहे. तेव्हा जुलूम—जबरदस्ती न करता लोकशिक्षणाद्वारे हा प्रश्न सोडवावा. संतती प्रतिबंधक साधनांबद्दल अशिक्षितांमध्ये कमालीची भीती आहे. त्याची ही निष्कारण भीती दूर करायला हवी. इतर समाजोपयोगी कार्याप्रमाणेच कुटुंब नियोजनाच्या प्रसाराकरिता पूर्ण वेळ कार्यकर्ते हवेत. सरकारनेसुद्धा आपल्या पद्धतीत बदल करून जास्तीत जास्त भर खेड्यांवरच द्यायला हवा. शहरी, मध्यम व उच्चवर्गीयांना आता अधिक उपदेशाचे डोस नकोत. वृत्तपत्रे, मासिके, या माध्यमापेक्षा 'दृक्‌श्राव माध्यम जसं रेडिओ, टी. व्ही., स्लाईड शो वगैरेवर भर द्यावा.

मध्यंतरी सुनिल गावसकर 'मला एकच मुलगा आहे, तेव्हा तुम्हीही...' असे म्हणून कुटुंब नियोजनाची जाहिरात करताना वृत्तपत्रांतून दिसत होता. कल्पना तशी चांगली आहे, पण खेडूतांना हा सुनिल गावसकर कोण हेच माहिती नसल्यामुळे त्यांच्यापर्यंत जाहिरात पोहचतच नाही. मध्यमवर्गीयांमध्ये अपवादानेच कुटुंब नियोजनाकडे डोळेझाक करणारे भेटतात. मात्र दारिद्र्य रेषेखाली जाणाऱ्यांमध्ये उलट घडतं. म्हणूनच हा कार्यक्रम युद्धपातळीवर राबविला पाहिजे. तसा तांबीचा प्रसार जोरदार झाला. याबद्दल सरकारचं अभिनंदन करायला हरकत नाही. पण काही मंडळींना तांबीच्या जाहिरातीत दाखवलेला कलश खटकला. त्यांच्या धार्मिक भावना दुखवतात म्हणे ! अशिक्षिताचं लक्ष वेधून घ्यायला चित्र हे माध्यम प्रभावी असतं, अन् त्या चित्राशी भावनिक संबंध वगैरे असला की थोडावेळ थबकून ते चित्राचं निरीक्षण करतात. वेळप्रसंगी विचारपूसही करतात. याचं एकमेव उदात्त उद्देशानं 'कलश' वगैरे वापरण्यात आले. लोकसंख्यारुपी

कॅन्सरला कायमचं नष्ट करायचं असेल तर असले अनेक उपाय शोधावे लागतील. उदाहरणार्थ शुक्रवारच्या कहाण्यांसारख्या कुटुंब नियोजनांच्या कहाण्या लिहून त्यांच्या 'कॅसेटस्' ग्रामस्थांना ऐकावयाला हव्यात. कुटुंब नियोजनाचं महत्त्व येनकेन प्रकारे त्यांच्या मनावर बिंबवलंच पाहिजे.

शेवटी एक महत्त्वाचा मुद्दा, समाजवादी अर्थव्यवस्थेत कोणी कोणाचं शोषण वगैरे करू शकत नाही, असल्या खूप गप्पा मारल्या जातात. पण प्रत्यक्षात शोषण भरपूर चाललंय. यात निव्वळ भांडवलदारांना दोष न देता ज्यांचं शोषण होतं यांनी आत्मपरीक्षण करायला हवं. लोकसंख्या भरमसाठ असल्यामुळे मजूरांचे भाव सदा उतरलेलेच असतात. केवळ मजूरच नव्हेत, तर पदव्यांची भेंडोळी सांभाळणाऱ्या मंडळींनासुद्धा अत्यल्प मोबदल्यावर काम करावं लागतं. निव्वळ स्वतःच्या फायद्याचाच सदैव विचार करणारी भांडवलदारमंडळी लोकसंख्यारूपी गरम तव्यावर आपली पोळी भाजून घेतात. जन्माला येणारं मूल खाणाऱ्या एका तोंडाबरोबर काम करणारे दोन हातही घेऊन येतं असं म्हटलं जातं. पण जिथं कामच उपलब्ध नाही तिथे हे दोन हात काय कामाचे? जगातील लोकसंख्येच्या पंधरा टक्के लोक भारतात राहतात व जगातील एकंदर भूभागांपैकी फक्त दोन टक्के भूभाग आपल्या वाट्याला आला आहे. यावरून लोकसंख्येच्या भीषणतेची सहज कल्पना येईल. या कारणास्तवच लोकसंख्येच्या प्रश्नाला अग्रक्रम देण्यात यावा."

अशाप्रकारे राजाचे मौनभंग होताच प्रेतातील वेताळ नाहीसा झाला व 'लाल त्रिकोणाच्या जाहिराती'ला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

११.

म. ग्रं. सं. जगें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. २९८५ दिनांक ३/३/८९
विषय आ. वी. ......

# ❋ चिल्लर खुर्दा ❋

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला, “चार दिवसांपासून तुला नाणे टंचाईवर छेडावेसे वाटत होते. पण नाणे टंचाई काय, आज आहे उद्या जाईल अशी स्वत:ची समजूत घालून गप्प राहिलो. पण तब्बल नऊ–दहा महिने झाले तरी नाणेटंचाई काही जाईना. तेव्हा म्हटलं, हिचं ‘बाळंतपण’ उरकून घ्यावं नाहीतरी चिल्लर-ऐवजी दुकानदारांनी दिलेल्या गोळ्या, चॉकलेट खाऊन दात खराब व्हायची वेळ आलीच आहे चॉकलेट, सुपारीसारखंच पर्यायी नाणं म्हणून एक पानवाला ‘निरोध’ पुढे सरकवत होता म्हणे ! खरंतर सरकारी आदेश जनतेपर्यंत पोहोचवणाऱ्या या पानवाल्याचा कुटुंब नियोजन खात्यातर्फे सत्कारच करायला हवा. काही लाजरी-बुजरी मंडळी मेडिकल स्टोअर्स ऐवजी पानवाल्याभोवती घुटमळत असायची. पानवाल्याकडून पान घेऊन, घरी खलबत्त्यात कुटून खाणाऱ्या एका साठीतल्या ‘हिरव्या पानापुढं’ पानवाल्यानं सवयीने निरोधचं पाकीट सरकवून थोडा वेळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण केली होती, अशी एका दंतहीन म्हाताऱ्याची कथा ऐकिवात आहे.

लहानपणी खाल्ली नाहीत तेवढी चॉकलेटस् या वयात जबरदस्तीने खावी लागल्यामुळे दंतवैद्यापुढे दंत विचकवायाला गेलो. त्या दंतवैद्याने माझ्या बखोटाला धरून, दंतवैद्याची खुर्ची नामक भयानक आसनावर मला आदळलं अन् त्यामुळे

माझ्या खिशातील चॉकलेटस्, सुपारीच्या पुड्या, निरनिराळ्या हॉटेलातील कूपन्स खाली पडली. शाळकरी उत्साहानं मी वस्तू जमा करत असतानाच माझ्याकडे चमत्कारिक नजरेने पाहात डॉक्टर म्हणाले, " असल्या वस्तू या वयात खिशात बाळगणं म्हणजे–म्हणजेच तुम्हाला मानसोपचार तज्ञाकडे जावं लागेल. चॉकलेटमुळे तुमचे दात खराब झालेत, याचाच अर्थ बालरोगतज्ञ तुम्हाला चांगली ट्रीटमेंट देऊ शकेल. तुम्ही तिकडेच जा, पण सांगून ठेवतो या वयात चॉकलेट खाणं बरं लक्षण नव्हे." खाली पडलेलं एक चॉकलेट मटकावून डॉक्टर गप्प बसले.

आता चहा–पाण्याची सोय ' बरचेवर ' होणाऱ्या सरकारी डागदरबाबूला काय झळ पोहोचणार आहे नाणे टंचाईची ? म्हणे मानसोपचार किंवा बालरोगतज्ञाकडे जा ! उद्या नेहमी चावाचावी करणाऱ्या टीकाकारांना किंवा लाथाळीची सवय लागलेल्या राजकारण्यांना पशु वैद्याकडे, आय मीन् ढोर डॉक्टरांकडे पाठवाल ! शेवटी दोघांपैकी कोठलाच तज्ञ ' न गाठता मी अर्थशास्त्रज्ञ हा तिसराच तज्ञ गाठला. पुढारी लोक, नवकवी अन् प्राध्यापक मंडळी यांना सदैव श्रोत्यांची उणीव भासते. त्यामुळे स्वखुशीने मी प्राध्यापकांकडे जाताच त्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहात होता व त्या आनंदाच्या भरातच मार्शल, रॉबीन्सन या विदेशी मंडळींबरोबरच डेक्टेवर्मा, के. पी. एम्. सुंदरम् ही देशी मंडळी पुस्तकरूपानी कपाटाबाहेर आली. भिंतीचा फळ्यासारखा उपयोग करून प्राध्यापक महोदयांनी वेड्यावाकड्या आकृत्या, आलेख वगैरे काढून, ' नाणे टंचाईचा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर परिणाम, तिचा उगम, विकास आणखी बरंच काही काही..." या लांबलचक विषयावर तितकंच लांबलचक लेक्चर दिले. शेवटी ही डोकेदुखी थांबवायला एका हॉटेलात चहा प्यायलो. ' चिल्लर नही है साब '. चहावाल्यानं शुभवर्तमान दिले. त्याचे कारण विचारले असता, ' सब साला चारसौ बीस का मामला है ' हे उत्तर मिळालं अन् प्राध्यापकांपेक्षा या ' आदमी सडकांचं ' अर्थशास्त्र मला पटलं व त्या खुषीतच मी ' कीप द चेन्ज ' ही घोषणा देऊन परतलो.

मला वाटतं नाणे टंचाईवर ' कीप द चेन्ज ' हाच एकमेव उपाय असू शकतो नाहीतर मग ' रामभरोसे गरीब जनता हॉटेल 'चे प्रोप्रायटर, शिवप्पा रामप्पा आलूबोडे यांच्यासारख्यांनी आर. बी. आय गव्हर्नरच्या थाटात स्वतःच्या सहीने काढलेली कूपन्स ॲक्सेप्ट करावीत. ही कूपन्स हाकेच्या अंतरावरच चालतात, त्यामुळे हरवून जातील या भीतीनं कोणीही लवकरात लवकर ते खर्चूनच टाकतं. आजकाल अल्पोपहार आटोपला की हॉटेलवाले पान खायचा गोड आग्रह करतात, कारण त्यांचं टोकन, कूपन बाजूचा पानवाला चालवून घेत असतो. मग इच्छा असो वा नसो चोच रंगवावीच लागते.

राजा, हुंडाबळी, भूकबळी हे आपल्या नित्य परिचयाचे आहेत. पण नाण टंचाई बळी कधी ऐकलास का? एका दुकानदारानं गिऱ्हाईकाला सुट्टे पैसे दिले नाहीत म्हणून तराजूतले वजन त्याला फेकून मारल्याचे व त्यात त्या बिचाऱ्या गिऱ्हाईकाला मरण आल्याचे पेपरात वाचले. कल्पना कर की, या नाणे टंचाई बळीला चित्रगुप्ताने यमापुढे उभे केले आहे. प्राथमिक चौकशी केल्यावर यमराज मृत्यूचं कारण विचारत आहेत अन् खाली मान घालून ओशाळल्यागत चित्रगुप्त 'नाणे टंचाई' असं सांगून या सदराखाली मृत होणाऱ्यांसाठी नवीन फोलीओ उघडतो आहे अन् यमराज नाणे टंचाई बळीची पहिलीच केस कशी 'डील' करायची या विचारात अस्वस्थपणे रेड्यावरून फेऱ्या मारतोय. हा झाला कल्पनेचा भाग पण वास्तव हे कल्पनेहून काही निराळं नाही. 'अर्थ'हीन माणसाच्या जगण्यात अर्थ नसेल कदाचित पण इथे केवळ 'अर्थ' असून चालत नाही. 'मोड पायजेल, सुट्टे पायजेत,' चिल्लर होता, तरच काही अर्थ. चिल्लर नसली की भाजीवाली पिशवीतून भाजी खस्सकन ओढून घेते, कंडक्टर अर्ध्या वाटेवरच उतरवतो अन् पानवाला आपल्या खिशात शंभराची नोट असली तरी चिल्लर नाही या जबरदस्त गुन्ह्याखाली भिकाऱ्याला तिष्ठत ठेवावं तसं ताटकळत ठेवतो. त्यापेक्षा नाणे टंचाई बळी परवडला. पण हा निराशावाद दिसतो तो गिऱ्हाईकांमध्येच. व्यापारी लोक मात्र खुषीत दिसतात.

फार पूर्वी विजयी राजे आपल्या अंकीत प्रदेशावर आपलंच राज्य आहे हे ठासून सांगण्यासाठी स्वतःची छबी असलेली मोहोर पाडीत. मोगलकालीन, पेशवेकालीन, ब्रिटीशकालीन नाण्यांबद्दल आपण ऐकलं आहे. हल्ली व्यापारी मंडळींनी भारतीय अर्थव्यवस्थेला काही प्रमाणात पराभूत करून यशाचं प्रतीक म्हणून स्वतःची कूपन्स, टोकन्स काढलीत हीच बेकायदेशीर नाणी वर्षभरापासून चलनात आली आहेत. असल्या गंभीर समस्यांबाबतही जर सरकार डोळ्यांवर कातडं पांघरूण बसणार असेल तर गरीब बिचाऱ्या जनतेनं काय करावं? राजा, नाणे टंचाईचा उगम व विकास याबद्दल तर मी बोललोच, पण याचा शेवट कसा होईल हे जर तू सांगू शकलास तर माझ्या खिशातलं दहा पैशाचं एकूलतं एक नाण बक्षीस म्हणून तुला जाहीर करतो."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, नाणे टंचाईचा त्रास दुकानदारांनाही होत नसेल हे कशावरून? अर्थात बऱ्याच व्यापाऱ्यांनी यात आपलं उखळ पांढरं करून घेतल्याचं नाकारता येत नाही. धातूच्या वाढत्या किमतीमुळे सरकारला छोट्या मूल्यांची नाणी परवडत नाहीत. नफेखोरीसाठी नाणे टंचाईचा आभास निर्माण करणाऱ्यांचा प्रयत्न फक्त सरकारच हाणून पाडू शकतं. त्याचबरोबर ग्राहक संघटनेला आपलं अस्तित्व सिद्ध करायची वेळ आली आहे. गिऱ्हाईकाला

जशी दुकानदाराची गरज असते तशीच गरज दुकानदारालाही असते. सर्वच बाबतीत 'सेलर्स मार्केट' असल्यासारखं दुकानदारांनी वागू नये अन् ते तसे वागत असल्यास संघटितपणे गिऱ्हाईकांनी त्याचा प्रतिकार करावा. नको असलेली वस्तूही जर दुकानदार 'चिल्लर नाही' या सबबीवर माथी मारणार असेल तर त्याचा स्पष्ट शब्दात इन्कार करावा. तसे न केल्यास दुकामदाराचे फावते. पान व सिगरेट शौकिनांनी काही दिवस मनोनिग्रह पाळल्यास नाक मुठीत धरून पानवाल्यांना चिल्लर द्यावीच लागेल. दैनंदिन आर्थिक व्यवहार जर काही दिवसांकरता अर्ध्यावर आणलेत तर येणाऱ्या मंदीमुळे व्यापारी बंधू अस्वस्थ होतील. पण ही मंदीची लाट कोणी एकटादुकटा आणू शकत नाही. सर्वांचीच साथ हवी. व्यापारी बधूंचा यात काही हात नसल्यास सरकार–सरकार नावाचा एक प्राणी असतो त्याला समस्त जनता भेडसावून हा प्रश्न सोडवण्यास जेरीस आणू शकते. शेवटी महत्त्वाचं एकच, जे काय पाऊल उचलायचं असेल ते संघटितपणे उचलायला हवं. एकट्या-दुकट्याचं हे काम नव्हे."

अशाप्रकारे राजाचे मौनभंग होताच प्रेतातील वेताळ नाहीसा झाला व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या 'दगडी' भिंतीला लोंबकळू लागला.

□ □

# १२.

## ❋ बहुगुणी अमिताभ ❋

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन चित्रपटगृहाकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेला वेताळ अमिताभ बच्चन जसा 'दिवार'मध्ये मदन पुरीला 'मैंने बचपन में एक कहानी सुनी थी' अशी संथपणे सुरुवात करत, सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबडीची कथा सांगतो, त्याच संथपणे वेताळ चक्रमादित्याला म्हणाला,

"राजा, लहानपणी मी एका मराठी मासिकात चित्रपटसृष्टीत नशीब अजमावणाऱ्या एका धडपडणाऱ्या तरुणाबद्दल वाचलं होतं. लिहिणाऱ्यानं, घोड्यासारखी मान, उंटासारखे पाय वगैरे विशेषणं लावून त्या तरुणाचं चित्र रेखाटलं होतं. शेवटी अशा लंबूनी स्वतःचं तोंड आरशात पाहून चंदेरी दुनियेत प्रवेश करावा असा सबुरीचा सल्लाही त्या 'लिहणाऱ्यानं' दिला होता. मला का कोण जाणे पण त्या धडपडणाऱ्या तरुणाविषयी सहानुभूती वाटली अन् पुढे जाणाऱ्याचे पाय ओढणाऱ्या त्या 'लीवनाऱ्याचा' लई राग आला.

पुढे 'सात हिंदुस्थानी'पैकी या एका धडपडणाऱ्या हिंदुस्थानीला चित्रपटात काम करण्याचा 'परवाना' मिळाला. पण बिचाऱ्याची एकेक 'गहरी चाल' फसू लागली. नशिबाचा 'त्रिशुल' बुमरँगसारखा उलटला अन् हा तरुण 'चुपके चुपकेच' स्वगृही परतणार तोच 'जंजीर'नं त्याला थोपवलं. 'आनंद'नं त्याची

पावलं स्थिर केली. अन् कलाकारांमधली स्पर्धात्मक 'दिवार' ओलांडून तो सुपरस्टार या पदावर जो आरूढ झाला तो खाली उतरेचना. ज्याच्याबद्दल आपल्याला पहिल्यापासून सहानुभूती वाटत होती तो माणूस इतका वर गेल्याचे पाहून आमची तबियत फार खूष झाली. फ्लॉप हिरो म्हणून त्याची संभावना करणारा तो 'लीवनारा' कदाचित या यंग मॅनचं अँग्री रूप पाहून घाबरून पळाला असेल. मग पुढे मी अमिताभ नावाचा गजर करणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीत सामील झालो. राजा, अमिताभ या चार अक्षरात सगळं काही आलं.

अमिताभच्या अभिनयाची उंची मोजायचा काही खुजे लोक फार प्रयत्न करतात. ही उंची अनस्केलेबल आहे हे माहीत असूनही त्याची इतरांशी तुलना केली जाते. त्याला विनाकारण 'शक्ती' परीक्षा द्यावीच लागते. आपला रेट सर्वांत जास्त ठेवण्यात व प्रसिद्धीचं वलय स्वत:भोवती निर्माण करण्यात अमिताभ आघाडीवर आहे पडद्यावरचा अमिताभ नामक 'लावारिस'ची योग्य 'परवरीश' न झाल्यामुळे व पुढे 'अदालत'मधील 'अंधा कानून' असह्य झाल्यामुळे निर्माण होणारे डोळ्यातील लाल-भडक 'शोले', 'इन्कलाब'पर्यंत धगधगत होते. अन ती 'एक नजर' पाहायला कितीतरी 'अमर अकबर अँन्थनी' तिकिटासाठी रांगा लावून उभे असायचे.

अमिताभच्या चित्रपटसृष्टीतील कामगिरीचे 'आखीर अमिताभ तो अमिताभ है' याच एका वाक्यात वर्णन करता येईल. प्रश्न असा की, हिंदी चित्रपटसृष्टी अक्षरश: दणाणून सोडणारा हा, दे दणादण, छोरा गंगा किनारेवाला ऑफर आली असतानासुद्धा इंग्रजी चित्रपटांकडे का वळला नाही? 'पुकार' सारख्या टुकार सिनेमात वेळ घालवण्याऐवजी या महान अभिनेत्यानं धडधाकड असतानाच हॉलीवूडला मुलुखगिरी का केली नाही? शशी कपूर, कबीर बेदी, पर्सीस खंबाटा या तशा दुय्यम अभिनेत्यांपेक्षा अमिताभला इंग्रजी चित्रपटात पाहून मजा आला असता. अशा या आनंदाला आपण का मुकलो? राजा, या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू न दिल्यास अँग्री यंग मॅन अमिताभ बच्चनचा संचार माझ्या अंगात व्हायला वेळ लागणार नाही."

यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, अमिताभचं अॅक्टींग टॅलेंट त्याचे शत्रूही मान्य करतील पण या टॅलेंटच्या जोडीला धूर्तपणा व नशिबाची साथ घेऊन तो आला आहे. तू फक्त पडद्यावरचा अमिताभ पाहिलास पण मी पडद्याबाहेरचा अमिताभ अभ्यासला आहे. टॅलेंटवाली बरीच मंडळी फिल्मी दुनियेत आहेत. कोणाचे तारु गृहकलहाच्या भोवऱ्यात सापडतात अन् अपयशाच्या खडकावर जाऊन आदळतात. कोणी बुवाबाजीच्या, बाईच्या नादी लागत. एखाद्या राजकुमाराचा विक्षिप्त स्वभावच त्याला नडतो. अमिताभ मात्र शंभर टक्के

व्यवहारी आहे. जेवढ्यास तेवढं ही रोखठोक नीती. पडद्यावरचा अमिताभ भलेही बेफिकीर असेल पण पडद्याबाहेरचा अभिताभ 'सिक्युरिटी माईंडेड' आहे. करियरच्या बाबतीत कॅलक्युलेटेड रिस्क घेणारा. काही नवीन प्रायोगिक वगैरे त्याच्या स्वभावात बसत नाही. त्यामुळेच वेळ नाही या सबबीवर इंग्रजांना 'चले जाव' केलं असेल. तसा कलात्मक चित्रपटातही अमिताभ भाव खाऊन गेला असता. पण फारसा पैसा, प्रसिद्धी मिळत नसतानाही तिकडे वळायला तो काही शशी कपूर नाही. इंग्रजी चित्रपटांशी त्याचं हे गणित जमलं नसावं. म्हणूनच इंग्रजी चित्रपटांत कामं करण्याची उत्सुकता त्यानं दाखवली नसावी."

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व 'मि. नटवरलाल'च्या 'शराबी' पोस्टरला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# १३.

## ※ अल्लड बालिका आणि महापालिका ※

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन रस्त्यातले खाचखळगे चुकवत बसस्टँडकडे चालू लागला. तेव्हा प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला, " राजा, तुझ्या अंगातले शॉक–अप रस्त्यातल्या खड्ड्यासमोर कुचकामी ठरत आहे. धक्क्याच्या तीव्रतेवरून खड्डा किती खोल असावा हे गणित मी सोडवत नाही, तोच दुसरा धक्का बसतो अन् डोक्यातलं गणिती समिकरण उडून जातं. अंगाची हाडं खिळखिळी होतात अन् जिभेला हाड नसल्यामुळे रस्त्याची निर्माती महापालिका हिला जनपदात शिवी हासडणार तोच आठवलं की, 'अरेरे, आपली महानगरपालिका किनई आता दोन वर्षांची झाली आहे तेव्हा तिचं कोडकौतुक करायचं सोडून...' छ्या ! या वयात खरं तर 'शी' आणि 'शू' सारखी 'शिशू' कर्मे कुठंही उरकायची मुभा असते. म्हणूनच तर म्हणतो महापालिका म्हणजे अल्लड बालिकाच आहे. फारच खोडकर. एखाद्या आजोबांना डोळ्यावरची चाळीशी दगा देते अन् बिचारे 'रस्त्यातल्या खड्ड्यात' धडपडतात. 'बेवडा होगा साला' पादचाऱ्यांची प्रतिक्रिया हवेत मुरते अन् अल्लड बालिका हा सर्व सीन एन्जॉय करत असते. फिल्मी स्मगलरांच्या ऐटीत चालणाऱ्या एखाद्या कॉलेज कुमाराला रस्त्यातलं केळाचं साल दगा देतं अन् हे महाशय स्वप्नसृष्टीतून खाडकन सत्यसृष्टीतील मुन्सीपालटीच्या रस्त्यावरच आदळतात. अल्लड बालिका टाळ्या पिटून याचाही आस्वाद घेते. अवघे दोन वर्षे वय ! अजून बिचारीनं नीट बाळसंही

धरले नाही. एखाद्या 'कु.'चे 'सौ.' मध्ये रुपांतर व्हावं तसं नगरपालिकेचं महापालिकेत रुपांतर झालं बरं या कु. सुद्धा सौ. झाल्यावर वर्ष दोन वर्षातच कर्तृत्ववान नवऱ्याच्या साथीनं स्वत:त काही बदल घडवून आणतात, पण महापालिकेकडून बदल अपेक्षिलेल्याच्या पदरी निराशाच पडली. बरेच दिवस तर प्रशासकांची खर्चीच रिकामी होती. तसं प्रशासकांच्या भरतीमुळे खड्ड्यात पडून चारऐवजी दोन दात पडतील अशी गोष्ट नाही. दात पडायचे तेवढे पडतीलच. मग दात–ओठ खाऊन म्हणजेच उरलेले दात रक्ताळलेला ओठ चावून तुम्ही नशिबाला दोष देत कपडे झटकून चालायला लागता अशाच नयनरम्य अवस्थेत मला माझा एक कवी मित्र भेटला. पंक्चर सायकल एका हाताने रेटत नेणाऱ्या कवीमहाशयांनी स्वयंस्फुर्तता व शिघ्र कवित्वाची ग्वाही देत रस्त्यावरच्या खड्ड्यावरच कविता रचली. 'रस्त्यावरच्या खाचखळग्यांवरती असंख्य पंक्चरवाले पोटाची खळगी भरती.' कवीप्रमाणेच प्रेमी युगूलांना चंद्रानंतर खड्ड्याचं आकर्षण राहील. दुचाकी वाहनावरून प्रवास करणाऱ्या जोडप्यांमध्ये अधिक अवळीक या खड्ड्यामुळेच निर्माण होते. अशावेळी बावचळलेल्या 'ती' वा 'तो' 'हा दोष रस्त्यातल्या खड्ड्याचा नसून तुझ्या उफाळत्या यौवनाचा आहे', असं शकुंतलेच्या सखीच्या थाटात ऐकवत असेल. पण हेच खड्डोबा कोपले की माणसाचे नाहक बळी घेतात.

'मनपा' या पाळण्यातल्या नावानंच ओळखल्या जाणाऱ्या या बालिकेनं आल्याआल्याच शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा क्रांतीचौकात उभारला. थोडा वेळ लोक सुखावले, पण पावसाळ्यात मात्र महाराजांच्या पाठीमागे पाण्याचं तळंच साचायचं अन् शिववाला 'पाण्यात पाहताना' आपल्या तुटक्या बोटांकडे पाहणाऱ्या शाहिस्तेखानासारखे ओशाळल्यागत होत होतं. तसे आपल्याकडे डबक्याचे दोन प्रकार आहेत. बारमाही व हंगामी. पाईप लाईन फुटल्यामुळे निर्माण होणारी डबकी ही बारमाही सदरात मोडतात व पावसाळ्यात निर्माण होणारी हंगामी. इतकं सगळं असल्यावर स्विमींग पुलसची आवश्यकता कोणाला वाटणार? हल्ली रस्त्यावर गर्दी अतोनात वाढली असल्यामुळे 'कैसे जाऊ जमुनाके तीर' ही ओळ रस्ता ओलांडायच्या वेळेस क्लासिकल गायकांप्रमाणे शंभर वेळा म्हणावी लागते. त्यात गुलमंडची गुलहौशी गर्दी काही औरच! या गजबजत्या बाजारपेठेतील अरुंद रस्त्यावरून बस जायला लागली की मुंग्यांच्या बिळात साप शिरताना मुंग्या जसा दबा धरून बसतात तसाच दबा धरून लोक अवघडून उभे असतात. तरीही बस सर्व्हिस असल्या अरुंद रस्त्यावरून चालूच आहे.

तशा बऱ्याच गोष्टी बंद व्हाव्यात म्हणून नागरिक तक्रारी करतच असतात. सिल्लेखान्यातील कत्तलखाना त्यातलाच. दुर्गंधीमुळे या रस्त्यावरून पादचाऱ्यांना दीर्घश्वसन हा अवघड आसन प्रकार केल्याशिवाय पुढचं पाऊल टाकताच येत नाही.

त्यात पावलोपावली हाडा-मांसाकरता टपलेले कुत्रे आडवे येतात. शिळ्या हाडा-मांसाऐवजी बाजूनं जाणाऱ्या माणसांचा ताजा ताजा लचकाच का तोडू नये असा विचार जर कुत्र्यांच्या मनात आला तर ? माझ्या सुदैवानं याबाबतीत माझे अन् कुत्र्यांचे विचार जुळले नाहीत. कधीमधी कुत्री पकडणारी मुन्सिपालटीची गाडी गावभर फिरवली जाते. गल्लोगल्लीचे बेवारस कुत्रे अंदर होतात. एरवी पाहता-क्षणीच एकमेकांचे लचके घ्यायला टपलेली कुत्रेमंडळी मुन्सीपालटीच्या गाडीत बंद केली की, मवाळपणे एकमेकाची अंग चाटू लागतात. निवडणुकांच्या वेळी विरोधी पक्षांच्या ऐक्याची बोलणी सुरू होते अगदी तसंच !

परवा अशाच एका गाडीतल्या दोन कुत्र्यांचा संवाद ऐकला. त्यातला एक निर्ढावलेला कुत्रा आपल्या मित्राला समजावत होता. "घाबरण्याचं काही एक कारण नाही. गाडीच्या ड्रायव्हरला चहा-पाण्याला पाच-दहा रुपये दिलेत की कुत्रं आपोआप सोडवून मिळतं. मागे अनेकदा माझ्या मालकानं मला असच सोडवलं आहे. यावेळेस मी तुझीही शिफारस करीन."

राजा, मानवनिर्मित भ्रष्टाचाराची कुत्र्यांनीही आपली लाळ गाळेपर्यंत भलावण करावी, गंमतच आहे की नाही ! राजा, या परिस्थितीत काही बदल होऊ शकेल असं तुला वाटतं का ? माझ्या या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू न दिल्यास तुला शहरातल्या खास निवडक अशा गलिच्छ वस्त्यांमधून सकाळ-संध्याकाळ पन्नास चकरा माराव्या लागतील."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, बदल करणं न करणं सर्वस्वी लोकांच्या हातात आहे. त्यासाठी एकट्या मनपाला दोष देण्यात अर्थ नाही. अगदी सुरुवातीलाच मनपानं पडणाऱ्या घरांना नोटीसेस बजावल्या काहींनी त्यांची दखल घेतली नाही, मग पावसाळ्यात मनुष्यहानी होते. तसेच अतिक्रमणे, बेकायदेशीर उभारलेल्या पानटपऱ्या व तत्सम दुकाने, बेकायदेशीर बांधकाम या सर्वांविरुद्ध मनपानं धडाक्यानं मोहिम उघडली होती. पण राजकीय हस्तक्षेप, चांगल्या प्रशासकाच्या डोक्यावर असलेली बदल्यांची टांगती तलवार त्यामुळे मनपा अकार्यक्षम ठरते. मध्यंतरी कावीळीनं मनपाला हैराण केलं. अशावेळी जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो. आपल्याकडे वैयक्तिक स्वच्छतेइतकं सार्वजनिक स्वच्छतेकडे लक्ष दिलं जात नाही म्हणूनच अजंता, एलोराचे तेच तेच फोटो घेऊन कंटाळलेले फॉरेनर्स कचऱ्याचे ढीग, झोपडपट्टी असलं काही दिसलं की, कॅमेरे सरसावतात. अन् आपणही "रामानं यावं आणि टिकली मारून जावं"च्या चालीवर "फॉरीनरनी यावं आणि 'क्लिक' करून जावं" म्हणतो. मनपाचा पिच्छा पुरवून सार्वजनिक हिताकडे लक्ष दिल्यास सद्य:परिस्थितीत निश्चितच बदल होऊ शकतो."

अशाप्रकारे राजाचे मौनभंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व अल्लड बालिकारुपी महापालिकेनं लावलेल्या 'सुंदर औरंगाबाद'च्या पाटीला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# १४.

## सोळावं वरीस बँकांचं

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला आणि प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन गजबजत्या मेनरोडवरून चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेला वेताळ म्हणाला, "राजा, सहज आजूबाजूच्या पाट्यांवर नजर टाकली तर त्यात अमुक बँक, तमुक बँक या बँकेच्याच पाट्या अधिक दिसतात. बँकांबद्दल खास चर्विनं बोलायचं कारण म्हणजे राष्ट्रीयकृत बँका आता सोळा वर्षांच्या झाल्या आहेत. षोडशवर्षीय म्हटलं की नजर खिळणारच. भलेबुरे विचार मनात येणारच. या बाली उमरला हिंदी सिनेमानं लई पाप्युलर करून ठेवले आहे. 'सोळावं वरीस धोक्याचं' अशी धोकेबाज सूचना ही एका डोकेबाज कवीनं केलेली आहे. ती बँकेच्या बाबतीतही चपखल बसते. बरं ही षोडशा काही साधीसुधी नाही. कोण्या एकाच्याच मालकीचीही नाही. आहे तर ती राष्ट्रीयकृत, सार्वजनिक वगैरे वगैरे. सार्वजनिक म्हटल्यावर तमाम पब्लीकचं 'लाॅखोंकी रानी' बद्दल आकर्षण वाढणारच. पनघटवर प्यासे लोकांची गर्दी होणारच. मग ही षोडशी कशीबशी कळशी सावरत पुढे सरसावते. हजारो ओंजळी पुढे येतात. कळशी रिकामी करून ती ठुमकत ठुमकत निघून जाते. बरेचशे अभागी जीव 'प्यासे'च राहतात व कळवळून म्हणतात, सोळा वर्षांपूर्वी जशी 'बेवफा' होती तशीच आताही आहे. वृत्तीत काही फरक पडला नाही.

राजा, १९६९ साली बँकांचं राष्ट्रीयकरण वगैरे झाले हा इतिहास तुला माहीतच आहे. तसेच शेक्सपिअरचा व्हेनिस शहरातील शायनाॅक नावाचा व्यापारी

कर्जदारानं कर्जाची परतफेड न केल्यामुळे त्याच्या अंगावरचं मांस कापायची सिद्धता करतो. ही कथाही तुला माहीत असेलच. याच शॉयनॉकच्या जातकुळीतील भारतीय मंडळी अंगठा बहाद्दर लोकांना अंगठा दाखवण्याचं काम चोख पार पाडीत आहेत. वहीखात्याच्या जोरावर मदर-इंडियाला लुबाडणारा सुखीलाल साहुकार पडद्यावर आपण पाहिलाच. व्हेनिसच्या या व्यापाऱ्यापासून सावकारी वृत्तीवर टीका होऊ लागली.

पुढे याच व्हेनिसमध्ये शास्त्रशुद्ध वहीखाते लिहिणाऱ्या अकाऊन्टसीचा जन्म झाला. इकडे डार्विनचं माकडही 'आता कशाला उद्याची बात' या बेफिकीर वृत्तीतून वर आलं होतं त्याच्या खिशात चलनी नाणी, नोटा खुळखुळू लागल्या. पोट भरल्यावर उरलेली भाकर व्यवस्थित गड्ड्यात पुरणारे चतुष्पाद प्राणी पाहून 'बचत' हा शब्द त्यांच्या तोंडून निघाला असावा. इथून पुढं बचतीला केन्द्रस्थानी मानून बँकिंग व्यवहाराचं जाळं विणण्यात आलं, पण नंतर बचतीपेक्षा कर्जाचं अन् बँकांचं नातं अधिक घट्ट बनलं. अजूनही लोकांना कर्जाची तहान लागल्याशिवाय बँकेची आठवण येत नाही.

आता कल्पना करा की, कर्जरुपी पाणी मागायला कोणीतरी एक तहानलेला बँकेत आला आहे अन् काकुळतीनं विचारतो, 'साहेब, थोडं पाणी मिळेल का प्यायला?' काहीच न बोलता तीनचार साहेबलोक नुसतं त्याचं आपादमस्तक निरीक्षण करतील 'साहेब मी पाणी मागतोय.' तो परत अजीजीनं म्हणेल. अन् त्यांच्यातला एकजण त्याच्यावर उखडेल, 'महाशय, तोंडी काय मागताय, अर्ज करा अर्ज.' मग तो तहानलेला बिचारा, 'मला खूप तहान लागलीय, मेहेरबान साहेबांनी मला पाणी देण्याची कृपा करावी.' हा मजकूर डोळ्यांत पाणी आणून लिहील.

'अहो, एका कॉपीनं काय होतंय, अजून कॉपीज् काढा' परत आदेश येईल त्या आदेशाचं पालन करत तहानलेला जीव कॉपी खरडत राहील. कागदाचा अर्धा एक किलो ढीग जमल्यावर, 'तुमचा प्रस्ताव विचाराधीन आहे,' हे त्याला वरचेवर कळवलं जातं. परत एकदा कंटाळून तो विचारेल, 'साहेब, ते आपल्या पाण्याचं काय झालं?' अन् उमळून साहेब त्याला विचारतील,

'कशावरून तुम्हाला तहान लागली हे आम्ही खरं मानायचं?'

'माझ्या घशाला कोरड पडली हो.' तो कसाबसा बोलेल.

'पण तरी आमच्या डॉक्टरांनी तुमचा घसा तपासल्याशिवाय तुम्हाला पाणी देता येणार नाही'

मग सावकाश डॉक्टर येऊन तपासतील अन् म्हणतील, 'देऊन टाका बिचाऱ्याला अर्धा ग्लास पाणी.' पण मला खूप तहान लागली, 'कमीतकमी एक ग्लास पाणी तरी द्या हो.' उरलसुरलं त्राण एकवटून तो म्हणेल. 'प्यायचं असलं तर अर्धा ग्लास प्या. नाही तर दुसरीकडे बघा.' हे निर्वाणीचं वाक्य ऐकल्यावर तो बिचारा तहानलेला जीव म्हणेल, 'बरं अर्धा तर अर्धा ग्लास आणा बुवा लवकर.' 'थांबा, इतक्यात कसं देता येईल पाणी ? तुम्ही पाण्याचा योग्य तोच वापर कराल याची हमी देणारे दोन गॅरेण्टर आणा पहिले.' मग अंगातलं बळ एकवटून तो तहानलेला पायपीट करील. कसेबसे दोन गॅरेण्टर उभे करील व अधिरतेने प्याला तोंडाला लावेल. काही तर नुसतं पाणी पाणी करतच तडफडतात, काही पाणके वाटपापूर्वी एक दोन घोट पाणी स्वतःही चाखून पाहतात म्हणे ! या सर्वांमुळे कर्ज हा निव्वळ हास्यास्पद प्रकार झाला आहे. दुसरा इनोदी प्रकार म्हणजे बँकेतला पत्रव्यवहार. चेक फोर्जरीसारख्या व्हाईट कॉलर क्राईमसोबतच हल्ली दरोड्यासारख्या भीषण प्रकारांनाही बँकवाल्यांना तोंड द्यावं लागतं. त्यामुळे पूर्व खबरदारी म्हणून एखादा जागरूक अधिकारी त्याच्यावरच्या साहेबांना सिक्युरिटी 'अॅरेजमेंट' संबंधी कळवतो. सावकाश साहेबाचं उत्तर येतं, 'तुमच्या पत्रावरून तुम्हाला सिक्युरिटी गार्डची आवश्यकता आहे हे कळले, ते खरं आहे का ?' मग परत पत्र पाठवावं लागतं, 'हो ते खरं आहे.' मग परत सावकाश पत्र, 'पत्र मिळालं, विचार करू.' 'लवकर व्यवस्था करा.' बिचारा वैतागून लिहितो. परत उत्तर येतं, नियमात बसल्यास व्यवस्था करू.' या पत्रकारितेला कंटाळून तो गप्प बसत नाही तोच उत्तर येत, 'रेफर अमुक अमुक सरक्युलर डेटेड सो अॅण्ड सो, त्यानुसार सिक्युरिटीची व्यवस्था करता येणार नाही. मॅटर क्लोज.' कोठलाच निर्णय घ्यायचा नाही हाच एकमेव निर्णय घेतलेले लोक 'मॅटर क्लोजचा' छुपा आसरा घेतात राजा, राष्ट्रीयकरण होऊन सोळा वर्षे झालेल्या बँकेची पावलं अधोगतीकडे वळताहेत की प्रगतीकडे ? या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू व्यवस्थापनासारखं उत्तरं द्यायची टाळाटाळ केल्यास तुला बँकेतील कंटाळवाणी सरक्युलर्स मुखोद्गत करावी लागतील."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, बँकांचं राष्ट्रीयकरण हे समाजवादाचे दिशेनं टाकलेलं धीट पाऊल होय. तरीही मिश्र अर्थव्यवस्थेचे भलेबुरे परिणाम बँकिंग क्षेत्रातही दिसतात. राष्ट्रीयकरणानंतर बँकांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली. ठेवीमध्ये भरघोस भर पडली, कर्ज वाटपही पुष्कळ झाले. ठेवी वाढल्यात यावरून बँकेनं जनतेचा विश्वास संपादन केला हे दिसून येतंच. कर्ज वाटण्याच्या बाबतीत मात्र 'मागणाऱ्याचे हात हजार, दुबळी माझी झोळी' असा उलटा प्रकार होतो. कर्ज वाटप जर निष्काळजीपणे झालं. तर तो एक 'रडवेला' प्रकार

होईल काही डोकेबाज काळ्या मेंढरांना या व्यवसायातील नसन्‌नस माहीत असते. मग डोकेबाज वकील मंडळींना हाताशी धरून बँकेला गंडवण्याचे खेळ सुरू होतात. त्यापेक्षा कर्ज वाटपाची क्लीष्ट पद्धत हास्यास्पद वाटत असली तरी तीच धोपटणं श्रेयस्कर.

आता बँक व्यवस्थापनाविषयी. सरंजामशाहीत धनिकांच्या हातात बँकांचा धंदा होता. राष्ट्रीयकरणासाठी पुरेसा मोबदला मिळूनही काहींनी व्यवस्थापनात हस्तक्षेप सुरूच ठेवला.

वेताळा, आपल्या पायाला धूळ लागू नये म्हणून राज्यातील सर्व रस्त्यावर जनावराचे कातडे पांघरण्याचा आदेश देणाऱ्या मूर्ख राजाची कथा तुला माहीत असेलच. आपल्या हुकूमाची अंमलबजावणी होत नाही म्हणून तो हाताखालच्या लोकांना सुळावर चढवतो. शेवटी एक चांभार राजाला सांगतो, 'महाराज, पायाला धूळ लागू नये म्हणून रस्त्यावर कातडे पांघरण्याऐवजी तुम्ही स्वतःच्या पायाला कातडे का नाही गुंडाळत?' असं म्हणून तो राजाला दोन जोडे बहाल करतो. मग राजाला चूक उमगते.

आपल्याकडे स्थानमहात्म्याला विसरायला लोक तयार नाहीत. सर्वांचेच विचार ऐकलेत तर वैचारिक शैथिल्य गळून पडेल. विचारांना महत्त्व दिल्यास लोक विचार करू लागतील. अमेरिकेसारखंच गतिमानतेला महत्त्व येईल. तिथं चेक्सवर सगळे व्यवहार चालत असूनही एखादा चेक हरवला की सगळ्या बँकांच्या स्क्रीनवर 'चेक नंबर अमूक अमूक डू नॉट कॅश! वॉर्निंग!' ही अक्षरं लगेच झळकतात. आपल्याकडे मनुष्यबळामुळे कॉम्प्यूटरलाही मान्यता नाही. माणसांना तर किंमत नाहीच. विदेशात "आय ट्रस्ट यू" या एका वाक्यावर मोठमोठे व्यवहार चालतात. ते सांभाळणारे कॉम्प्यूटर्स व शब्द पाळणारी माणसंही तिकडे असतात. तरीही आपल्या बँकेपुढे अनेक समस्या असूनही तिचं कार्य मध्यम गतीनं का होईना पण चाललंय. या गतीला अधोगती न म्हणता मी तरी प्रगतीच म्हणेन."

अशाप्रकारे राजाचे मौनभंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व कोठल्याशा नॅशनलाईज बँकेच्या बोर्डाला लोंबकळू लागला.

□ □

# १५.

## ❋ जाहिरातबाजी ❋

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बस स्टँडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेल्या वेताळाने राजाच्या डाव्या खिशातून 'अॅस्प्रो', उजवीकडून 'अॅनासीन' व शर्टाच्या खिशातून 'सॅरीडॉन' काढून, तिन्ही गोळ्या एकदम मटकावल्या व डोकेदुखीच्या गोळ्यांची जाहिरात करणारा माणूस पाहणाऱ्यांची डोकेदुखी वाढवत जसा गोळ्यांची तरफदारी करीत एक, दोन, तीन म्हणून फायदे सांगत सुटतो तसा वेताळ म्हणाला, –

"राजा, डोकेदुखीच्या तीन गोळ्या एकदम खाण्याचं कारण म्हणजे, एक – आजच्या युगातील प्रचंड जाहिरातबाजी, दोन – त्यामुळे निर्माण झालेली डोकेदुखी व तीन – त्यावरील एकमेव उपाय– या असल्या गोळ्या खाणं. दैनंदिन कटकटींच्या कैचीतून सुटका मिळावी म्हणून चित्रपटगृहात जाऊन बसावं तर जाहिरातींचा खेळ चाललेला असतो. त्यात हल्ली आंघोळ करणाऱ्या बायाच जास्त दिसतात पडद्यावर. जीवनातल्या धुंद अनुभवांचे क्षण वेचणाऱ्या दोन मायलेकी एकमेकींच्या अंगाला साबण फासतात, मग मातीत लोळतात व पाण्यात उडी घेऊन आपली जगावेगळी आंघोळ संपवितात. देन कम्स ओयॅसिस सुंदरी. ही सुंदरी आंघोळ करताना उगीचच हसते, 'माझ्या विश्वासाचा साबण' असं म्हणत अख्खी वडी अंगावर घोळवते.

खरं तर साबणासारख्या चोपड्या, गुळगुळीत वस्तूवर मुळीच विश्वास

होईल. काही डोकेबाज काळ्या मेंढरांना या व्यवसायातील नसन्‌नस माहीत असते. मग डोकेबाज वकील मंडळींना हाताशी धरून बँकेला गंडवण्याचे खेळ सुरू होतात. त्यापेक्षा कर्ज वाटपाची क्लीष्ट पद्धत हास्यास्पद वाटत असली तरी तीच घोपटणं श्रेयस्कर.

आता बँक व्यवस्थापनाविषयी. सरंजामशाहीत धनिकांच्या हातात बँकांचा धंदा होता. राष्ट्रीयकरणासाठी पुरेसा मोबदला मिळूनही काहींनी व्यवस्थापनात हस्तक्षेप सुरूच ठेवला.

वेताळा, आपल्या पायाला धूळ लागू नये म्हणून राज्यातील सर्व रस्त्यावर जनावराचे कातडे पांघरण्याचा आदेश देणाऱ्या मूर्ख राजाची कथा तुला माहीत असेलच. आपल्या हुकूमाची अंमलबजावणी होत नाही म्हणून तो हाताखालच्या लोकांना सुळावर चढवतो. शेवटी एक चांभार राजाला सांगतो, 'महाराज, पायाला धूळ लागू नये म्हणून रस्त्यावर कातडे पांघरण्याऐवजी तुम्ही स्वतःच्या पायाला कातडे का नाही गुंडाळत?' असं म्हणून तो राजाला दोन जोडे बहाल करतो. मग राजाला चूक उमगते.

आपल्याकडे स्थानमहात्म्याला विसरायला लोक तयार नाहीत. सर्वांचेच विचार ऐकलेत तर वैचारिक शैथिल्य गळून पडेल. विचारांना महत्त्व दिल्यास लोक विचार करू लागतील. अमेरिकेसारखंच गतिमानतेला महत्त्व येईल. तिथं चेक्सवर सगळे व्यवहार चालत असूनही एखादा चेक हरवला की सगळ्या बँकांच्या स्क्रीनवर 'चेक नंबर अमूक अमूक डू नॉट कॅश ! वॉर्निंग !' ही अक्षरं लगेच झळकतात. आपल्याकडे मनुष्यबळामुळे कॉम्प्यूटरलाही मान्यता नाही. माणसांना तर किंमत नाहीच. विदेशात "आय ट्रस्ट यू" या एका वाक्यावर मोठमोठे व्यवहार चालतात. ते सांभाळणारे कॉम्प्यूटर्स व शब्द पाळणारी माणसंही तिकडे असतात. तरीही आपल्या बँकेपुढे अनेक समस्या असूनही तिचं कार्य मध्यम गतीनं का होईना पण चाललंय. या गतीला अधोगती न म्हणता मी तरी प्रगतीच म्हणेन."

अशाप्रकारे राजाचे मौनभंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व कोठल्याशा नॅशनलाईज बँकेच्या बोर्डाला लोंबकळू लागला.

□ □

# १५.

## ❋ जाहिरातबाजी ❋

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही तो खांबाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बस स्टँडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेल्या वेताळाने राजाच्या डाव्या खिशातून 'अॅस्प्रो', उजवीकडून 'अॅनासीन' व शर्टाच्या खिशातून 'सॅरीडॉन' काढून, तिन्ही गोळ्या एकदम मटकावल्या व डोकेदुखीच्या गोळ्यांची जाहिरात करणारा माणूस पाहणाऱ्यांची डोकेदुखी वाढवत जसा गोळ्यांची तरफदारी करीत एक, दोन, तीन म्हणून फायदे सांगत सुटतो तसा वेताळ म्हणाला, –

" राजा, डोकेदुखीच्या तीन गोळ्या एकदम खाण्याचं कारण म्हणजे, एक – आजच्या युगातील प्रचंड जाहिरातबाजी, दोन – त्यामुळे निर्माण झालेली डोकेदुखी व तीन – त्यावरील एकमेव उपाय– या असल्या गोळ्या खाणं. दैनंदिन कटकटींच्या कैचीतून सुटका मिळावी म्हणून चित्रपटगृहात जाऊन बसावं तर जाहिरातींचा खेळ चाललेला असतो. त्यात हल्ली आंघोळ करणाऱ्या बायाच जास्त दिसतात पडद्यावर. जीवनातल्या धुंद अनुभवांचे क्षण वेचणाऱ्या दोन मायलेकी एकमेकींच्या अंगाला साबण फासतात, मग मातीत लोळतात व पाण्यात उडी घेऊन आपली जगावेगळी आंघोळ संपवितात. देन कम्स ओयॅसिस सुंदरी. ही सुंदरी आंघोळ करताना उगीचच हसते, 'माझ्या विश्वासाचा साबण' असं म्हणत अख्खी वडी अंगावर घोळवते.

खरं तर साबणासारख्या चोपड्या, गुळगुळीत वस्तूवर मुळीच विश्वास

ठेवायला नको. हो, याच साबणावर चुकून पाऊल वाकडं पडलं की विश्वासघात! एकदम बत्तीशीच बाहेर पडायची पाळी. एक महामाया तर चक्क अलीकडं डोंगर, पलीकडे डोंगर व दोहोंमध्ये असलेल्या धबधब्यावर आंघोळ नावाचा गोंधळ प्रकार घालत 'अहा लिरील, लिरील!' म्हणून चित्कारते. तिला पाहून बाजूच्या सीटवर बसलेला आमचा मित्र भयंकर एक्साईट होऊन म्हणाला, "संपूर्ण भारतात जर इतक्या उन्मादानं अन तेही खुले आमपणे आंघोळ करणारी बाई जर खरोखरच अस्तित्वात असेल तर तिच्या शोधासाठी काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत सर्व डोंगर-दऱ्यांवर पदयात्रा करायला आपण तयार आहोत. फक्त प्रत्यक्षात असलं काहीतरी..." त्याला पुढं न बोलू देता मी पॉप्कॉर्नचा, बोकणा त्याच्या तोंडात भरवले व त्याला गप्प बसविले.

राजा, फार पूर्वी मत्स्यकन्या, वनबाला वगैरे त्याकाळाच्या आदिवासी युवती असं उघड्यावर स्नान करायच्या. त्यांतही कोणी तहानलेला राजपुत्र शिकारीच्या शोधात भटकत आला अन 'तू तर चाफेकळी, मे आय हेल्प यू' वगैरे काही बोलू लागला की, या युवती विनयानं नृपाला 'हे तर माझे घर' असं म्हणत आपल्या तीर्थरुपांशी गाठ पाडून देत. मग या वाट चुकलेल्या वाटसरूला तीर्थरूप बाहेर जाण्याचा मार्ग दाखवत.

हल्लीच्या सेल्फ कन्टेन्ड बाथरूमच्या जगात हा विनय दिसत नाही. म्हणूनच तर उभे टिंब, आडवे टिंब मोजत रांगोळी घालणाऱ्या सुगृहिणींकडे पाहून केशवसुतांनी 'होते अंगण गोमये सकलही संमाजिले सुंदर' अशी सुरेख कविता केली आहे. हल्ली रांगोळीपेक्षा आंघोळीला जास्त महत्त्व आले आहे. त्यामुळे आजच्या होतकरू केशवसुताने 'होते अंग साबणमये...' अशा थाटाची 'रांगोळी घालताना पाहून'च्या चालीवर 'आंघोळ करताना पाहून' अशी कविता लिहिली तरी नवल नाही. जाऊ द्या

साबणाचा विषय न घोळवलेला बरा. कारण त्यात फसवेगिरीचा फेस अधिक असतो. एक सिनेमा नटी तीन वेगवेगळ्या साबणांची जाहिरात करायची. ते पाहून एकानं तिला विचारलं– "बाई, तुम्ही नक्की कोणता साबण वापरता? कारण जाहिरात तर तुम्ही तीन वेगळ्या साबणांची करता?"

त्यावर ती नटी म्हणाली– "मी दिवसातून तीनदा आंघोळ करते."

या फेसाळणाऱ्या साबणांप्रमाणेच तोंडातून फेस काढणाऱ्या टूथपेस्टच्या जाहिरातीही पाहणाऱ्यांच्या तोंडाला फेस आणतात. बहुतेक जाहिराती फसव्या असतात. पिठाच्या गिरणीत काम करणारा माणूस किंवा फळा पुसून अंगावर खडूची उधळण झालेला गुरुजी, हे दोघ सोडले तर काळ्या कातडीला गोरं

बनवण्याची इतरांची बिशाद नाही. पण हे जाहिरातवाले आपल्याला ही किमया येते याची शंभर टक्के हमी देतात. पडद्यावर 'बडी नाजो से पाली हमारी बन्नो' या ओळीसमवेत 'बन्नो' आईबरोबर प्रवेश करते मग येतो मैत्रिणींचा घोळका. नंतर एक भोपळ्याच्या बियांसारखे दात असलेली छोटी पोरगी बन्नोकडे पाहून दात विचकते. बहुधा ही बन्नोची लहान बहीण असावी. दहा वर्षांपूर्वी थिएटरात प्रेक्षकांच्या साक्षीने बन्नोचं लग्न लागल्याचं मी पाहिलं. तिचा नवरा कर्तबगार आहे, असं गृहित धरल्यास तिला मातृपद प्राप्त होऊन दहा वर्षे झाली असावीत. पण बन्नो अजूनही नव्या नवरीच्या नवलाईने लग्नाला तयार !

तात्पर्य, जाहिरातीत बदल नाही. ठराविक साचा आढळतो. मात्र इथंही अपवाद आहेतच. उदाहरणार्थ रक्तप्रभा घेणारी सारिका दिवाडकर क्रिकेटपटू कुलदीप पटेलला पटवते. या रक्तप्रभावालींनी 'तारुण्या पिटीका' हा सुंदर शब्द मराठी भाषेला बहाल केला आहे. अस्सल मराठी शब्द 'मुरुम' हा बांधकाम खात्यासारखा रुक्ष खात्याशी संबंध दर्शवितो. दुसरा शब्द फुटकुळ्या. तो तर उच्चारावासाही वाटत नाही. 'तारुण्य पिटीका' हा शब्द वाचून या पिटीका असलेले व नसलेले तारुण्य पाहत मी कितीतरी दिवस रस्त्यावर भटकत होतो.

तसंच 'एनर्जी' आणि 'फेमिनाईन फोर्टे' या वस्तुंशी प्रत्यक्षात जरी संबंध नसला तरी जाहिरातींनी मात्र सर्वांशीच जवळीक साधली. तीच प्रगती 'मच्छर अगरबत्ती'च्या जाहिरातीची. काहींना मच्छरांपेक्षा छापलेल्या जाहिरातींचाच अधिक त्रास वाटतो.

या जाहिरातींमध्येही वर्गयुद्ध असतंच. शीतपेयांच्या जाहिराती या इंडियातल्यांसाठी असतात. भारतीयांसाठी नसतात. चिक्कार पैसा उधळून त्या बनवल्या जातात. मात्र थंड पेयाची किंमत ऐकताच न पिताच माणूस 'थंड' पडतो.

यानंतर एकदम 'गजकर्ण, गालगुंड, मूळव्याध, देवीचा रोगी दाखवा व एक हजार रुपये मिळवा.' असल्या भारतीय जाहिराती कोल्ड ड्रिंकनी बनविलेली थंड हवा तापवतात. राजा, आईस्फ्रूट विक्रेत्यांच्या गाड्यांवरची चित्रं कधी पाहिलीत का ? अनारकलीचा हात हातात मागणाऱ्या साहेबेआलम दिलीपकुमारच्या हातात दहा पैसेवाले आईसफ्रूट पाहून हसावं का रडावं हेच कळत नाही. उद्या सिल्क स्मिता जर जाडीभरडी खादी अंगाभोवती गुंडाळून खादी ग्रामोद्योग विकास महामंडळाची जाहिरात करू लागली तर ?

सरकारी जाहिरातींची तर कल्पकतेच्या बाबतीत कफल्लकताच दिसून येते पुरुष नसबंदीच्या जाहिरातीतले दोन मल्ल नसबंदी शिबिरातून चक्क आखाड्यात

उतरवले आहेत. बरं आता पहिलवान मंडळींनी कुस्तीत एकमेकांच्या अंगावर त्वेषानं तुटून पडायला हवं ! पण पुरुष नसबंदीच्या जाहिरातीतले पुरुषत्वाला बाधा नाही हे ठासून सांगण्यासाठी झुंजविलेले दोन पहिलवान इतक्या मवाळपणे एकमेकांना बिलगले आहेत की, त्यांच्या बिलगण्याच्या हेतूसंबंधी पाहणाऱ्यांच्या मनात भलीबुरी शंका निर्माण व्हावी.

खरं तर 'नलगे चंदना पुसावा परिमळ, वनस्पती मेळ हाकारूनी' असं संतवाणी निक्षून सांगत असतानाही या बहुखर्चिक जाहिरातींची गरज आहे असं तुला वाटतं का ? राजा, या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू न दिल्यास तुला डोकेदुखी, सर्दी-पडसं, अंगदुखी वगैरे वगैरे सगळ्या दुखींवरच्या दुःखद जाहिराती पाहाव्या लागतील."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "जाहिरातीचं वर्चस्व जाहिरपणे मान्य करायलाच हवं. मार्क ट्वेन म्हणतो, 'जाहिरात करणाऱ्या दुकानदाराच्या दुकानात गिऱ्हाईकं येतात. तर जाहिरात न करणाऱ्यांच्या दुकानात कोळी कोळीष्टकं बांधायला येतो.' ओरडणाऱ्यांचे आंबट आंबेही खपतात ही गोष्ट दात आंबल्यावर आपल्याला कळते. 'चिंध्या पांघरून सोनं विकायला बसलो, गिऱ्हाईक कुठेही फिरकेना. अंगावर सोनं पांघरून चिंध्या विकायला बसलो, गर्दी हटता हटेना' या सुधाकर गायधनींच्या ओळी इथं चपलख लागू पडतात.

सबब जाहिरातबाजी वाँटेडच. त्यात माऊथ पब्लिसिटी ही सर्वांत परिणाम-कारक – अल्पावधीत लोकप्रिय झालेलं निरमा म्हणतं – 'हेमा, रेखा, जया आणि सुषमा सर्वांची पसंद निरमा' सरकारी जाहिरातीमध्ये निळूभाऊंना लॉटरी सुंदरी हेमामालिनी प्रसन्न होते तशी तुम्हा-आम्हा प्रसन्न होवो असं सांगणारी साठा उत्त-राची कहाणी एकदम झकास जमलीय. जाहिराती अपरिहार्य आहेत म्हणून तर सर्वच कंपन्यांमध्ये स्वतंत्र जाहिरात विभाग व त्यात 'डोस्कं शिणवून' जाहिरात बनविणारे तज्ज्ञ लोक असतात. कंपनीचं उत्पादन जाहिरातीद्वारे जनता जनार्दनासमोर आणलं जातं. तिचं आकर्षक स्वरूप पाहून मन ऑनलूकर गिऱ्हाईक बनवला जातो अन हेच जाहिरातीचं यश.

चंदनाच्या झाडाला आपल्या सुवासाची जाहिरात करावी लागत नाही ही झाली-कवी कल्पना. पण जाहिरातीविना चंदनाच्या झाडाला लाकडाचाही भाव येणार नाही. तुमचं प्रॉडक्ट चांगलं आहे हे जरी सत्य विधान असलं तरी, ते ठासून सांगायला दहा असत्य विधानं करावीच लागतात. ज्याला हे जमतं तोच यशस्वी जाहिरातदार. जाहिरातींपासून तोट्यापेक्षा फायदेच अधिक आहेत. म्हणूनच तर व्यापारी वर्गात जाहिरात याच शब्दाची इतकी जाहिरात झाली की

जाहिरातीशिवाय या स्पर्धात्मक युगात आपला टिकाव नाही हे ओळखून व्यापारी-बंधू अधिकाधीक जाहिरात करतच असतात अन पुढेही करतच राहतील."

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व 'जाहिरातींसाठी संपर्क साधा" अशी स्वतःचीच जाहिरात करणाऱ्या कोठल्याशा अॅडव्हरटायझिंग एजन्सीच्या बोर्डाला जाऊन लोंबकळू लागला.

☐ ☐

उतरवले आहेत. बरं आता पहिलवान मंडळींनी कुस्तीत एकमेकांच्या अंगावर त्वेषानं तुटून पडायला हवं ! पण पुरुष नसबंदीच्या जाहिरातीतले पुरुषत्वाला बाधा नाही हे ठासून सांगण्यासाठी झुंजविलेले दोन पहिलवान इतक्या मवाळपणे एकमेकांना विलगले आहेत की, त्यांच्या बिलगण्याच्या हेतूसंबंधी पाहणाऱ्यांच्या मनात भलीबुरी शंका निर्माण व्हावी.

खरं तर ' नलगे चंदना पुसावा परिमळ, वनस्पती मेळ हाकारूनी ' असं संतवाणी निक्षून सांगत असतानाही या बहुखर्चिक जाहिरातींची गरज आहे असं तुला वाटतं का ? राजा, या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू न दिल्यास तुला डोकेदुखी, सर्दी-पडसं, अंगदुखी वगैरे वगैरे सगळ्या दुखींवरच्या दुःखद जाहिराती पाहाव्या लागतील."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "जाहिरातीचं वर्चस्व जाहिरपणे मान्य करायलाच हवं. मार्क ट्वेन म्हणतो, ' जाहिरात करणाऱ्या दुकानदाराच्या दुकानात गिऱ्हाईकं येतात. तर जाहिरात न करणाऱ्यांच्या दुकानात कोळी कोळीष्टकं बांधायला येतो. ' ओरडणाऱ्यांचे आंवट आंबेही खपतात ही गोष्ट दात आंबल्यावर आपल्याला कळते. ' चिंध्या पांघरून सोनं विकायला बसलो, गिऱ्हाईक कुठेही फिरकेना. अंगावर सोनं पांघरून चिंध्या विकायला बसलो, गर्दी हटता हटेना ' या सुधाकर गायधनींच्या ओळी इथं चपलख लागू पडतात.

सबब जाहिरातबाजी वाँटेडच त्यात माऊथ पब्लिसिटी ही सर्वांत परिणाम-कारक – अल्पावधीत लोकप्रिय झालेलं निरमा म्हणतं – ' हेमा, रेखा, जया आणि सुषमा सर्वांची पसंद निरमा ' सरकारी जाहिरातीमध्ये निळूभाऊंना लॉटरी सुंदरी हेमामालिनी प्रसन्न होते तशी तुम्हा-आम्हा प्रसन्न होवो असं सांगणारी साठा उत्त-राची कहाणी एकदम झकास जमलीय. जाहिराती अपरिहार्य आहेत म्हणून तर सर्वच कंपन्यांमध्ये स्वतंत्र जाहिरात विभाग व त्यात ' डोस्कं शिणवून ' जाहिरात बनविणारे तज्ज्ञ लोक असतात. कंपनीचं उत्पादन जाहिरातीद्वारे जनता जनार्दनासमोर आणलं जातं. तिचं आकर्षक स्वरूप पाहून मन ऑनलूकर गिऱ्हाईक बनवला जातो अन हेच जाहिरातीचं यश.

चंदनाच्या झाडाला आपल्या सुवासाची जाहिरात करावी लागत नाही ही झाली-कवी कल्पना. पण जाहिरातीविना चंदनाच्या झाडाला लाकडाचाही भाव येणार नाही. तुमचं प्रॉडक्ट चांगलं आहे हे जरी सत्य विधान असलं तरी, ते ठासून सांगायला दहा असत्य विधानं करावीच लागतात. ज्याला हे जमतं तोच यशस्वी जाहिरातदार. जाहिरातींपासून तोट्यापेक्षा फायदेच अधिक आहेत. म्हणूनच तर व्यापारी वर्गात जाहिरात याच शब्दाची इतकी जाहिरात झाली की

जाहिरातीशिवाय या स्पर्धात्मक युगात आपला टिकाव नाही हे ओळखून व्यापारी-बंधू अधिकाधीक जाहिरात करतच असतात अन पुढेही करतच राहतील. "

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व 'जाहिरातींसाठी संपर्क साधा" अशी स्वतःचीच जाहिरात करणाऱ्या कोठल्याशा ॲडव्हरटायझिंग एजन्सीच्या बोर्डाला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# १६.

## ※ कॉलेज : एक चिंतन ※

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो ॲडव्हरटायझिंग एजन्सीच्या बोर्डाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेल्या वेताळाने 'या...हूं' अशी कॉलेजकुमाराच्या जोशात जोरात किंकाळी फोडली व म्हणाला,

"राजा, आज सकाळी–सकाळीच मला खूप धिंगामस्ती करावीशी वाटली. सार्वजनिक मालमत्तेची नासधूस, पोलिसांवर दगडफेक, सिटी बस, पेट्रोल पंप वगैरे जाळणं यासाठी हात शिवशिवत होते. एवढंच काय यौवनाचा मदनमस्त भार सांभाळत येणाऱ्या षोडशेलाही उगीचच छेडावंसं वाटत होतं. आपल्या चिंतनशील स्वभावात एकदम कसा काय बिघाड झाला हे जाणून घ्यायला शेवटी डॉक्टर गाठलाच.

नेहमीच्याच थंडपणे डॉक्टर म्हणाले, "चिंता करायचं काही कारण नाही; या वर्षाच्या सुरुवातीपासून तुमच्यासारखे बरेच लोक येऊन गेले, क्रांतीची मशाल हाती घेऊन समाज परिवर्तनाची भाषा बोलणारे. या वर्षाअखेरपर्यंत असंच चालायचं." या स्पष्टीकरणानंतरही डोक्यातली ट्यूब पेटेना. आमचा पराभूत चेहरा पाहून विजयी मुद्रेने डॉक्टर म्हणाले, "ते समोरचं कॅलेंडर पाहा–१९८५ साल. म्हणजेच 'युवा वर्ष.' झाला उलगडा ?" पण उलगडा होण्याऐवजी गुंताडा वाढला. युवा कोणास म्हणावे ?

पॅरीसमधल्या रंगेल पुरुष मंडळींची गोड तक्रार आहे की, तिथली स्त्री – मग ती विरांगना असो किंवा वारांगना – चाळीशी कधीच ओलांडत नाही. तसेच आपले पुढारी लोक – सदैव युवाच असतात. पुढाऱ्यांनी युवा शब्दातली हवाच काढून घेतली आहे. म्हणूनच खरेखुरे युवा पाहायचे असल्यास, कॉलेज ही वास्तू, तिचं अंतरंग, बहिरंग व अनेक रंगढंग पाहावे लागतील. त्यासाठी आजचा हा चिंतनाचा विषय ' कॉलेज '.

परीक्षांचे निकाल लागतात आणि इतके दिवस ओकीबोकी असलेली कॉलेजची इमारत पुनश्च गजबजू लागते. ' साला युनिव्हर्सिटी एक्झाम याने वरली मटका है. ' परीक्षेचा फटका बसलेला कोणीतरी विद्यापीठ परीक्षेची व मटक्याची तुलना करतो. त्याला संमती देत इतर बरेचसे समदुःखी स्वानुभवाचं कथन करतात. या सुरस आणि चमत्कारिक कथाकथनांनंतर सुरू होते प्रॉस्पेक्टसची खरेदी. खिशाला चटके बसण्याचा श्रीगणेशा. प्रॉस्पेक्टस नावाची लहान पुस्तिका पाच-पंचवीस रुपये टिच्चून घ्यावीच लागते, ती फक्त अॅडमिशन फॉर्मसाठी. बाकी प्रॉस्पेक्टस वाचायच्या कोणी फंदात पडत नाही. कॉलेजसंबंधी अतिरंजीत अवास्तव वर्णन त्यात ठासून भरलेलं असतं. पोहोण्याचा तलाव, व्यायाम शाळा, मोफत वाचनालय, उत्तुंग इमारत, विस्तीर्ण बगीचा आणि...आणि...उच्च विद्या विभुषित टीचिंग स्टाफ वगैरे.

वाचणाऱ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. पण पुढे तो आपोआपच गळून पडतो. मग लागतात अॅडमिशनसाठी लांबच लांब रांगा. निवडणुकांसाठी आतूर असलेली दादा मंडळी लिव्हींग सर्टीफिकीट वगैरे महत्त्वाचे कागदपत्र ' आतून ' पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात गुंतलेली असतात. मग भल्याभल्यांच्या खिशाला भगदाडं पाडणारी अॅडमिशन नामक क्रिया आटोपते. चार चाकी वाहनात ऐटीत घुमणारी काही भपकेबाज, बडी धेंडं आपण इकॉनॉमिकली बॅकवर्ड आहोत असली कागदपत्र सादर करून ' दुनिया झुकती है ' याचा प्रत्यय आणून देतात. सर्व स्थिरस्थावर झालं की, कॉलेजच्या आवारात रुंजी घालत ' माला ' च्या आवक–जावक संबंधी तपशील मांडला जातो. मग घोळक्या–घोळक्यांनी गप्पा सुरू होतात. ग्रूपीझमचे बीज याच मोसमात पेरले जाते. गप्पाष्टक मंडळीची गप्पांची गाडी अगदी श्रीदेवी ते फुलनदेवी व जॅकी श्रॉफ ते गोविंदभाई श्रॉफ, असल्या विषयांचे रूळ बदलत धावतच असते. यातूनच समविचारी मंडळी पुढे सरसावतात व निवडणुकांसाठी पॅनेल बनवायच्या खटपटीला लागतात. पैशांची वारेमाप उधळपट्टी, जाती-पातींचा उहापोह. माऱामाऱ्या, किडनॅपिंग सर्व यथासांग पार पाडून कॉलेजची इलेक्शन खेळवली जातात. निवडून आलेल्यांचं लक्ष पैलतिरावरील

गॅदरींगवर असतं. कारण गुंतवलेला पैसा काढण्याचं साधन म्हणजे गॅदरींग. 'इस साल गॅदरींग मे कुछ दम नही' निवडणुकीत पराभूत झालेले भविष्य वर्तवतात. याबाबतीत असहकार आंदोलन पुकारतात. बऱ्याचदा विध्वंसक वृत्तीही उफाळून येते. स्नेहाचा अभाव असलेलं स्नेहसंमेलन सुरू होतं. उद्घाटनाला ग्लॅमरस व्यक्तिमत्व असल्यास गर्दी जमते. अन्यथा प्रतिनिधी मंडळाशिवाय तिकडे कोणीही फिरकत नाही. एरव्ही कॉलेजशी फटकून वागणारी काही ॲक्टीव्ह मंडळी गॅदरींगच्या सुमारास कॉलेजला धर्मशाळा मानून तिथेच मुक्काम करतात. निरनिराळ्या क्षेत्रात चमकलेले तारे दिमाखाने कॅरीडॉरमधून घुमत असतात. कोणी शरीरसौष्ठव किंवा क्रिकेटमध्ये पराक्रम केलला असतोच. मग साचेबद्ध कार्यक्रम. जसं नाटक, विविध मनोरंजन व शेवटी फिशपॉन्डचा कार्यक्रम होऊन गॅदरिंग संपतं.

कॉलेजातली एकमेव साहित्यिक उलाढाल म्हणजे 'कॉलेज मॅगझीन' यात बहुधा हिंदी, मराठी, इंग्रजी असे तीन विभाग असतात. इंग्रजी विभागात वर्नींग करंट टॉपीक्स्च्या नावाखाली नामवंतांचे लेख विद्यार्थ्यांच्या नावाने उजळ माथ्याने वावरत असतात. हिंदी विभागात गतवर्षी दिवंगत झालेल्या महान आत्म्यांवर 'रोशनी बुझ गयी' छापाचे लेख आढळतात. मराठी विभागात कवितांचा सुळसुळाट फार. त्यातही आपली स्फूर्तीदेवता आपल्या कविता वाचते असं कल्पून एखाद्या किंचित कवीनं लिहिलेली 'कठड्याला रेलून उभी असताना, डोळ्यांच्या कॅमेऱ्यानं छबी तुझी टिपली' वगैरे कविता हमखास भेटते. त्यात एडीटर बंधू चष्म्याआडच्या डोळ्यांना जी पोरगी सुंदर भासेल तिला कवितेसंबंधी गळ घालतो. 'आपल्याला नाई जमणार बा कविता-बिविता, आम्ही थोडेच तुमच्यासारखे साहित्यिक आहोत.' असला गोड नकार देते. 'मी लिहू का तुमच्या नावानी तुमची हरकत नसल्यास?' एडीटर पिच्छा सोडायला तयार नसतो.

"नको, त्यापेक्षा मीच लिहिते." हे तिचे उद्गार ऐकून, हा आपला धडधडीत अपमान आहे की, आपल्या विनंतीला दिलेला मान आहे या विचारात वाढलेली दाढी कुरवाळत असतानाच चोरपावलांनी येऊन कविता टाकून ती सटकते.

असल्या कवितांचा आशय एकच असतो, या बापुड्या कवियत्री ओंजळीत प्रितीचे फूल घेऊन उभ्या असतात, पण मार्गातले काटे वगैरे वगैरे. अशुद्ध लेखनाचे काटे साफ करत करत कविता छापखान्याच्या मार्गावर लागते.

उतारानंतर परीक्षेचा चढाव लागतो. स्कॉलरचा भाव वधारतो. स्कॉलर मुलांना जाता-येता सलाम झडू लागतात. त्यांच्याकडून सिलॅबसपासून सुरुवात

करून मग खुबिनं नोटसही काढल्या जातात. 'पासींग मार्क्स' एवढंच सर्वांचं ध्येय बनतं, दरवर्षीप्रमाणे कॉप्या होऊन परीक्षा आटोपते. उत्तरपत्रिकेच्या प्रवासासंबंधी 'थ्रू प्रॉपर चॅनल' माहिती काढली जाते परत परीक्षांचे निकाल लागतात व कॉलेज गजबजू लागतं. राजा, या परिस्थितीत स्वागतार्ह बदल होऊ शकेल काय ? या प्रश्नाचं उत्तर न दिल्यास सिनीअर पोरांच्या रॅगिंगला तोंड द्यावं लागेल."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, " वेताळा, स्वातंत्र्यपूर्व काळात सुभाषचंद्र बोस वगैरे खरेखुरे नेते कॉलेजात असताना अध्ययनात गढून जात काळाची गरज म्हणून राजकारणात शिरले व आपल्या सशक्त खांद्यावर नेतेपदाचं जू समर्थपणे पेलून दाखवलं स्वातंत्र्योत्तर काळात वरीच ढोंगी व लाचार मंडळी आघाडीवर आलीत. शिक्षणाचा धंदा सुरू झाला. नवं कर्तृत्वहीन, दिशाहीन नेतृत्व उदयाला आलं. असल्या कर्तृत्वहीन नेतृत्वाची ही आजची दुसरी पिढी. त्यांनी पहिल्या पिढीला वाममार्गानं यशाचं शिखर गाठताना पाहिलं. मग वाममार्गच राजमार्ग ठरला. अंगठा बहाद्दरानं कमावलेला पैसा पाहून युवकांचा पुस्तकावरचा विश्वास उडाला, कॅन्टीनमध्ये सिगरेटची वलयं सोडत असल्याच मार्गानी पैसा कमावण्याची स्वप्नं पाहात टाईम पास करताना आजचे युवक दिसतात जोसेफ मॅझिनी म्हणतो, 'स्लंम्बर नॉट इन द टेन्टस् ऑफ युवर फादर, वर्ल्ड इज अॅडव्हान्सिग, अॅडव्हॉन्स विथ इट' नवविचारांचा आपला वेगळा असा तंबू ठोकणं केव्हाही चांगलं. एखाद्या मोठ्या माणसापुढे कमरेत वाकून, अदबीनं युवक उभे असतात, अन् पाठ वळताच मात्र पार्श्वभागावर लाथा मारायच्या गोष्टी करतात. हे वागणं बरं नव्हे. अमेरिकेत प्राध्यापकांसमोरही विद्यार्थी सिगारेट ओढतात पण त्यामुळे अभ्यासात अडथळा होत नाही. अगदी कुलगुरूसुद्धा विद्यार्थ्यांच्या कॅन्टीनमध्ये चहा पितात. आपल्या चेहऱ्यावरचे मुखवटे गळून पडून मुक्त वातावरण ज्या दिवशी निर्माण होईल त्याच दिवशी कॉलेजमधील चाकोरीबद्ध परिस्थितीत फरक पडेल. "

अशा प्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व 'दानशूर श्रीमंत शेठ, धोंडीबा कोंडीबा आंगुठे महाविद्यालया'च्या पाटीला जाऊन लोंबकळू लागला.

☐ ☐

# १७.

## * चलती फिरती शायरी *

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही, तो कॉलेजच्या पाटीजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. त्यावेळी बसस्टँडकडून येणाऱ्या-जाणाऱ्या ऑटोरिक्षा पाहून प्रेतातील वेताळ म्हणाला,

" राजा, या ऑटोरिक्षा, ट्रक्स वगैरे वाहनांमागे लिहिलेली 'चलती फिरती शायरी ' तू नक्कीच वाचत असशील. माझीही नजर या वाहनांच्या पार्श्वभागावर जाते अन् ' बुरी नजरवाले तेरा मूंह काला ' वाचलं की, आपली नजर उगीचच बुरी आहे असं वाटू लागतं. लहान मुलींनी एकाच डिझाईनची मेंदी हाताला लावावी, तद्वतच बऱ्याच ड्रायव्हरबाबूंनी या ' बुरी नजरवाले तेरा मूंह काला ' या वाक्याला हौसेनं गाडीमागं रंगवलं आहे. एकानं तर या सुप्रसिद्ध वाक्याची दोन ओळींची छोटीशी कविताच केली आहे, ' प्यार के फूल, फुलोंकी माला, बुरी नजरवाले तेरा मूंह काला ' या बुरी नजरवाल्यांना मग ' देखो मगर प्यारसे ' असाही सल्ला दिला जातो.

या लोकांचा कोणीतरी ज्ञात—अज्ञात शत्रू नक्कीच असावा, त्यालाच उद्देशून हे असलं लिहिलं जात असावं. या शत्रूला ' चमचा ' ही पदवीही हे लोक बहाल करतात. मग चमच्यांवर टीकास्त्र सोडलं जातं. ' चमचोंसे सावधान ' किंवा ' चमचों के लिये उपहार जूता ' व त्यापुढे बुटाचं चित्र चितारलेलं असतं. ही नसती

उठाठेव हे लोक का करतात देव जाणे ? कदाचित जातायेता चमच्यांशी गाठ पडत असावी अन् त्याला उद्देशून लिहिलेलं बोधवाक्य त्याने वाचावं व त्याचा जळफळाट व्हावा ही सुप्त इच्छा लिहिणाऱ्यांच्या मनात असावी. एकानं 'बेटी बापसे परेशान, हम चमचोंसे परेशान' असं लिहून स्वतःची परेशानी व्यक्त करत वाचणाऱ्यांना परेशान करून सोडलं आहे. कोणती बेटी अन कोणत्या बापापासून परेशान हे गुलदस्तातच ठेवलं आहे. कदाचित या वाहकाला बेटीकडून 'ग्रीन सिग्नल' मिळाला असावा पण तिच्या बापाने आडवा हात दाखवून 'प्यारकी गाडी' स्टॉप केली असावी. त्यातून उद्भवलेली परेशानी मग काव्यरूपाने प्रगटते.

पण सगळीकडेच नैराश्यवाद किंवा चमच्यांवर चिखलफेक आढळून येत नाही. बऱ्याच ठिकाणी आशावादही उफाळून येतो, तो आशावाद 'डर मत बंदे, ये भी दिन निकल जायेंगे, हसने वालोंके चेहरे उतर जायेंगे' असं म्हणत असतो. आयुष्याच्या प्रवासात चढावानंतर उतार लागतोच हेच जणू त्याला सुचवायचे असेल. पण ड्रायव्हरबाबूचा फिलॉसॉफीशी संबंध असावा असं मानायला लोक तयार नाहीत. या भटक्या लोकांशी लोकं फटकून वागणंच पसंद करतात. जलद चालणाऱ्या मिटरबरोबर प्रवाशाच्या रागाचाही पारा चढतो. मग बिलाबद्दल बाचाबाची सुरू होते. हातातला गिअर बरोबर न पडल्यास तसलाच आवाज ड्रायव्हर लोक हातावर पैसे न पडल्यास करतात. काही ऑटोवाले साईलेन्सर गमावल्या गाड्यांप्रमाणेच सतत आवाज करून सहानुभूती गमावतात. यासाठी एकानं आपल्या पाठीवर लिहिलं, 'होलीको दिवाली मत समझो, हर ड्रायव्हरको मवाली मत समझो.' आता हेच पाहाना की, बिचाऱ्या ड्रायव्हरबाबूला टॅक्सीतलं जोडपं 'जमाडी जंमत' करत असतं. त्यावेळेस फार तर समोरच्या आरशात मागची 'गंमत' पाहण्याशिवाय व 'दुसरेकी अमानत देखकर हैरान न होना, खुदा तुझे भी देगा, परेशान न होना' असं म्हणण्याशिवाय गत्यंतर नसतं.

आपल्या व्यवसायाविषयी कुठंतरी सुप्त अभिमान असतोच, त्या अभिमानापोटीच असंही लिहिलं जातं की – 'ड्राईव्हरकी जिंदगी कोहिनूर होती है, निगाहे नेक कर, हुस्न बदनाम होता है', आपण व्यवसायात मारलेली आघाडी इतरांच्या डोळ्यांत खुपतेय असं दिसलं की लगेच 'जलो लेकिन दीपक जैसा' असं लिहून, जळणाऱ्यांना कसं जळावं हे सांगून अजून जळवतील. या लोकांचा सर्वच कारभार रोखठोक असतो. लपवाछपवी वगैरे प्रकार नाही. उगीचच तोंडावर मुखवटा चढवून कोणी ऑटोवाला 'जनतेसाठी मी ऑटो चालवतोय' वगैरे भाषणबाजी करणार नाही. तर सरळ सांगेल 'पापी पेटका सवाल है' याच भावना एकानं फारच सुंदर शब्दात आपल्या ऑटोमागे व्यक्त केल्या आहेत. त्या अशा –

'दुनिया मेरी बिगड रही है, दौलतके वास्ते, मजहबको ले जा रहे है मतलब के वास्ते' त्याचप्राणे दोस्त दोस्ताना या विषयावरही 'फ्री अँड फ्रँक' मत देतील एकाची मुत्यूनंतर दोस्ताबद्दल तक्रार आहे की, 'दोस्त समझके मैने अपनी जान दिया, दोस्त ने कफन नही दिया' असल्या दोस्तीला कंटाळून मग दुसरा जिवंतपणीच म्हणतो, 'दुष्मनोंसे तो मैं अकेला निपट लुंगा, मुझे दोस्तोसे बचाओ' अतिविश्वासातल्याने कोणी विश्वासघात केल्यामुळे मग उद्वेगानं एकानं असंही लिहिलंय की, 'तमन्नाओंकी तस्वीर हर कोई सजाता है, वही धोका देता है, जीसपर जादा भरोसा होता है' शेवटी ईश्वरचरणी प्रार्थना केली जाते की, 'भगवान तेरे दरबारमें फिर्याद लाये है, मत भेज ऐसे दोस्त जो बरबाद करते है.'

आजकाल वाढत्या अपघातामुळं असुरक्षिततेची भावना सर्वांच्याच मनात घर करून आहे ड्रायव्हर लोकांचा तर सतत ड्रायव्हींग व वाहनांशी संबंध त्यामुळेच हे लोक स्वत:हून पुढाकार घेऊन गाडीच्या मागे 'स्टॉप', 'थांबा' 'हॉर्न प्लीज', 'सुरक्षित अंतर ठेवा' असा हितोपदेश सुरू करतात. त्यातलं सुरक्षीत अंतर ठेवा हे वाक्य वाहन चालवताना अतिजवळीक साधणाऱ्या जोडप्यांबद्दल असावं. काहीही असो ड्रायव्हरबाबूचा धंदा म्हणजे सतत मृत्युच्या छायेत वावरणं म्हणून मन खंबीर झालेला एकजण मृत्यूकडे तुच्छतेनं पाहात आपल्या गाडीमागे जीवनाचं आवडतं तत्त्वज्ञान मांडतो- 'मौतसे किसकी यारी है, आज गरीबकी तो कल अमीरकी बारी है.' मृत्यूसारख्या गहन, गंभीर विषयाला दोन ओळीत गुंडाळून तो बिनधास्तपणे जगतो. 'प्रेम' या विषयावर लिहिताना मात्र तो इंग्रजीचा आधार घेतो. जसं 'लव्ह इज ए स्वीट पॉयझन' एकानं दोन रायफलींवर फुली मारून आपली युद्धविरोधी भूमिका 'डोन्ट वॉर मेक लव्ह' या शब्दात ऑटोमागं रंगवली. त्याचबरोबर 'दो मे शांती, तिसरे मे क्रांती' असा कुटुंब नियोजनी प्रसारही तो करत असतो.

शेरशायरीबरोबरच काही गद्य वाक्येही वाचायला मिळतात. एका महिवाला ऑटोवाल्यानं तर 'तिट्टीके लिये मेरी सोहनी को मत बेचो' अशी दर्दभरी विनंती केली आहे अलौकिकापेक्षा लौकिकावरच लोकांचा जास्त जीव जडलेला असतो, हेच त्याला सूचित करायचं असेल. वाहनाच्या मागील बाजूप्रमाणेच काहींना दरवाज्याजवळही लिहायची खोड असते एकाने आपल्या ट्रकच्या दरवाज्यावर भक्तिरसाने ओथंबलेली विनंतीवजा सूचना केली आहे, ती अशी 'पहले जय बजरंग बोलो, बादमे दरवाजा खोलो' या भक्तिरस, शृंगाररस, वीररस, करुण. रसांप्रमाणेच अजून एका रसाचं वाक्य ऑटोरिक्षा, ट्रक्स वगैरेच्या मागे आढळतं. तो रस म्हणजे 'निरस' अन् ते निरस वाक्य म्हणजे 'अमूक अमूक बँकेच्या

सौजन्याने ' रुक्ष व्यवहार दाखवणारं हे वाक्य जगाच्या दृष्टीनं महत्त्वाचं असलं, तरी ऑटोवाला मात्र रंगवायला फारसा उत्सुक नसावा. त्यापेक्षा तेवढ्याच जागेत एखादा मस्तपैकी शेर, छोटीशी शायरी, एखादा कडक डायलॉग असलं काहीतरी रंगवायचं त्याच्या मनात असणार.

ही शेरशायरी बहुतांश हिंदी भाषेतच असते. एकतर दळणवळणाच्या या खूपशी वाकडी वळणं असणाऱ्या व्यवसायात सरळ वळणानं जाणारा मराठी माणूस उतरतच नाही. एखादा उतरलाच तर ' आई तुझा आशिर्वाद ' असं लिहून आईला श्रेय देऊन मोकळा होतो. तर काही मऱ्हाटी ऑटोवाले ' क्षणमित्र ', ' ऋणानुबंध ' सारखी नावं आपल्या ऑटोला ठेवून आपला स्टँडर्डपणा सिद्ध करतात. एकानं आपला सरळमार्गीपणा ' श्रीमंतीनं माजू नका, गरिबीला लाजू नका ' अशा शब्दात व्यक्त केला आहे. मात्र हिंदी शेरशायरीशी नातं सांगणाऱ्या ' आम्ही असे वावरलो, की बावरलो कधीच नाही. एकदाच असे बावरलो, की सावरलो कधीच नाही.' या मराठी ओळी एका ट्रकमागे वाचून मीच बावरून गेलो होतो. व्वा ! भावना जर उत्कट व उदात्त असतील तर कोठल्याही भाषेच्या माध्यमातून त्या सुंदर रीतीनं प्रकट होतात, हेच या चलती शायरांनी दाखवून दिलं. मात्र नेहमीच मन रमवणारी याने की दील बहलानेवाले शायरीचीच या चलत्या फिरत्या दुनियेकडून अपेक्षा करू शकत नाही. बरेचदा तर असं काहीतरी विचित्र खरडलेलं असतं की आर. टी. ओ. ने एखादा नवीन कायदा तयार करून या चलती फिरती शायरीवर बॅन आणावा असंच वाटतं. नव्या कल्पनांअभावी बरेचदा तोच तोच मजकूर वाचायला मिळतो. त्यापेक्षा कोरी पाटी परवडली, असंच म्हणायची वेळ येते.

राजा, या चलती फिरती शायरीबद्दल तुझं काय मत आहे ? ड्रायव्हरबाबूंनी तत्त्वज्ञानाच्या लफड्यात न पडता नाकाच्या सरळ रेषेत ऑटो चालवावा असं तुला वाटतं का ? माझ्या या प्रश्नाचे उत्तर माहीत असूनही तू न दिल्यास तुला बेदरकारपणे, जिवावर उदार होऊन ऑटो चालवणाऱ्या ऑटोवाल्याच्या बाजूला बसून संपूर्ण शहरात चक्कर मारावी लागेल."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, " वेताळा, मूळात तत्त्वज्ञान या विषयाची मक्तेदारी चेहऱ्यावरची रेषही न हलवणाऱ्या ढढ्ढाचार्यांकडे गेली असल्यामुळे त्यांनी या सुंदर विषयालाच कंटाळवाणं करून सोडलं आहे. चार-चौघांना न समजेल, ना उमजेल अशा भाषेत लिहिलं किंवा बोलले की माणूस तत्त्वज्ञानी बनतो अशी बऱ्याचजणांची समजूत आहे. जाणूनबुजून सर्वसामान्यांशी संपर्क टाळणाऱ्या हिमालयीन संन्याशांनी मानव जातीचा कितपत उद्धार केला. हा

संशोधनाचा विषय होईल. त्यापेक्षा ऑटोरिक्षासारखं जनसंपर्काचं प्रभावी साधन हाताळणारा ऑटोवाला माणसांबद्दल अधिक जाणतो.

कोणीतरी म्हटलंय की, ज्याला लेखन करायचं त्यानं पान–तंबाखूचा व्यापार करावा, कारण पान–तंबाखूवाल्यांचा दिवसातून शेकडो तऱ्हेच्या माणसांशी संबंध येतो. अशांचं अनुभवविश्वही व्यापक असतं. फक्त अनुभव शब्दबद्ध करण्याचं कसब त्यांच्या ठायी नसतं. मग जमेल तसं, ओबडधोबडपणे आपली कला पेश करतात एरवी उर्मटपणे वागणाऱ्या ऑटोवाल्याच्या शायरीची तारीफ करत, 'जनाब, यह अल्फाज किसके है ?' म्हणून विचारलं तर, 'कायके अल्फाज साब, बस ये तो गरीबकी बकवास है' असं नम्रतेनं म्हणेल. भावनाविवशता या लोकांमध्ये जरा जास्तच आहे. त्याचाच पुरेपूर फायदा घेत मग मनमोहन देसाई, प्रकाश मेहरांसारखे बडे दिमागवाले लोक एका हातानं अशांच्या हृदयात कालवा-कालव करतात, तर अलगदपणे दुसरा हात यांच्या खिशात घालतात.

ऑटोवाल्यांप्रमाणेच हॉटेलवालेही लेखनात मागे नसतात. 'उधार प्रेमकी कैंची है', 'बेकार बैठना मना है', 'एक्स्ट्रा चटनी का एक्स्ट्रा चार्ज पडेगा' असले सुविचार भिंतीवर लटकत असतात. 'काम चालू रस्ता बंद' हे बांधकाम खात्याचं सरकारी वाक्य एकदम लोकप्रिय होऊन गेलं आहे. फार पूर्वी जेव्हा छापण्याची कला अवगत नव्हती तेव्हा कल्याणकारी राजे शिलालेख, ताम्रपट वगैरे प्रजा-जनांच्या दृष्टीक्षेपात येईल अशा ठिकाणी ठेवून प्रजेला बौद्धीक डोस पाजायचे. आज ऑटोवाले, हॉटेलवाले आपलं रोखठोक तत्त्वज्ञान जनतेसमोर मांडताहेत.

नुकतीच एक बातमी वाचली की, एका नाक्यावरचा बाबू 'कमीशन' घेतल्याशिवाय गाडी जाऊच द्यायचा नाही. सर्व कागदपत्रं व्यवस्थित तयार असताना विनाकारण जास्तीचे पैसे द्यायला एका ट्रक ड्रायव्हरनं स्पष्ट नकार दिला. भ्रष्टाचारास शिष्टाचार मानणारा बाबू खवळला. त्याने ट्रक अडवला. तरीही न डगमगता त्या ट्रक ड्रायव्हरनं आपल्या इतर व्यवसायबंधूंना लाच न देण्याविषयी विनवलं. सर्वांनी ते मान्य केलं. नाक्याजवळ ट्रक्सची लांबच लांब रांग तयार झाली. कोणीतरी फोन केल्यामुळे संबंधित वरिष्ठ मंडळी आली अन् ताबडतोब 'बाबू महोदय' सस्पेन्ड झालेत. एका छोटया ड्रायव्हरने दिलेली यशस्वी झुंज ही एखाद्या पत्रकारानं भ्रष्टाचाराचं मोठं प्रकरण चव्हाटयावर मांडावं त्याच तोडीची आहे केव्हा काय प्रसंग उद्‌भवेल हे माहीत नसल्यामुळे हे ट्रान्स्पोर्ट व्यवसायातले लोक सतत नशीबावर विसंबून असतात. अनुभवामुळेच मग यांचंही एक जीवनाचं तत्त्वज्ञान आकाराला येतं. तेच शब्दबद्ध होऊन वाहनांवर मांडलं जातं. जो असलं काहीच न लिहिता पाटी कोरी ठेवतो, ज्याच्या मनात कुठलीच

खळबळ, चलबिचल नाही. स्थितप्रज्ञासारखा अलिप्तपणे जगाकडे पाहत मला काय त्याचं ? असं तुच्छतेनं म्हणत चालू लागतो, असा ऑटोवाला काय अन् त्याचा भाव-भावनाविरहीत निर्जीव ऑटो काय, दोघंही सारखे. "

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहिसा झाला व शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या गजबजत्या ऑटो रिक्षा स्टॅण्डच्या बोर्डाला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# १८.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ...
बाल ...
वा. क्र. २९८५ दिनांक 3/3/84
विषय ...

## ❊ मार्क्सवादी मुले ❊

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला, "राजा, असं रात्री-बेरात्री जागत बसणं हे तुझ्या–माझ्यासारख्या बिनकामाच्या माणसाचं काम. आताशा रात्रभर घरोघर दिवे जळताना दिसत आहेत. नाही तू समजतोस तसलं काही नाही. बस्स, दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू आहेत म्हणून. अन् घरोघर कोठलीतरी परीक्षा देणारं कारटं असतंच.

या परीक्षा युगात हे असंच चालायचं. अभ्यासाचा आभास निर्माण करायचा अन् चांगले मार्क्स मिळवून दाखवायचे. अभ्यास हे साधन अन् चांगले मार्क्स हे साध्य. हल्ली पोरांच्या डोक्यात मार्क्स, मार्क्स अन् फक्त मार्क्सच घुमत असतात. म्हणूनच म्हणतो आजची मुले ही 'मार्क्सवादी' मुलं आहेत. आता मार्क्सवादी हा शब्द ऐकल्यावर तुला निराळाच वास येईल. ते डावे–उजवे किंवा उजवीकडून डावीकडे किंवा डावीकडून उजवीकडे उड्या मारणारे निरनिराळे 'वादी' लोक निराळे.

आमच्या एका असल्याच कार्ल मार्क्सवादी मित्राला हनुमंताच्या मूर्तीला नमस्कार करताना आम्ही रेड हँड पकडला होता. अँटी रिलीजन वगैरेवाल्या मुखातून 'भीमरुपी महारुद्रा' वगैरे ऐकून आमचीच मुद्रा चमत्कारिक झाली. पण आमचा हा मित्र स्पष्टीकरणार्थ वदला – "कॉम्रेड, लाल रंग आपला आवडता.

मारुतीचा रंगही तिकडेच झुकणारा, सबब मारोतीचं आम्हा वावडं नाही. म्हणजेच सावळा विठोबा किंवा कृष्णवर्णीय कन्हैय्या यांना चालणार नाही. त्यांचं काहीच सांगता येणार नाही.

असंच एकदा क्रांती-बिंतीची भाषा बोलणारा मित्र हॉटेलात भेटला. एवढ्या मोठ्या क्रांतीसिंहाला बटाटेवडा खाऊ घालणं कसंसच वाटलं. म्हणून खिशाचा अंदाज घेऊन दोन आम्लेटची ऑर्डर सोडली. "आम्लेट नको, कारण आज श्रावणी सोमवार, काहीतरी उपवासाचं मागव." क्रांतीसिंह गरजला. मग उपवासाच्या खिचडीत सपासप चमचे खुपसत 'धर्म म्हणजे अफुची गोळी' वगैरे बरंच काहीबाही बरळला. 'खिशाचा भार हलका केल्यावर लालभाईंना उपवासाची खिचडी चालते' एवढीच सामान्यज्ञानात भर पडली. जाता–जाता हळूच चोरट्या नजरेनं इकडे–तिकडे पाहत त्यानं खांद्याला अडकवलेल्या शबनम नावाच्या झोळीतून अफूची गोळी सावधपणे बाहेर काढावी तसं एक लाल भडक वेष्टनाचं पुस्तक बाहेर काढलं. डिटेक्टिव्ह पुस्तक असावं असं मला वाटलं होतं, पण 'क्रांतीचा धगधगता स्थंडील' वगैरे नाव वाचून ही क्रांती-बिंतीची भानगड आपल्याला पेलणार नाही हे आधीच सांगून पुस्तकाला हात न लावता सटकलो. जाऊ द्या, या मार्क्सवादी लोकांशी आपलं काही देणं–घेणं नाही. आपल्याला आज बोलायचंय ते फक्त परीक्षेत चांगले मार्क्स मिळण्याच्या सदोदित खटपटीत असणाऱ्या मुलांबद्दल.

राजा, सकाळी सकाळीच उठून पाहावं तर मुला–मुलींचे थवेच्या थवे कुत्र्यांच्या छत्र्यांप्रमाणे गल्लोगल्ली उघडलेल्या 'ट्युशन क्लासेस'ला जाताना दिसतात. तेही अगदी बारा महिने. उन्हाळ्याच्या सुट्ट्यात एन्जॉय करणं वगैरे प्रकार आता लुप्त झाला आहे. एक परीक्षा संपत नाही तर पुढच्या परीक्षेच्या तयारीला लागावंच लागतं. याचं कारण एकच, जीवघेणी स्पर्धा. मग स्पर्धा म्हटलं की, एकमेकांचे पाय ओढाओढी, एकमेकांवर करायची कुरघोडी, सगळे भलेबुरे प्रकार चालतात. 'जिवलग' मैत्रिणीला थांगपत्ता न लागू देता एखादी ट्युशन क्लास लावते. खरं तर मैत्रिणीचा गैरसमज होऊ नये या भीतीपोटी पण वरपांगी आव आणून सांगते, "मी मागच्याच महिन्यात देशपांडेज् क्लासेस जॉईन केलेत, तसे बरे शिकवतात. तुला यायचं असेल तर ये बाई, नाहीतर म्हणशील सांगितलं नाही म्हणून!"

"अगं, मी जोशीसरांकडे जात असते. आमचा तर संपूर्ण कोर्सही संपला. आता रिव्हीजन सुरू आहे." दुसरी पहिलीवर मात करते. सगळीकडे लपवालपवी

अन् छपवाछपवी. यांचं लहानपणही राजकारण करण्यातच शहाणपण मानतं. एखाद्याला आपल्यापेक्षा जास्त मार्क्स पडले की, " कॉपी केली असेल, ओळखी-पाळखी, पैसे खिलवलेत " वगैरे प्रतिक्रिया ऐकू येतात. आजच्या या बदलत्या समाजजीवनात लहान वयातच चिखलफेकीला सुरुवात होते. चितळे मास्तरांचा जमाना गेला व पोराला शिकवणी लावा असे सांगणाऱ्या शिकवणे मास्तरांचा जमाना सुरू झाला. 'मार्क्स' या शब्दाला अनन्यसाधारण महत्त्व आल्याने बिच्चारे पालकही स्वतःच्या पोटाला चिमटे घेत पोरांना शिकवणीच्या दावणीला बांधतात. ज्या वयात शारीरिक वाढीसाठी व्यायाम व बौद्धिक वाढीसाठी अवांतर वाचनाची गरज असते, त्याच वयात नेमक्या या गोष्टींना फाटा दिला जातो. आजकाल मेरिटच्या विद्यार्थ्यांचं वाचनही यथातथा असतं, हल्ली 'हुऽशार' पत्रकार लोकसुद्धा अतिहुशार फर्स्टक्लास फर्स्टला 'तुमचा आवडता लेखक कोण ?' वगैरे फालतू प्रश्न विचारत नाही. पाठ्यपुस्तकाबाहेरच्या लेखकांच्या वाटयाला जायला अभ्यासामुळे वेळ कुठं असतो बिचाऱ्यांना ! गुणवत्ता यादीत नाव झळकलेल्या मुलांच्या मुलाखती अगदी साचेबद्ध असतात. ही गुणवान मुलं भाषेसारख्या विषयातही पूर्ण गुण मिळवतात. जयंत नारळीकरांना इतर विषयाप्रमाणेच भाषेतही विशेष प्राविण्य मिळाल्याचं पाहून त्याकाळी आश्चर्य व्यक्त करण्यात आलं होतं. पुढं 'जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ' अशी ख्याती प्राप्त करून नारळीकरांनी आपली विद्वत्ता सिद्ध करून दाखवली. आजच्या मार्क्सवादी मुलांकडून असली अपेक्षा करता येईल का ? यांचे भरमसाठ मार्क्स पाहून त्यांच्या-बद्दलच्या अपेक्षाही वाढतात, पण बहुतेक मुलं आयुष्यभर कुठंतरी लठ्ठ पगाराची नोकरी करण्याचेच स्वप्न पाहतात. निर्णयक्षमतेच्या अभावामुळं रुळलेल्या मार्गावरून चालतात. बरेचदा स्वतःचे निर्णय स्वतः घेत नाही. असंच एकदा ट्रेनने प्रवास करताना पिता-पुत्रांशी गाठ पडली. पिताजी महाराष्ट्रातील निरनिराळ्या कॉलेजची प्रॉस्पेक्टस सभोवताल पसरवून रात्रभर त्याचा तुलनात्मक अभ्यास करण्यात गुंतले होते तर चिरंजीव परीक्षा, अभ्यास वगैरे व्यापातून मुक्त होऊन मस्तपैकी बर्थवर घोरत पडले होते. कसकसं हसून केविलवाणेपणे पिताजी म्हणाले, " काय करणार ? पोराला फक्त अठ्याऐंशी टक्के मार्क्स पडलेत. आजकाल नव्वदच्या खाली कोणीही विचारत नाही. कठीण आहे या पोराचं." बऱ्याच जणांचं सायन्स ग्रुपचं ॲग्रीगेट 'परसेन्ट' शंभराच्याही वर जातं ते गेम्स सर्टिफिकेट वगैरेच्या भरवशावर. मग प्रत्यक्षात गेम खेळो की न खेळो. कागदोपत्री असलं की झालं. तसंच माता-पित्यांपैकी कोणीही एकाने कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केली असल्यास त्यांच्या प्रिय पुत्राचे दोन टक्के मार्क्स वाढतात म्हणे ! चित्रपट हा समाज जीवनाचा आरसा आहे. उद्या पडद्यावर एखादा हिरोने 'पिताजी काश

तुमने ऑपरेशन किया होता तो...मगर अपने बेटे के लिये तुम इतना भी नहीं कर सके' वगैरे म्हणत तणतणत घर सोडल्याचे दाखवल्यास नवल वाटू नये.

राजा, शालेय जीवनात अभ्यासात फारशी प्रगती न दाखवलेलेच बरेच लोक पुढे यशस्वी होतात. फारसं शिक्षण नसतानाही रविंद्रनाथांनी साहित्याचं नोबेल मिळवलंच. बी. ए. ला तृतीय श्रेणीत पास होणाऱ्या प्रल्हाद केशव अत्रे नामक विद्यार्थ्यानं मराठी भाषेतील चित्रपटाला पहिलं व कदाचित शेवटचंही, राष्ट्रपतीपदक मिळवून दिले. खेळाडू, राजकारणी लोक यांचाही शिक्षणाच्या बाबतीत आनंदी आनंद असतो, तरी आयुष्यात भरघोस यश संपादन करतात. हे लोक अगदी सतत प्रसिद्धीच्या झोतात असतात. पण आपली गुणवान मार्क्सवादी मुलं एकदाच चमकून अस्तंगत होणाऱ्या ताऱ्यांप्रमाणे पुढील आयुष्यात अस्तंगत होतात. एक–दोन अपवाद वगळल्यास फारसे नावारुपालाही येत नाहीत. हे असं का होतं ? या प्रश्नाचं उत्तर माहित असूनही तू न दिल्यास तुला वर्तमानपत्रातील दहावी अभ्यासमाला अभ्यासावी लागेल व परीक्षेला बसून कसंही अन् काही करून गुणवत्ता यादीत नाव झळकवावं लागेल."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, " वेताळा, तुझ्या प्रश्नाचं उत्तर पुलंच्या शब्दातच देतो. पुलं म्हणतात, " स्वत:च्या मुलाला इंजिनिअर किंवा डॉक्टर बनवू अशी महत्त्वाकांक्षा बाळगणारे खूप आईबाप पाहिले आहेत, पण आपल्या पोरानं कलाक्षेत्रात नाव कमवावं, असं म्हणणारे आईबाप अजून पाहायचे आहेत." मग ही 'ॲम्बीशन' पूर्ण करायला मार्क्स मिळवायलाच हवेत, नाही का ? मुलांचा तरी यात काय दोष ? प्रत्येक आडवा येणारा मनुष्य त्यांना फक्त परसेन्टेजच विचारतो. लहानपणी परसेन्टेज व मोठेपणी पगार विचारला जातो. आयुष्याची इतिकर्तव्यता परसेन्टेज व पगार या दोन शब्दात संपते. विदेशातून भारतात आलेला एक भारतीय 'इंडियन रेल्वेनं' प्रवास करत होता. त्याच्या भारतीय सहप्रवासाला जेव्हा कळलं की आपल्या बाजूचा माणूस 'फॉरीन रिटर्न' आहे तेव्हा त्याने पहिला प्रश्न केला की, " साब, आपको वहापे कितना पगार मिलता है ?" बिचारा 'फॉरीनर भारतीय' या अनपेक्षित माऱ्यानं गोंधळून ,उद्‌गारला, "मी इतकी वर्षे विदेशात राहिलो पण असला चमत्कारिक प्रश्न मला तिकडे कोणी विचारला नाही." कारण तिकडे वैयक्तिक यशापेक्षा ग्रुप टास्कला जास्त महत्त्व दिलं जातं. आपल्याकडे 'स्कॉलर आणि ढ' पोरं एकाच वर्गात गुण्यागोविंदानं नांदत असतात. स्कॉलरला 'ढ' पोरांशी काही देणं-घेणं नसतं. मी बरा, माझा अभ्यास बरा. असल्या आत्मकेन्द्रित वृत्तीमुळे स्वहित जोपासण्याकडेच जास्त कल जातो. पैसा ही एक अत्यावश्यक गरज आहे. पैशाचं महत्त्व कोणीही नाकारू शकत नाही. तरीही याच पैशासाठी निराळ्या क्षेत्रात उडी

घ्यायची तयारी फारच थोडे लोक दाखवतात. आजही बरेच ठिकाणी वडिलांचाच व्यवसाय पोराने स्वीकारल्याची उदाहरणं सापडतात. मग पोराचा स्वाभाविक कल तिकडे असो वा नसो. सुरक्षितता हेच प्रमाण मानलं जातं. हितचिंतक मोठी मंडळी 'वदतो व्याघात:' या न्यायानं 'बाळचा पोहायला शिक बरं, अन् हे पाहा चांगलं पोहायला आल्याशिवाय पाण्यात मुळीच उतरू नकोस.' असं म्हणत बाळचाला आयुष्यभर कोरडंच ठेवतात.

भारतात टेनिसकडे व्यवसाय यादृष्टीने कोणीच पाहात नाही, अशी खंत विजय अमृतराजने नुकतीच बोलून दाखवली. सरकारी कृपेने वाढलेलं पोट निवृत्तीनंतर कमी करण्यासाठी आपल्याकडे टेनिस खेळलं जातं. अशानं जागतिक स्तरावरचे खेळाडू निर्माण होत नाहीत. क्रिकेटकडे व्यवसाय या दृष्टीनं पाहायला आताशा सुरुवात झाली आहे.

वेताळा, मघाशी तू रविंद्रनाथ, अत्रे वगैरेंचे उदाहरण दिलंस. हे लोक स्वयंप्रकाशी असतात. शांतीनिकेतन निव्वळ कवी कल्पना न राहता प्रत्यक्षात उतरलेलं स्वप्न होतं. तीच बाब रुपेरी पडद्यावर साकार होणाऱ्या अत्रे यांच्या राष्ट्रपतीपदक विजेत्या चित्रपटाची. इतरांना अवघड वाटणाऱ्या गोष्टी हे लोक लिलया करून दाखवतात. कारण प्रवाहाविरुद्ध पोहायची ताकद त्यांच्यामध्ये असते. परिस्थितीसमोर नमतं घेणंही यांना पटत नाही.

मात्र गुणवत्ता यादीत झळकलेली मुलं परिस्थितीच्या हातातले बाहुले बनतात. त्यामुळे त्यांच्याकडून जगावेगळे काही अपेक्षिणं म्हणजे त्यांच्यावर अन्याय केल्यासारखा होईल. बिच्चारे, आपला वकूब जाणून इमाने–इतबारे चाकरी करतात. मात्र ज्यांना काहीतरी भव्य–दिव्य करायचे आहे त्यांनी प्रवाहाविरुद्ध पोहायची तयारी ठेवावी. हा मार्ग खडतर आहे पण त्याला इलाज नाही. विद्यार्थ्यांनी निव्वळ मार्क्सवादी बनून मोठेपणी कॅपीटलदास म्हणजे पुंजीपती बनायच्या मागे न लागता आपल्या आवडत्या क्षेत्रातही जरूर डोकावून पाहवं.'

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या बोर्डावर जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# १९.

## ❊ ज्योतिषाचे भविष्य ❊

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेला वेताळ त्याला म्हणाला, " राजा, आतापर्यंत आपण पृथ्वीतलावरील व्यक्तींविषयी, घटनांविषयी बरंच काही बोललो आहोत, पण आज मात्र मनुष्य-प्राण्यांच्या सुखदु:खाशी निगडीत असणाऱ्या आकाशातील ग्रह–ताऱ्यांविषयी व त्या अनुषंगाने पृथ्वीतलावर बोकाळलेल्या ज्योतिषशास्त्राविषयी बोलू.

तसं पाहिलं तर चंद्र–चांदण्या–बिंदण्या या कुणाच्या अध्यात न मध्यात असणाऱ्यांना विनाकारण शब्दात पकडायची कसरत करत करत जमिनीवरच्या खड्ड्यात धडपडून चपलेचा अंगठा मोडून घेणं हा कवी लोकांचा आवडता छंद. आपला तो मार्ग नव्हे. त्यात तुझे पाय व नजर दोन्हीही जमिनीवरच असतात. माझा तर प्रश्नच नाही. तुझ्या आरक्षित भरभक्कम खांद्यावर विसंबून मी माझं निरीक्षण सुरू ठेवतो. आजही तेच केलं अन् सरळ नजर आकाशाला भिडवली. असं म्हणतात की जमिनीवर धडपडणाऱ्या व्यक्तींचा, इथल्या घटनांचा आकाशा-तल्या ताऱ्यांशी संबंध असतो. वरच्या ग्रहांना ग्रहण लागलं की इकडे खाली भल्याभल्यांची घसरण सुरू होते. ही रिमोट कंट्रोल सिस्टम अनादी कालापासून सुरू आहे. कदाचित या शास्त्राचा शोधही भारतीयांनीच लावला असावा. 'पामेस्ट्री' वर आपली स्टडी नाही अन खरं सांगायचं तर या शास्त्रासारख्या बेभरोशाच्या विषयावर अभ्यास नसलेली माणसंच अधिकारवाणीने बोलतात. या

शास्त्रावर आंधळे प्रेम करणाऱ्यांना या शास्त्राचा खरे-खोटेपणाबद्दल संशय घेतलेला मुळीच चालत नाही; उलट त्यांच्या आग्रहीपणाला बळी पडावं लागतं.

अगदी परवाच एका असल्याच ज्योतिषीप्रेमी मित्राच्या खास आग्रहास्तव ज्योतिषापुढं हात दाखवून अवलक्षण करावंच लागलं. एखाद्या कटींगवाल्यानं 'काय साहेब, दाढी घोटणार का नुसती कटींग ?' असं विचारावं त्याच सफाईनं ज्योतिषी म्हणाला, "कुठलं भविष्य जाणून घ्यायचं ? – आर्थिक का परमार्थिक ?" परमार्थिक या शब्दाचा अर्थ माहीत नसल्यामुळे 'आर्थिक' असंच पुटपुटलो. कटींगवाला काम झाल्यावर पैसे मागतो, यानं आधीच मागितले. लोकांना गुप्त-धनाचा मार्ग दाखवणारे ज्योतिषी स्वत: मात्र त्या मार्गाच्या वाटेला न जाता स्वत:चं आर्थिक भविष्य उज्वल का करत नाहीत, ते ज्योतिषीच जाणे ! मग मी दिलेल्या नोटेचा खरेखोटेपणा पडताळून पाहिल्यावर त्यानं माझा हात हातात घेतला. आपल्याला मात्र त्यानं सांगितलेल्या भविष्याचा खरेखोटेपणा पडताळून पाहायची सोय नव्हती. खासा न्याय आहे ! कसलेल्या नटाप्रमाणे चेहऱ्यावरचे हावभाव बदलत त्याने कोणाही मनुष्यप्राण्याला सुखावतील अशी चार–दोन ठराविक वाक्ये माझ्या तोंडावर फेकलीत. जसं 'तू सर्वांना सांभाळून घेतोस पण तुझा वाली कोणी नाही.' 'हे दोन–चार–सहा महिने जरा अडचणीचे जातील. मग तुमची भरभराटच भरभराट होईल' वगैरे.

त्याची ही बिनपाण्याची हजामत थांबविण्यासाठी म्हटलं, "महाराज, मज गरीबाच्या नशिबी काही पैसाबिसा आहे का, तेवढं पाहता का जरा ?" आणि मग गिऱ्हाईकाला खूष करणाऱ्या धंदेवाईक विक्रेत्याप्रमाणे तो म्हणाला, "वा राव ! तुमच्या तळहातावर तर मध्यभागी भला मोठा तीळ आहे. लाखात एखादा हात असा भाग्यवान असतो. जावा, बक्कळ पैका हाय तुमच्या हातात." मग खुषीत हात हलवत, मधूनच तळहातावरच्या मौल्यवान तिळाला गोंजारत गोंजारत हवेतच तरंगू लागतो; तेवढ्यात एक भिकारी आडवा आला अन खपाटीला गेलेल्या पोटावर हात मारून मारून भीक मागू लागला. मनात म्हटलं की, दोन–चार–सहा महिन्यात भरभराट होऊन बक्कळ पैसा मिळणार आहेच तेव्हा करावी मदत बिचाऱ्याला काहीतरी. हल्ली नोटेपेक्षा सुट्या नाण्यांना किंमत जास्त म्हणन नोट काढून भिकाऱ्याच्या हातावर ठेवली, अन तोच...अरेरे ! नशा उतरल्यावर दारुडा जसा बावचळतो तसाच मी बावचळलो. कारण त्या गरीब बिचाऱ्या भिकाऱ्याच्या तळहातावरही तीळ होता. न राहून शेवटी भिकाऱ्याला विचारलं 'की, बाबारे, तळहातावर तीळ असतानाही तुझी ही गत कशी ?' त्यावर मी दिलेली नोट मुठीत घट्ट धरून तो म्हणाला, "सायेब, असं उठसूठ कोणालाही नोटा वाटत सुटलात तर तुमचीही लवकरच माझ्यासारखी गत होईल." गोष्ट खरी आहे. लाचार

होऊन येणाऱ्या, जाणाऱ्यापुढं हात पसरणारे भिकारी काय अन स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास नसल्यामुळे ज्योतिषापुढे हात पसरवणारे काय दोघेही सारखेच. कधीकधी हे भिकारी, ज्योतिषी वगैरे लोक फारच मार्मिक बोलून जातात. असाच एकदा एक पंचविशितला तरुण मोठ्या आशेने ज्योतिषापुढे हात पसरून बसला होता. त्याची हलाखीची परिस्थिती पाहून ज्योतिषी म्हणाला, " वयाची तिशी ओलांडे-पर्यंत तुम्हाला आर्थिक अडचणींचा त्रास होईल." अन् मग पुढे तिशीनंतर चांगले दिवस येतील, या आशेने तरुणाने विचारले, व ' पुढे काय ?' 'पुढे त्या आर्थिक अड-चणींची तुम्हाला इतकी सवय होईल की, त्रास-बीस काहीच वाटणार नाही.' ज्योतिषी वदला. निव्वळ नशिबावर हवाला ठेवून बसल्यास व काळाच्या वेगाबरोबर कामाचा वेग वाढवल्यास सद्य:परिस्थितीत मुळीच बदल संभवत नाही. पणबहुते-कांना खाटल्यावर काहीतरी देणारा हरी किंवा छप्पर फाडके देनेवाला भगवानच प्यारा असतो. यातूनच मग लॉटरी, मटका, घोड्यांच्या शर्यती असल्या गोष्टी बळावतात. मेहनती माणसाला नशीब नेहमी साथ देतं, असं एक सुभाषित आहे. पण विनासायास नशिबानं साथ द्यावी अशीच या ज्योतिषाच्या नादी लागणाऱ्या मंडळींची इच्छा असते. असल्या मनोवृत्तीचा अभ्यास केलेले ज्योतिषीबुवा समोर-च्याचं भविष्य सांगण्याच्या निमित्तानं एक डोळा त्याच्या हातावर तर दुसरा खिशावर ठेवून, स्वत:चं भविष्य उज्वल करायच्या मागे लागतात. ही ' हातचलाखी ' ज्याला चांगली साध्य झालेली असते अशांना गिऱ्हाईकेही बडी-बडी मिळतात. ज्यांचा धंदा कमी चालतो ते बिचारे बसस्टँड, रेल्वे स्टेशन, आठवडी बाजार वगैरेंच्या आसपास पालं ठोकून बसलेले दिसतात. गिऱ्हाईकाला आकर्षित करायला नाना क्लृप्त्या योजतात. कोणी पिंजऱ्यातल्या पोपटाकडून चिठ्ठी काढून चिठ्ठ्यातलं भविष्य सांगतात तर काहींची पोपट पाळायची ऐपत नसल्यामुळे स्वत:च पोपटपंची कर-तात. हल्ली इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे भविष्य सांगणारे भविष्यवेत्ते चौका-चौकात दिसतात. इअर फोनसारख्या कानात दोन नळ्या अडकवून हे सायंटिफिक भविष्य ऐकावं लागतं. बाकी देशात इलेक्ट्रॉनिकचा असाही वापर होत नसावा. निदान याबाबतीत तरी इलेक्ट्रॉनिक्सचे बादशहा जपान्यांना आपण मागे टाकलं. इतर प्रगत देशांप्रमाणे आपणाकडे रोबोंचा म्हणजे यंत्रमानवाचा सुळसुळाट झाला तर ज्योतिषी लोक पोपटाऐवजी रोबोंकडून भविष्य वदवतील व एकविसाव्या शतकात या कॉम्प्युटर युगात प्रवेश करणारे आम्ही भारतीय रोबोंकडून कंपनीत किंवा ऑफिसात कॉम्प्युटर बसविण्यासाठी मूहूर्त पाहू. उद्या एखाद्या धनाढ्य साखर कारखानदारानं रोबोच्या हस्ते सत्यनारायणाची महापूजा घडवून आणली तर नवल वाटू नये. कारण भारतीय मनाची जडणघडणच मोठी विचित्र आहे. भारतीय माणूस एक पाऊल पुढे गेला आहे, असं अभिमानाने जेव्हा आपण समजतो तेव्हा

अधिक विचाराअंती तो दोन पावलं मागे गेल्याच कळतं.

एकदा तरुणांचं एक टोळकं एस्. टी. स्टँडवर चक्कलस करत होतं. काही तरुण टाईमपास करायला 'यष्टी सौंदर्य' पाहात फिरत होते. तेवढ्यात एकाच्या नजरेला वजन करायचं मशीन दिसलं हे मशीनही भरपूर कर्ज घेऊन मागाहून स्वतःला इन्सॉल्व्हंट डिक्लेअर करणाऱ्या कपटी बिझनेसमनप्रमाणे शिक्का आत टाकल्यावर नादुरुस्त असल्याचं कळवतं. मग आळीपाळीने तरुण स्वतःचे बदलते वजन व बदलते भविष्य पाहू लागले. मग भविष्यावर वगैरे बोलणं निघालं. इथेही दोन गट पडले. एक भविष्यावर विश्वास ठेवणारा तर दुसरा न ठेवणारा. वादावादी चालूच होती. कोणीच कोणाला हार जाईना. मग कोणाच्या तरी नजरेला एस. टी. स्टँडवर रेंगाळणारं गाढवाच पिल्लू दिसलं. मग कोठून तरी हातभर दोरी आणून त्यांनी शिशु गाढवाला बंदिस्त अवस्थेत वजनाच्या मशीनवर उभं केलं. कंटाळलेल्या इतर प्रवाशांनाही बरी करमणूक मिळाली होती. गाढवाच्या वजनापेक्षा सर्वांना भविष्याबद्दल उत्सुकता होती. गाढवाचं भविष्य वाचून सर्व पोट धरून हसू लागले त्यात लिहिलं होतं, 'आपको कॅबिनट मिनिस्ट्री में चान्स मिलेगा' उद्या एखादा मोठा दगड वजनाचे मशीनवर ठेवला तर त्यात 'आप बहोत सहृदयी हैं' असंही भलावण करणारं भविष्य येईल. या शास्त्रातील फोलपणा जाणवत असूनही चांगले शिकलेले लोक हात दाखवायच्या निमित्तानं खिसा साफ करून येतात.

आमचा असाच एक मित्र आहे. तो हस्तरेषा का हातावरचा कुठलासा उंचवटा पाहून कोणाच्या आयुष्यात किती 'बाया' येणार ही 'इंटरेस्टिंग' माहिती पुरवत असतो. एखाद्याला तू या बाबतीत खूप लकी आहेस असं सांगून त्याच्याकडून उधार पैसे लाटतो. तर एखाद्या कंजूष मित्राला 'एक लग्नाची बायको सोडली तर याबाबतीत तू अगदी ठणठणपाळ आहेस' असं सांगून त्याला बेचैन करतो. इतरांच्या वाट्याला डझनानी बायका येत असताना आपल्याच वाट्याला एकुलती एक का ? या विचारानं काकुळतीला येऊन तो कंजूष मित्र ज्योतिषी मित्राला हॉटेलात घेऊन जातो व पुन्हा एकदा व्यवस्थितपणे हात पाहायची विनंती करतो. वेटर खाद्यपदार्थ घेऊन येतोय असं दिसल्यावर भविष्यवाणी सुरू होते, 'तुझ्या हातावर एक अस्पष्ट रेषा आहे म्हणजे अजून तरी एखादी नक्कीच...'

या बेट्या जोतिषींचं नशीबही जोरावर असतं. कारण त्यांचं भविष्य खोटं निघालं तरी त्याबद्दल त्यांना जाब मात्र कोणी विचारत नाही. अन् चुकूनमाकून खरं निघालं तर मात्र एकदम भरघोस प्रसिद्धी मिळते. एकंदरीत असल्या गुढविद्यांबाबत सर्वसामान्यांना जबरदस्त आकर्षण आहे. अन त्यापायीच या शास्त्राला

झुकतं माप देण्यात येत असावं. राजा, याबद्दल तुझं काय मत आहे ? जर एकाएकी लोकांनी विज्ञानवादी दृष्टीकोन स्वीकारला किंवा दैववाद फैलावणाऱ्या व कष्टकरी वृत्तीस आळा घालणाऱ्या या धंद्यावर जर सरकारने गदा आणली तर ? राजा, ज्योतिषींच्याच भवितव्याबद्दल तुला काय वाटतं ? माझ्या या प्रश्नांची उत्तरं माहीत असूनही तू न दिल्यास तुला कुडमुड्या ज्योतिषीसमोर हात पसरवून बसावं लागेल व त्याची कंटाळवाणी निरर्थक बडबड ऐकावी लागेल."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, लक फॅक्टर या गोष्टीचं महत्त्व मान्य करावंच लागेल. काही लोक तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला येतात ते निव्वळ नशिबाच्या जोरावर अर्थात् कर्तृत्ववान माणसाचं भविष्य त्याच्या मनगटाच्या जोरावरच असतं. जे. आर. डी. टाटा म्हणतात, "मला आश्रमात जाऊन ध्यानस्त बसणं जमणार नाही. कारण मी फक्त कामाच्याच कामाचा आहे." पंचाहत्तरी ओलांडलेल्या या 'तरुणानं' नुकतंच यशस्वी विमानोड्डाण करून दाखविले. पण या झाल्या असामान्यांच्या गोष्टी. सामान्य शेतकऱ्याला किंवा बेकार युवकाला आपल्या समस्या ज्योतिषींपुढे मांडाव्याच लागतात. कारण सरकारलाही त्यात विशेष आस्था नसते व आप्त-स्वकीयांना स्वतःच्या समस्या असतात. मग अत्यल्प मोबदला घेऊन ज्योतिषी बिचाऱ्यांना दिलासा देतो. कुठलेही वृत्तपत्र घ्या, त्यात राशी-भविष्य असतंच; लोकंही ते आवडीने वाचतात. तसंच लॉटरी तिकिटं घेणारेही आपला कामधंदा सोडत नाही. पण मेहनतीला नशिबाची साथ खरोखरच लागते म्हणूनच अतिप्रगत अशा विज्ञानवादी देशातील लोकही ग्रह–ताऱ्यांवर विश्वास ठेवतात. आजच्या या धावपळीच्या आयुष्यात कोणालाच दुसऱ्याकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. अशा परिस्थितीत 'यू ॲटीटयूड' ठेवून काम करणारे ज्योतिषी लक्ष वेधून घेतात. निदान संघटितपणे माणस समस्यांची उकल करत नाहीत तोवर ज्योतिष्यांना पर्याय नाही. त्यांचे भविष्य उज्वल आहे."

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व 'येथे आपल्या मनाजोग्या जन्मपत्रिका बनवून मिळतील' अशी पाटी असणाऱ्या कोण्या ज्योतिषीच्या दरवाज्याला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# २०.

## ❋ सरकारी फिल्मस् ❋

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे जाऊ लागला. त्यावेळी चित्रपटांच्या जाहिरातीचे मोठमोठे पोस्टर्स पाहून वेताळ म्हणाला, "राजा, या असल्या दिलखेचक जाहिराती लोहचुंबकाप्रमाणे आकर्षित करतात. परिणामी चित्रपटगृहात जाऊन बसावंच लागतं. पडद्यावर नायिका आपल्या सहेलीबरोबर चुनरीया, सांवरीया, बाली उमरीया, पतली कमरीया 'या या' शब्दानं संपणारं गाणं म्हणत पनघटवरून घट सांभाळत नदी किनारे पाणी भरायला जाते. बरं, इथंही चूपचाप पाणी भरावं की नाही? पण नाही. एकमेकींच्या अंगावर पाणी उडवणं, थट्टा-मस्करी चाललेलीच असते. मग एखादा नटखट कन्हैया डोईवरच्या घागरीवर खडा मारतो अन पाणी भरायची सर्व मेहनत पाण्यात जाते. आमच्या एका गणितो मित्रास नेहमी कोडं पडलेलं असतं. एक घागर पाणी भरायला जर हिला एवढा वेळ लागत असेल तर मग घरातील एकूण व्यक्ती, त्यांना लागणारं सर्व प्रकारचं पाणी भरायला किती वेळ लागत असेल? अन त्यानंतर इतर घरकामाला वेळ मिळत असेल का? आमची डिफिकल्टी वेगळीच. पडद्यावरची सुप्रभात पाहून पहाटेच्या पारीच एका खेडेगावातील नदीचा रस्ता तुडवू लागलो तर तिथं हातात 'घगरीया' ऐवजी डब्बा घेऊन 'ग्रामीण जनता' निसर्ग विधीसाठी निसर्ग सान्निध्यात खाली मान घालून बसली होती. ते नेत्रदीपक दृश्य पाहवेना म्हणून ओशाळवाणं होऊन कुठंतरी शून्यात नजर लावून तिथून सटकलो.

यावरून चित्रपट वास्तवतेपासून किती दूर आहेत हे तुझ्या लक्षात येईल. तरीही आपण चित्रपट पाहतोच. या प्रेक्षक वर्गात तरुणांचा भरणा फार. त्यांच्या समाधानासाठी असंही दृश्य दाखवलेलं असतं की, करोडोपती बायको एकलौती, खुबसूरत अर्थात सोलह सालकी जवान बेटी आपल्या पिताजींना बॉयफ्रेंडशी ओळख करून देते. ' पिताजी, यह है रॉकेश, गिटार बहोत अच्छा वजाता है ' मग पाईप-मधून धूर सोडत पिताजी म्हणतात, " ठीक है रॉकेश, हमारे कंपनी में मॅनेजरकी जगह खाली है, तूम कलसे कामपर आ जावो " आहे की नाही गंमत ? गिटार वाजवण्याचा अन मॅनेजरीअल पोस्टसारख्या अति महत्त्वाच्या पदाचा काहीतरी संबंध आहे का ? का या रॉकेशला मॅनेजर झाल्यावर वर्कींग अवर्समध्ये गिटार वाजवून स्टाफचं मनोरंजन करायचं ?

स्वप्नरंजन तरुणांना आवडतं म्हणून हे असं खोटारडं अंजन घालून विचाऱ्यांची दृष्टी अधू का करायची ? या स्वप्नरंजनाबरोबरच स्वप्नपूर्तीही जबरदस्तीने घुसलेली असते. जातीपातीच्या उच्चाटनासाठी वरपांगी का होईना सरकारची धडपड चाललेली असते. पण हिंदी सिनेमा मात्र 'खानदान की इज्जत' या शब्दाशिवाय पूर्ण होतच नाही. झोपडपट्टीचा दादा असलेला हिरो ढुशम ढॅश करत व्हिलन अॅन्ड कंपनीची दाणादाण उडवतो. मग फिल्मी म्हातारा हिरोचा पराक्रम खरं तर रंगरूप पाहून म्हणतो, " बेटा तूम इन लोगोंमेंसे नही दिखते, जरूर तूम किसी उचे खानदान के हो. " पुढे प्राथमिक चौकशीतच त्याला कळतं की, हिरो म्हणजे दुसरा–तिसरा कोणी नसून बरसो पहेले ठाकूरसाव का बिछडा हुआ बेटा है, 'बिछडे भाई' हा हिंदी सिनेमाचा जिव्हाळ्याचा विषय. एका चित्रपटात भावा–बहिणीची ताटातूट दाखवली आहे. इन्टरव्हल नंतर दोघं भेटतात. ते हिरोच्या छातीवरील खानदानी खुणेमुळे. अंगातला शर्ट काढून हिरो राजघराण्यातली खूण दाखवतो. मला उगीचच भीती वाटत होती की, बहिणही त्याचं अनुकरण करते की काय ? पण सेन्सार कृपेने तसलं काही झालं नाही. चित्रपटाची अठरा रिळे अठरा विश्व दारिद्र्यात घालवणाऱ्या हिरोला शेवटच्या रिळात श्रीमंत दाखवलं जातं. गडगंज संपत्ती व सुस्वरूप पत्नीही शेवटी त्याला मिळते.

तीच गत कामगारांच्या प्रश्नांचीही. सिनेमातला कामगार हिरो दिवसभर फॅक्टरीत ड्यूटी केल्यावर संध्याकाळी कविता करतो व समुद्र किनारी नवकवीच्या उत्साहात स्वतः गुणगुणतो. मग फॅक्टरी मालीक की पुन्हा एकलौती बेटीच... या फॅक्टरी मालकांना व तत्सम फिल्मी श्रीमंतांना एकलौत्या बेटयाच का असतात हा विषय आता पी. एच. डी. साठी दुसरे विषयच उरले नसल्यामुळे घ्यायला हरकत नाही. हं, तर काय सांगत होतो की ही एकलौती बेटी कामगार हिरोच्या कवितांवर खूष होते. त्या खुषीतच दोघांचं लग्नही होतं मग बेडरूममध्ये दोघे

# २०.

## ❋ सरकारी फिल्मस् ❋

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे जाऊ लागला. त्यावेळी चित्रपटांच्या जाहिरातीचे मोठमोठे पोस्टर्स पाहून वेताळ म्हणाला, "राजा, या असल्या दिलखेचक जाहिराती लोहचुंबकाप्रमाणे आकर्षित करतात. परिणामी चित्रपटगृहात जाऊन बसावंच लागतं. पडद्यावर नायिका आपल्या सहेलीबरोबर चुनरीया, सांवरीया, बाली उमरीया, पतली कमरीया 'या या' शब्दानं संपणारं गाणं म्हणत पनघटवरून घट सांभाळत नदी किनारे पाणी भरायला जाते. बरं, इथंही चूपचाप पाणी भरावं की नाही ? पण नाही. एकमेकींच्या अंगावर पाणी उडवणं, थट्टा–मस्करी चाललेलीच असते. मग एखादा नटखट कन्हैया डोईवरच्या घागरीवर खडा मारतो अन पाणी भरायची सर्व मेहनत पाण्यात जाते. आमच्या एका गणिती मित्रास नेहमी कोडं पडलेलं असतं. एक घागर पाणी भरायला जर हिला एवढा वेळ लागत असेल तर मग घरातील एकूण व्यक्ती, त्यांना लागणारं सर्व प्रकारचं पाणी भरायला किती वेळ लागत असेल ? अन त्यानंतर इतर घरकामाला वेळ मिळत असेल का ? आमची डिफिकल्टी वेगळीच. पडद्यावरची सुप्रभात पाहून पहाटेच्या पारीच एका खेडेगावातील नदीचा रस्ता तुडवू लागलो तर तिथं हातात 'घगरीया' ऐवजी डब्बा घेऊन 'ग्रामीण जनता' निसर्ग विधीसाठी निसर्ग सान्निध्यात खाली मान घालून बसली होती. ते नेत्रदीपक दृश्य पाहवेना म्हणून ओशाळवाणं होऊन कुठंतरी शून्यात नजर लावून तिथून सटकलो.

यावरून चित्रपट वास्तवतेपासून किती दूर आहेत हे तुझ्या लक्षात येईल. तरीही आपण चित्रपट पाहतोच. या प्रेक्षक वर्गात तरुणांचा भरणा फार. त्यांच्या समाधानासाठी असंही दृश्य दाखवलेलं असतं की, करोडोपती बायको एकलौती, खुबसूरत अर्थात सोलह सालकी जवान बेटी आपल्या पिताजींना बॉयफ्रेंडशी ओळख करून देते. 'पिताजी, यह है रॉकेश, गिटार बहोत अच्छा वजाता है' मग पाईप-मधून धूर सोडत पिताजी म्हणतात, "ठीक है रॉकेश, हमारे कंपनी में मॅनेजरकी जगह खाली है, तूम कलसे कामपर आ जावो" आहे की नाही गंमत? गिटार वाजवण्याचा अन मॅनेजरीअल पोस्टसारख्या अति महत्त्वाच्या पदाचा काहीतरी संबंध आहे का? का या रॉकेशला मॅनेजर झाल्यावर वर्कींग अवर्समध्ये गिटार वाजवून स्टाफचं मनोरंजन करायचं?

स्वप्नरंजन तरुणांना आवडतं म्हणून हे असं खोटारडं अंजन घालून विचाऱ्यांची दृष्टी अधू का करायची? या स्वप्नरंजनाबरोबरच स्वप्नपूर्तीही जबरदस्तीने घुसलेली असते. जातीपातीच्या उच्चाटनासाठी वरपांगी का होईना सरकारची धडपड चाललेली असते. पण हिंदी सिनेमा मात्र 'खानदान की इज्जत' या शब्दाशिवाय पूर्ण होतच नाही. झोपडपट्टीचा दादा असलेला हिरो ढुशम ढॅश करत व्हिलन अॅन्ड कंपनीची दाणादाण उडवतो. मग फिल्मी म्हातारा हिरोचा पराक्रम खरं तर रंगरूप पाहून म्हणतो, "बेटा तूम इन लोगोंमेंसे नही दिखते, जरूर तूम किसी उचे खानदान के हो." पुढे प्राथमिक चौकशीतच त्याला कळतं की, हिरो म्हणजे दुसरा–तिसरा कोणी नसून वरसो पहेले ठाकूरसाव का बिछडा हुआ बेटा है, 'बिछडे भाई' हा हिंदी सिनेमाचा जिव्हाळ्याचा बिषय. एका चित्रपटात भावा–बहिणीची ताटातूट दाखवली आहे. इन्टरव्हल नंतर दोघं भेटतात. ते हिरोच्या छातीवरील खानदानी खुणेमुळे. अंगातला शर्ट काढून हिरो राजघराण्यातली खूण दाखवतो. मला उगीचच भीती वाटत होती की, बहिणही त्याचं अनुकरण करते की काय? पण सेन्सार कृपेने तसलं काही झालं नाही. चित्रपटाची अठरा रिळे अठरा विश्व दारिद्र्यात घालवणाऱ्या हिरोला शेवटच्या रिळात श्रीमंत दाखवलं जातं. गडगंज संपत्ती व सुस्वरूप पत्नीही शेवटी त्याला मिळते.

तीच गत कामगारांच्या प्रश्नांचीही. सिनेमातला कामगार हिरो दिवसभर फॅक्टरीत ड्यूटी केल्यावर संध्याकाळी कविता करतो व समुद्र किनारी नवकवीच्या उत्साहात स्वत: गुणगुणतो. मग फॅक्टरी मालीक की पुन्हा एकलौती बेटीच...या फॅक्टरी मालकांना व तत्सम फिल्मी श्रीमंतांना एकलौत्या बेटयाच का असतात हा विषय आता पी. एच. डी. साठी दुसरे विषयच उरले नसल्यामुळे घ्यायला हरकत नाही. हं, तर काय सांगत होतो की ही एकलौती बेटी कामगार हिरोच्या कवितांवर खूष होते. त्या खुषीतच दोघांचं लग्नही होतं. मग बेडरूममध्ये दोघे

कामगारांच्या समस्यांची उकल करतात. कशाला पाहिजे इंडस्ट्रीयल डीस्पूट ॲक्ट, लेबर कोर्ट वगैरे भानगड ? डांगे, एस्. एम्. अन् दत्ता सामंत यांना लालभडक भाषण करून कामगारांच्या हृदयसिंहासनावर आरूढ होण्यापेक्षा गुलाबी गुलाबी कविता करून एकलौती बेटीच्या हृदयसिंहासनावर आरूढ होता आलं असत तर कामगारांच्या न्याय्य मागण्या केव्हाच मान्य झाल्या असत्या. खरं तर आपल्याकडील कामगारांच्या समस्यांवर सुरेख चित्रपट निघू शकतो. पण आपले निर्माते मूळ प्रश्नाला बगल देऊन कामगार पुढाऱ्याला व फॅक्टरी मालकाच्या पोरीला निरनिराळ्या बगीच्यांत, निरनिराळ्या कपड्यांत नाचवतात. कापड विक्रेत्यानं रंगीबेरंगी कापडाची ठाणं गिऱ्हाईकांसमोर मोकळी करावीत तद्वतच आजच्या या सर्वांगसुंदर नायिका अर्धांग दाखवत हरतऱ्हेच्या रंगीबेरंगी कपड्यांत प्रेक्षकांपुढे पेश होतात पाच मिनिटाच्या गाण्याला पन्नास ड्रेसेस अन् पाचशे डान्सींग पोजेस ! ! अंगचा अभिनय दाखवण्याऐवजी ‘अभिनयाचं अंगच’ जास्त दाखवतात. या एकुलत्या बेटीचा बापही बडा दिलदार असतो. आपल्या कामगार पुढारी जावयावर कारोबार सोपवून स्वखुषीने निवृत्त होतो.

लेनिननं हे फसवं दृश्य पाहिलं असतं तर रागारागाने आपल्या दाढीचे केस उपटले असते व मार्क्स–एंजेल्स या जोडीनं आपल्या पुस्तकांच्या न खपलेल्या प्रतींची समान वाटणी करून त्याची पानं टराटरा फाडायला सुरुवात केली असती. कदाचित पड्यावरची असली फसवी दृश्यं पाहून आजचा आधुनिक मार्क्स, फॅक्टरी मालकांना उद्देशून असंही म्हणेल, “ जगातील मालकांनो एक व्हा, यु हॅव नथींग टू लूज बट युवर एकलौती डॉटर. ”

हल्ली टीव्हीचं अन् सिनेमाचं झकास सूत जमलंय. घरच्या घरीच सिनेमा पाहायची सोय झाल्यामुळे लोक सुखावले. पण जातीवंत प्रेक्षकाला टीव्हीवरचा सिनेमा पचतच नाही. डायनिंग टेबलवर चकचकीत डीशमध्ये, स्टीलच्या चमच्यांनी हुरडा खाताना जसं वाटेल तसेच टीव्हीवरचा सिनेमा पाहताना होतं. चित्रपटगृहात पड्यावरच्या कलाकारांबरोबर प्रेक्षकातले ‘कलाकारही’ चित्रपट फुलवायला हातभार लावतात. जवानीचा भार न पेलल्यामुळे भरकटत जाणाऱ्या हिरॉइनचा तोल ढळतो व ती चक्क पाण्यात पडते. ओल्या ओल्या अंगानं थबथबुन वर येते. प्रेक्षागृहातून पसंतीच्या मस्तपैकी शिट्ट्या ऐकू येतात. चित्रपटाच्या म्युझिकपेक्षा हे बॅकग्राऊंड म्युझिक इफेक्टीव्ह वाटतं. त्या नादात लाल साडी घालून पाण्यात पडलेली हिरोइन हिरवी साडी घालून वर आली तरी असल्या ढोबळ चुका आपण उदार मनानं माफ करतो. फ्रंट चेंबर्स पै न पैचा हिशोब वसूल करत ओला आनंद मनमुराद लुटतात. टीव्हीवर असली गमत नाही. एकतर टीव्हीवर तृतीय श्रेणीचेच चित्रपट दाखविले जातात. फारसं बाहेर निघू न शकणारा स्त्री वर्ग हाच टीव्हीचा

खरा प्रेक्षकवर्ग. पण या वर्गाचंही चित्रपटापेक्षा घरकामातच जास्त लक्ष असतं. टीव्हीच्या पडद्यावरील नायक–नायिकेच्या मैत्रीला प्रेमाची उकळी फुटली की वरणाला उकळी फुटल्याची आठवण होऊन या गृहिण्या स्वयंपाकघरात जाऊन वरण ढवळत बसतात. ते झालं की थोड्या वेळानं परत सिनेमा पाहू लागतात तर हिरो व्हिलन मंडळीची कणीक तिंबतो हे पाहून भिजवलेल्या कणकीचा गोळा तिंबायला त्या आत जातात त्या सिनेमा संपेपर्यंत बाहेर येतच नाहीत. अशा परिस्थितीत हे तृतीय श्रेणीचेच चित्रपट दाखवणं बरं. राजा, चित्रपटाच्या धंद्यात अजिबात मरण नाही. बडी बडी मंडळी धंदेवाईकपणे इथं आपलं उखळ पांढरं करून घेतात. आपण मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली आहे. तेव्हा आपल्या सरकारने चित्रपट उद्योगासारख्या मोठ्या उद्योगात पैसा गुंतवून या वाहत्या गंगेत आपली एखादी बकेट का भरू नाही ? खरं तर त्यामुळे दर्जेदार चित्रपट निर्मितीला हातभार लागू शकेल. एका चित्रपटासाठी कलाकार, तंत्रज्ञ, लेखक, गीतकार असल्या नाना क्षेत्रातील शे–पाचशे मंडळी सहज लागतात. सरकारनं या प्रत्येक क्षेत्रासाठी धंदेवाईक अभ्यासक्रम सुरू करून खाजगी चित्रपटांबरोबर जरूर स्पर्धा करावी. हल्ली घराणेशाहीमुळे बऱ्याच चांगल्या कलाकारांना ब्रेक मिळू शकत नाही. त्यांना गुणवत्तेनुसार गव्हर्मेंट फिल्ममध्ये काम दिल्यास कलाक्षेत्रावर सरकारचे अनंत उपकार होतील. पलायनवादी कमर्शियल चित्रपटांना शह बसावा म्हणून सरकारनं स्वतःच चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रात का उतरू नये ? या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू न दिल्यास तुला स्टारसन्सचे पडेल सिनेमे पाहावे लागतील."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, तुझी ही गव्हर्मेंट फिल्मची कल्पना आपल्याला आवडली. पण तिला मूर्त स्वरूप देणं हे तसं कठीणच. कारण पब्लिक सेक्टरमधल्या शुगर, सिमेंट, आयर्न अॅन्ड स्टील इंडस्ट्रीज डुबीतच असतात पण खाजगी क्षेत्रातली फिल्म इंडस्ट्री मात्र जगात निर्मितीच्या दृष्टीनं पहिली आहे. याचं कारण म्हणजे त्या क्षेत्रातील प्रचंड स्पर्धा. त्या स्पर्धेत टिकाव धरायला रात्रंदिवस मेहनत करणारी माणसं. सरकारी योजना या वर्षानुवर्षे कागदपत्रावरच पडून राहतात. आता कल्पना कर की गव्हर्नमेंट फिल्ममध्ये हिरोचा रोल करण्यासाठी युवा उमद्या, गुणवान पंचविशीतल्या पोराची निवड झाली आहे. पुढे इतर योजनांप्रमाणे तीही योजना सरकारदरबारी धूळ खात पडून राहील. मग तीस-पस्तीस फाईलीवरची धूळ झटकून फाईल उघडली जाईल व हिरोला पत्र पाठवले जाईल मग साठीला टेकलेला हिरो गुडघेदुखी, सांधेदुखी, ब्लडप्रेशर वगैरे निमित्त करून काम करावयास नकार देईल. साठीतही हिरोगिरी करायला सगळेच काही जिंदादील देवआनंद नसतात. झटपट निर्णय

क्षमता, अंग मोडून काम करायची प्रवृत्ती असले सद्गुण घऊन जर गव्हर्नमेंट फिल्मवाले गव्हर्नमेंट सर्व्हंट काम करू लागले तरच ' गव्हर्नमेंट ऑफ इंडिया पेश करते है ' या ओळी आपल्या पडद्यावर दिसतील. दुसरं म्हणजे तू कमर्शियल, पलायनवादी वगैरे दुषणे आजच्या चित्रपटास लावली. पण प्रेक्षक सिनेमा पाहतो ते मनोरंजनासाठीच. ज्ञान आणि मनोरंजन खुषीनं एकत्र केल्यास तेही लोकांना आवडेल. सूर्योदय व सूर्यास्त पाहायला लोकांना आवडतं. पण मध्यान्हीचा सूर्य वास्तव असूनही कोणी पाहात नाही. यजमान मेहमानाला आपलं घर दाखवतो त्यावेळेस लॅट्रीन, बाथरूम हे वास्तव कटाक्षाने टाळतो. तरीही मेहमानानं ते पाहायची इच्छा प्रदर्शित केल्यास यजमान मेहमानाला साबण कुठं ठेवलाय ती जागा दाखवून मोकळा होईल. प्रोजेक्टरचा शोध लावून एडीसननं लोकांना थक्क केलं. आजचे अति प्रगत थ्री डायमेनशनल चित्रपट पाहून एडीसनच वेडा व्हायचा. चित्रपट हा धंदा असल्यामुळे त्यात ' कॉमर्स ' हवं. कला, याने की, ' आर्ट ' हवीच. ते प्रत्यक्षात साकार करणारी टेक्नॉलॉजी म्हणजे ' सायन्सही ' हवंच. या तिन्ही गोष्टींचा प्रमाणशीर वापर जो करेल त्यावर प्रेक्षक खूष असतील. मग तो खाजगी उद्योगवाला असो की गव्हर्नमेंट फिल्मवाला, एकूण एकच. "

अशा प्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहिसा झाला व कोठल्याशा फिल्म स्टुडिओच्या कॅमेऱ्याला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# २१.

## ※ रस्त्यावरची वरात ※

विक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेला वेताळ राजाला म्हणाला, " राजा, आता लगीन सराईचे दिवस जवळ आले आहेत. अगदी परवाच कुठल्यातरी महत्त्वाच्या कामानिमित्त घाई-गडबडीत निघालो अन् कोण्या शिरमंताच्या चिरंजीवांची भली मोठी वरात रस्त्यात आडवी आली. अर्धा–एक तास रहदारीचा खोळंबा झाला अन् लोकांच्या या गैरसोयीकडे विजयी सम्राटानं मांडलिक राजांकडे पाहावं त्या तुच्छतेनं पाहात घोड्यावरचा शहाणा आसुरी आनंद मनोमन उपभोगत होता. कदाचित मुळातच जास्त चरबी असलेल्या त्याच्या शरीरावर हा बडेजाव पाहून अजून मूठभर मांस नक्कीच चढलं असेल.

सर्वप्रथम असले नवरदेव वरातीसाठी रस्त्यावर उतरायचा स्वखुशीनं निर्णय घेतात. मग पुढं श्वशूरांना पायजाम्याच्या नाडीपासून तो महागड्या मोटारगाडीपर्यंत डिमांड केली जाते. ही मागणी मान्य न झाल्यास नववधूस ओलीस धरण्यात येतं. मग लोकच अशा नवरदेवांना रस्त्यावर खेचतात. आजकाल माणसं रस्त्यावर उतरायला एवढे का उत्सुक असतात हे कळत नाही, फार पूर्वी असं नव्हतं. तेव्हा लग्न हा सोपा सुटसुटीत प्रकार होता. पंचक्रोशीतच पोरगी द्यायची असा विचार करून मंडळी बैलगाड्या जुंपवून सोयरीक जुळवायला जात. देण्या–घेण्याचं जुजबी बोलणं व्हायचं. हुंड्यानं आजच्यासारखं आक्राळ–विक्राळ स्वरूप धारण केलं

नव्हतं. हुंड्याची ओरिजीन तपासून पाहायची म्हटलं तर आर्य लोकांमध्ये वरदक्षिणा म्हणून गोधन देण्याची पद्धत होती, असा उल्लेख आढळतो. कदाचित त्या काळच्या 'आर्य टाईम्स'मध्ये 'सासऱ्यानं आखूड शिंगाची गाय दिल्यामुळे आर्यवीराचा लग्नास नकार' वगैरे बातम्याही येत असाव्यात.

हल्ली तर असल्या बातम्या रोजच्याच झाल्यात. ऊसाचा 'गळीत हंगाम' काही काळापुरता मर्यादित असतो. पण हा हुंडाबळीचा 'जळीत हंगाम' बारा महिने सुरूच असतो. आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरं होऊन दहा वर्षं लोटलीत. उलट या दहा वर्षांत हुंडाबळीची प्रकरणं दसपट वाढलीत. याचं कारण जाणून घ्यायला भाषणबाजी, निदर्शने, पथनाट्य करणाऱ्या एका पुरोगामी महिलेच्या घरी गेलो. कधी नव्हे ते मवाळ आवाजात त्या सांगू लागल्या, "घसा कोरडा पडेपर्यंत आरडाओरडा केला तरी काहीही फरक पडत नाही हो, शेवटी लोक त्यांना करायचं तेच करतात." जाता जाता त्यांनी हेही सांगितलं की हुंड्यापुढं त्यांना अखेर हार खावी लागली. मुलीच्या लग्नात तत्त्व वगैरे बाजूला सारून हुंडा द्यावाच लागला. काय करणार, आजकाल चांगल्या अल्सेशिअन कुत्र्यालाही हजारोंनी दिडक्या मोजाव्या लागतात. इथं तर जित्या-जागत्या माणसाचा प्रश्न आहे. अशावेळी असं वाटतं की, सामाजिक मन ही अद्‌भूत चीज आहे की, जी वाणीनं सत्याचा पुरस्कार करीत कृतीनं असत्याचा स्वीकार करते. देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे हे हुंड्याच्या बाबतीत चपखल लागू पडतं. अगदी व्यापारी वृत्तीनं लग्नाआधी, लग्नात व लग्नानंतरही ही वसुली चाललेलीच असते. हुंडा सुलभ हप्त्यानं वसूल करण्याचा सोपा मार्ग म्हणून साखरपुड्याचा घाट घातला जातो.

रामाचा साखरपुडा, कृष्णाचे साखरपुडे किंवा द्रौपदीचे साक्षगंध झाल्यासंबंधी पुराणात कुठं उल्लेख आढळत नाही. मनगटाच्या जोरावर कुठलातरी 'पण'बीण जिंकून मगच स्वयंवर होतं.

आजही पाश्चिमात्य देशातील जॉनराव आपल्या डॉक्टर लुसीचा हात कोणा कॅशीच्या हातात देण्याआधी त्याची लायकी तपासून पाहतो, लुसीलाही त्यासंबंधी स्वतंत्र विचार करायची मुभा असते आपल्याकडे जावईबापूंना काहीच विचारायची सोय नसते लायकीबियकी काढली की तोबा तोबा ! ! उच्च भारतीय संस्कृतीच्या नावाखाली विनाकारण कर्मकांडाचे स्तोम आपण माजवतो. आता असे पाहा— समृद्धीचं प्रतिक म्हणून कलश वापरतात. पण कर्ज-बाजारी झालेला, प्रचंड कर्ज काढून लग्न उरकणाराही 'कलश' ठेवतोच. अनावश्यक कर्मकांडाची अशी शेकडो उदाहरणं सापडतील पण बुद्धिवरचा गंज साफ करण्याचे श्रम नकोत म्हणून सर्रास

कर्मकांड उरकले जातात. एका कावीळग्रस्त नवरोजींनी अंगात त्राण नसूनही डॉक्टरी सल्ला झुगारून 'हौसेनी' चार–चौघांच्या साहाय्यांनी लग्नातले सर्व कर्मकांड पार पाडले होते म्हणतात. काय म्हणावं अशांना ?

राजा, स्वैराचाराला आळा बसावा, कुटुंबसंस्था मोडकळीस निघू नये किंबहुना असंख्य सुखी कुटुंबाद्वारे बनलेल्या सुखी समाजाचे स्वप्न साकार व्हावे यासाठीच याज्ञवल्काने 'विवाह' ही कल्पना मांडली. पुढे सिद्धेश्वरशास्त्री चित्राव वगैरे वऱ्याचजणांनी त्यावर संशोधन केलं. आज मात्र विवाह या प्रकारातलं काव्य वगैरे जाऊन नुसता रुक्ष व्यवहार उरला आहे. हुंडाबळी या विषयावर निघालेले भरमसाठ चित्रपट याची साक्ष देतीलच. साधारण शंभर वर्षांपूर्वीच मामा वरेरकरांनी 'हाच मुलाचा बाप' का असल्याच काहीतरी नावाचं हुंड्याच्या समस्येवर नाटक लिहिलं होतं भाषाप्रभू राम गणेश गडकऱ्यांनी केलेले मुलांच्या बापांचे वर्णन त्यांच्याच शब्दात तुला ऐकवतो. 'मुलाचा बाप हा महंमद गझनीच्या धनलोभाने स्वार्थपारायण होतो, नेपोलियनच्या महत्वाकांक्षेने तो आपल्या मुलाकडे पाहतो. नाना फडणीसांच्या व्यवहार कौशल्याने तो मुलांची किंमत ठरवितो. शिवछत्रपतींच्या धाडसाने वाटेल त्या विजापूरकरावर तो त्या रकमेचा मारा करतो आणि नादिरशहाच्या क्रूरपणाने ही रक्कम वसूल करून घेतो." एवढं सगळं होत असताना तो नवरा मुलगा नावाचा दोन पायाचा प्राणी कुठं हाताची घडी अन् तोंडावर बोट ठेवून देवासारखा गप्प बसलेला असतो देव जाणे ! त्याला खरोखर स्वत:चे विचार नसतात का ? का स्वार्थासाठी आई-वडिलांच्या आडून छुपा मारा करण्यातच तो पुरुषार्थ मानतो ?

पत्रिकेला 'ब्लड ग्रुप' हा सर्वार्थीनं योग्य पर्याय सुचवलेला असूनही वर्णगुण, वश्यगुण, तारागुण, गणगुण वगैरे भुणभुण खपवून घेतोच. आमच्या एका मित्राच्या मते लग्न हा शंभर टक्के प्रोफेशनल प्रकार आहे. कारण कुठल्याही प्रोफेशनल कोर्समध्ये कमीत कमी पन्नास टक्के पासिंग मार्क्स मिळवावे लागतात. तसंच लग्नाच्याही या पत्रिकारुपी अभ्यासक्रमात छत्तीस पैकी अठरा गुण म्हणजे पन्नास टक्के गुण 'जुळवावेच' लागतात. आधीच रानटी लोक म्हणून पाश्चिमात्य देशांमध्ये भारतीयांची 'इमेज' बनली आहे. ती धुवून–पुसून काढण्यासाठी आपण वैज्ञानिक प्रगतीच्या, उपग्रह सोडल्याच्या, अंतराळात माणूस पाठवल्याच्या गप्पा मारतो. पण अमेरिकन टी. व्ही. वर लघुपट दाखवला जातो तो भारतातल्या 'हुंडाबळी' या समस्येवर. अशानं आपल्या रानटीपणावर शेवटचं शिक्कामोर्तब नक्कीच होत असावं. राजा, गुंडाईझम निपटून काढायला पोलीस असतात मग या 'हुंडा'इझमसाठी का नसावेत ? शेवटी सतीची चालही कायद्याचा बडगा दाखवल्याशिवाय बंद पडली नाही. हुंडा ही समस्या कोण्या एका विशिष्ट जाती-

धर्माची नसून सर्वच लोकांना तिनं भेडसावलं आहे. वरवर खाजगी वाटणाऱ्या, पण संपूर्ण समाजाला पोखरून काढणाऱ्या या समस्येबाबत सरकारने हस्तक्षेप करायलाच हवा. एखादं "ऑल इंडिया मॅरेज बोर्ड" वगैरे स्थापून लग्नातल्या अवास्तव खर्चावर नियंत्रण ठेवलं पाहिजे. कुठं जास्त भपकेबाजपणा दिसला की कायद्याचा दंडुका घेऊन सरकारी अधिकारी तिकडे वळलेच पाहिजेत. राजा विवाह व त्या अनुषंगानं उद्‌भवलेल्या हुंड्याच्या प्रथेबद्दल तुला काय वाटतं ? तो समूळ नष्ट करता येईल का ? या प्रश्नाचे उत्तर माहीत असूनही न दिल्यास तुला या लग्नाच्या हंगामात वधूपक्षाकडचा बनून, सर्वप्रकारचे अपमान, मानहानी सहन करून मरस्तोवर लग्नातली कामं उरकावी लागतील."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, नाण्याच्या दोन बाजूप्रमाणेच प्रत्येक समस्येलाही दोन बाजू असतात. ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांच्याकडे साहजिकच सहानुभूतीचा ओघ वळतो. अन् या भावनेच्या भरात सारासार विचार मागे पडतो. एखादा खेडूत पदरचे जास्त पैसे खर्च करून बाल्कनीचं तिकीट काढून चित्रपट बघतो, चित्रपट भले कितीही कंटाळवाणा असो, 'बाल्कनीत बसलोय' याच कल्पनेनं तो सुखावतोय. तद्वतच बरेच वधूपक्षाकडील लोक आपल्या मुलींना असं ऐपत नसतानाही पदरमोड करून 'बाल्कनीत' बसवतात. मग तिचा पुढील जीवनपट कितीहो दुर्दैवी घटनांनी भरलेला असो. बरेच लोक उघडपणे मुलाच्या 'वरच्या कमाईसंबंधी' माहिती काढूनच पोरगी द्यायचं निश्चित करतात. वधूपक्षातील लोकही याच समाजाचे घटक असल्यामुळे इथले सर्व भलेबुरे प्रकार त्यांना मान्य असतात. लग्न जुळवताना पैसा ही गोष्ट प्रधान असते. बाकी स्वभाव, विचार वगैरे महत्त्वाच्या गोष्टी त्या मानानं गौण ठरतात. म्हणूनच लग्नाच्या बाजारातला बी. ए. मुलगा 'टाकाऊ', एम्. बी. ए. 'कामचलाऊ' तर सी. ए. 'बिकाऊ' असतो. आपल्या ऐपतीप्रमाणे मग खरेदी चालते. बाजार या व्याख्येतील विक्रेता आणि गिऱ्हाईक हे दोन महत्त्वाचे घटक तयारच असतात. मग लग्नाचाही बाजार मांडला जातो. या बाजाराच्या निर्मितीला विकणारे आणि विकत घेणारे दोघंही कारणीभूत आहेत. म्हणून दोघंही समान दोषी आहेत. आज हुंड्यावर बोलणारे एकदम हृदयाला हात घालून रडवं-रडवं बोलतात. तर काही ठणाण बोंबा मारत एकदम जहाल मत मांडतात. त्यामुळे मूळ समस्येवर तोडगा निघत नाही. नुकताच कोर्टानं स्त्री-धनाबाबत दिलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. तसंच हुंडाबंदीचा कायदाही कागदोपत्री बऱ्याच वर्षांपासून अस्तित्वात आहे.

वेताळा, तुझ्या 'ऑल इंडिया मॅरेज बोर्ड'चे सरकारी अधिकारी विवाह सोहळ्यातील भपकेबाज पणाला पायबंद घालण्याऐवजी तो सोहळा 'याचि देही याचि डोळा' पाहून स्वतःच जायबंद होतील. लाचखोरीशी अति जवळचा संबंध

असल्यामुळे सरकारी अधिकारी नावाच्या प्राण्यानं सामान्य जनतेचा विश्वास केव्हाच गमावलेला आहे. हा विश्वास ज्या दिवशी ते संपादन करतील तेव्हाच कुठं तुझं ' ऑल इंडिया मॅरेज बोर्ड 'चे स्वप्न साकार होईल. तूर्त हा प्रश्न वधू–वर पक्षातील परस्पर सामंजस्यातूनच सुटू शकतो. तमा आदर्शवाद हा बऱ्याचजणांना तत्त्वत: मान्य असतो, पण प्रत्यक्ष कृती करायची वेळ आली की सोयीस्करपणे व्यवहाराला जवळ केलं जातं. म्हणूनच सद्सद्‌विवेक नुसताच जागृत न करता तो कार्यप्रवण कसा होईल इकडेच जास्त लक्ष दिलं पाहिजे. किर्लोस्करी मासिकात अधूनमधून अत्यल्प खर्चात, हुंडा न देता-घेता होणाऱ्या विवाहासंबंधी छापून येतं. निव्वळ हुंडाबळीच्या प्रकरणांना भडक प्रसिद्धी देण्यापेक्षा वर्तमानपत्रवाल्यांनीसुद्धा असल्या आदर्श विवाहांना यथोचित प्रसिद्धी द्यायला हवीच.

' संसारी असावे सुवर्ण ' असं जरी ब्रह्मचारीबुवा रामदासस्वामींनी म्हटलं असलं तरी आजकाल मात्र स्टेटस्‌च्या हव्यासापायी व सुखासिनतेकडे माणसांचा जरा जास्तच कल गेल्यामुळे बऱ्याच अनावश्यक गोष्टींचा हव्यास धरला जातो. त्यातूनच मग अवास्तव मागण्या व त्या पूर्ण न झाल्यास हुंडाबळीसारखी प्रकरणं उद्भवून माणसं रस्त्यावर येतात. या प्रकरणात सासू, नणंद वगैरे स्त्री प्रतिनिधी सुद्धा हिरीरीने भाग घेतात. खरंतर जनरेशन गॅपमुळे सासू-सुनेच्या वैचारिक बैठकीत फरक असणारच. त्याचप्रमाणे कायद्यानं जरी मुला–मुलींना मालमत्तेत समान हिस्सा जाहीर केला असला तरी हुंड्याच्या रूपानं लग्नात जे दिले जाते तोच तिचा हिस्सा समजतात. अशा या ना त्या रुपानं हुंडा सुरूच असतो. हल्ली ' न्यू वुमन 'वगैरे विचार धडाक्यानं पुढं येत आहेत. रामायणातील सीता ' त्वया सह वनमपि स्वर्ग: ' म्हणत सर्व सुखोपभोग लाथाडून रामामागे गेली होती, वगैरे पुराणातली ' पेरीशीबल वांगी ' या वुमनला पटत नाही. त्यामुळे प्रश्नाची गुंतागुंत अधिकच वाढते. त्यापेक्षा आयुष्यातले चढउतार, उन्हाळे–पावसाळे एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहाणाऱ्या, नियतीनं साधलेला समसमा संयोग असंच ज्याचं वर्णन करता येईल असल्या जोडप्यांचा आदर्श विवाहेच्छूंनी आपल्या डोळ्यांसमोर ठेवावा. अगदी सगळीकडेच काही अंध:कार नाही. आदर्शवादाचा चिमुकला दीप हातात घेऊन धीटपणे पावलं टाकत अंधारातही यशस्वीपणे मार्गक्रमण करत व इतरांनाही सन्मार्ग दाखवणारे अजूनही भेटतात. शेवटी हजारो मैलांचा प्रवास अशा एका लहानशा पावलानेच सुरू होतो. "

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व ' वधू–वर सूचक मंडळा 'च्या पाटीला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# २२.

## ❋ ब्युटी पार्लर ❋

चक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतातील वेताळ राजाला म्हणाला, 'राजा, असं बऱ्याच वेळा होतं की, जाऊ नये तिकडे माणसाचं लक्ष जातंच. त्यामुळे फॅशनच्या नावाखाली झटपट कपडे बदलणाऱ्या युवक–युवतींकडे लक्ष गेलंच. थंडी, वारा, ऊन, पाऊस यांपासून बचाव होण्यासाठी वस्त्र वापरण्याची गरज असते, हा झाला शालेय अभ्यासक्रमातील दृष्टीकोण.

वस्त्रप्रावरणाआड दडलेला 'गर्भित' अर्थ वेगळाच कुणीसं म्हटलंय की, पाश्चिमात्यांनी सर्व जगाला कपडे घालायला शिकवलं. आता तेच लोक कपडे काढायलाही शिकवत आहेत. नग्नता म्हणजेच जर फॅशन असेल तर जनावरं माणसांपेक्षा जास्त फॅशनेबल आहेत असेच म्हणावे लागेल. मनुष्य प्राण्यांमध्ये स्त्रियांच्या फॅशनला जरा जास्तच महत्त्व असते. गरीब बिचाऱ्या पुरुषांना फारसा स्कोप नाही. म्हणूनच पुरुष मंडळी 'फॅशनेबल वुमन ईज आलवेज इन लव्ह विथ हरसेल्फ' असं म्हणत हात चोळत बसतात. या फॅशनेबल वुमनमधल्या काही अतिरेकी बाया सारासार विचार न करता एकदम कृतीच करतात. नवऱ्यानं परमिटेड असा आदेश दिला की, लग्नापूर्वी विन बाह्याचा याने की 'स्लिव्हलेस' पोलकी, ब्लाऊज जे काय असेल ते कधीही न घालणाऱ्या सौभाग्यकांक्षिण्या

आमच्या ह्यांना आवडतं ' असं म्हणत आपले 'इस्टमनकलर' दंड मिरवत, गावभर भटकतात. अर्थात् आपल्याला काही त्रास नाही, पण शेवटी आपलीही नजरच आहे. थोडी वाकडी वळणारच. मग नजरेला काही खटकलं की असं मुखावाटे बाहेर येतं.

मेर्लीन मन्रोचं सौंदर्य तिला न पाहणाऱ्या तुझ्या-माझ्यासारख्यांनीही मान्य केले आहे आता हीच गोरी मडमीण मराठमोळचा नऊवारी साडीत व नथीत तितकीशी चांगली दिसेलच असं म्हणता येणार नाही. जातीच्या सुंदरीला काहीही चांगलं दिसत असलं तरी तिनं काहीही घालून पाहणाऱ्यांचा अंत पाहू नये. नाहीतरी शिरमंतांच्या मोठ्या बायाही कपडयांच्या बाबतीत 'अर्धपोटीच' राहतात. याउलट मोलमजूरी करणाऱ्या बाया आपल्या सच्छीद्र पदराखाली स्तनपानाचा अत्यावश्यक कार्यक्रम येणाऱ्या–जाणाऱ्यांच्या विषारी नजरा कशाबशा चुकवत कसोशीनं पार पाडतात. अन्न, वस्त्र, निवारा यातली वस्त्र ही महत्त्वाची गरजही यांच्या बाबतीत पूर्ण होत नाही. ज्यांची पूर्ण होते, अशातल्या बऱ्याचजणी अपूर्ण राहणंच पसंत करतात. या मनोवृत्तीसंबंधी एकानं खुलासा करत म्हटलंय, "ऑल वुमेन्स ड्रेसेस आर मिअरली व्हेरीएशन्स ऑन द एंटरनल स्ट्रगल बिटवीन द ॲडमिडेट डिसायर टू ड्रेस ॲन्ड अनअॅडमिटेड डिझायर टू अनड्रेस."

चिन्यांच्या 'वाकडया' पावलांवर पाऊले टाकून हिंदी भाईंनी सौंदर्यवान पावलांच्या हव्यासापायी स्त्रियांची पाऊले लाकडी ओंडक्यात अडकवली नाहीत. आपल्याकडचा पडदा हा प्रकार त्यामानानं सौम्यच. त्यातही बेपडदा होण्याचे चान्सेस असायचे. तरीही आपल्याकडच्या विदूषी चष्म्याआडच्या डोळ्यांमधून 'पुरुषप्रधान संस्कृती' म्हणत रागाने डोळे वटारतातच. एका विदुषीनं स्वत: स्त्री असूनही स्त्रियांवर तोंडसुख घेत म्हटलंय– "बायांनो, पुरुषी गुलामगिरीचं प्रतिक असणारं कुंकू पुसा, बांगडया फोडा, मंगळसूत्र फेकून द्या, अन् तुमचं वेगळं अस्तित्व सिद्ध करा. नथ नाकात साजीरवाणी, असं खुळेपणानं म्हणू नका. ही नथ नसून नाकातली वेसन आहे. हातातल्या त्या पाटल्याबिटल्या सब झूट. त्या तर पुरुषप्रधान संस्कृतीनं तुमच्या हातात अडकवलेल्या बेडया आहेत." ऐकतो आहेस न माझ्या राजा चक्रमादित्या ? काही काही तर डायरेक्ट ॲक्शन घेत, 'अश्लिल चित्रांची होळी' वगैरे साजरी करतात.

आमचा एक मित्र असल्या होळ्यांवर सख्त नाराज आहे. एखाद्या सैनिकाने प्राणपणानं इंच-इंच भूमी लढवावी, त्याच प्राणप्रियपणे आमच्या या मित्रानं तथाकथित अश्लिल पोस्टर्सनी इंच इंच भिंत लढवली आहे. भिंतीचा मूळ रंग ओळखू येणार नाही एवढे 'स्त्रियस्थ चित्रम्' त्याने आपल्या खोलीतील भिंतीवर लावले आहेत.

विविध रंगरूपाच्या, आकाराच्या, निरनिराळ्या पोजेसमधल्या त्या शे–पाचशे सुंदरींबरोबर हे ब्रह्मचारीबुवा सुखाने राहतातच कसे ते कळत नाही. या खटाटोपाचे प्रयोजन विचारलं तर ' लोकं फुलझाडं का लावतात ? ' असा प्रतिप्रश्न विचारून मला गप्प बसवलं

राजा, हल्ली फॅशनेबल कपड्यांची, सौंदर्यप्रसाधनांची, सौंदर्यानं तुडुंब वाहणारी दुकाने व या बाबतीत मार्गदर्शन करणारी ब्युटी पार्लर्स खूप निघालीत. अगदी परवाचीच गोष्ट. झांबुर्डेवाडी बुद्रुक असं विचित्र नाव धारण करणाऱ्या खेडेगावातील एस्. टी. स्टँडवर चहा पीत असतानाच समोर लक्ष गेलं अन् ' मैनाबाई साळुंके ब्युटी पार्लर ' असला नामफलक पाहून हातातली कपबशी खाली पडली. आतापर्यंत ' कंपोस्ट खते ', ' सुग्रास पशुखाद्य ' वगैरे ग्रामीण जाहिराती खूप पाहिल्या होत्या. या मैनाबाई साळुंकेच्या तमाशाचा फड असता तर नवल वाटलं नसतं, पण ब्युटी पार्लरचं फॅड झांबुर्डेवाडी बुद्रुकसारख्या भूगोलाच्या पुस्तकातही स्थान नसणाऱ्या गावात पाहून मैनाबाईबद्दल अभिमान वाटू लागला. आम्ही गावचे पाटील असतो तर असल्या पुरोगामी महिलेचा किमान साडी–चोळी देऊन गौरव तर नक्कीच केला असता. जाऊ द्या, मैनाबाईचं नशीब तेवढं थोर दिसत नाही. इकडे शहरात कान्होपात्रापासून तर क्लिओपात्रा पर्यंतच्या सर्व स्त्री पात्रांच्या नावाने ब्युटी पार्लर्स उघडलेली दिसतात. काही गजबजत्या मार्गांवर जसा जड वाहनांना प्रवेश बंद असतो तसाच बाप्येलोकांना या ब्युटी पार्लरच्या ब्युटीफूल मार्गावर प्रवेश बंद आहे त्यामुळे ब्युटी पार्लरमधील कार्यपद्धती या विषयावर न बोलता ' व्हाट इज ब्युटी ' हेच आपण पाहू.

राजा, अर्थशास्त्र, रसायन शास्त्राप्रमाणे सौंदर्यशास्त्र शाळा कॉलेजात शिकवले जात नाही. तसं असतं तर सौंदर्यशास्त्रावरील प्रश्नपत्रिकेत ' सोळा शृंगारांची नावे लिहा व प्रत्येकाचं थोडक्यात पण मुद्देसूदपणे कार्य विषद करा.' असले प्रश्न दिसले असते. आणि प्रात्यक्षिकांच्या ' व्हाय व्हा ' या अवघड प्रश्नामध्ये उत्तरापेक्षा ओठाच्या मोहक हलचालीवर मार्क्स अवलंबून राहिले असते. या विषयाचं मूळ शोधून काढायचं म्हटलं तर आपल्याला आदिमानवाच्या गुहेतच शिरावं लागेल. कदाचित आदिमानवीन बाईनं स्त्रीसुलभ हौसेनं टपोरं रानफूल स्वतःच्या केसात खोवलेले पाहून आदिमानवानं तोंडात दोन बोटं घालून पसंतीची शिट्टी वाजवली असेल, अन् परस्पर आकर्षणाच्या प्रकटीकरणाचा श्रीगणेशाही केला असावा. आदिमानवाच्या त्या शिट्टीनं पुढं प्रेमगीते, नाटक-सिनेमातील प्रेमळ डॉयलॉग, कथा-कादंबऱ्यातील गुलाबी–गुलाबी वाक्ये, काही विशिष्ट ठिकाणी 'वासू–सपना ' टाईप जोडीनं लिहिलेले लफडेबाज, सॉरी प्रेमी युगुलांची नावे

असली अनेक रूपे धारण केली आहेत. हे परस्पर आकर्षण दीर्घकाळ टिकून राहावं यासाठीच कपड्यांची फॅशन व ब्युटी पार्लरसारखी फॅड जन्माला येत असावीत. एकीकडे पुरोगामी महिला संघटना महिलांच्या बौद्धिक वाढीसाठी झटताहेत तर दुसरीकडे निव्वळ 'शो पीस' म्हणून मिरविणाऱ्या महिलाही दिसतात. क्वचितच एखादी जीन–जर्सीवाली मॉड छोकरी मॅथेमॅटीक्स ते कॉसमॅटीक्स सर्व विषयांवर सफाईने बोलते. आता कल्पना कर की, 'प्रेशरकुकर' या विषयावर बोलणाऱ्या गृहिणी एकदम पोलिसी कामकाजामध्ये राजकीय 'प्रेशर' किंवा 'ग्राइंडर' अन् मिक्सरचा वापर या विषयावर तासन्‌तास बोलणाऱ्या सखी शेजारण्या यु. एन्. ओ. अन् व्हेटोचा वापर असल्या भक्कम भक्कम विषयांवर बोलू लागल्या तर? मात्र स्त्रियांना प्रॉडक्ट समजणाऱ्या बाजारू प्रवृत्तीविरुद्ध त्यांनी बुद्धी वापरावी एवढी अपेक्षा करायला हरकत नाही. जाहिरातीतील स्त्रीला चेहऱ्यावरच्या मुरुमामुळे पुरुषप्रधान संस्कृतीतला कोणी एक पुरुष प्रतिनिधी झिडकारतो अन् मग मुरुम हटाव मोहीम हेच तिच्या आयुष्याचं अंतिम ध्येय दाखवलं जातं.

जाहिरातदार आपलं प्रॉडक्ट खपवण्याच्या नादात 'स्त्री' हे सुद्धा प्रॉडक्टच असा नकळत प्रचार करून जातो. त्यानं रंगवलेली केविलवाणी पुरुषाच्या मेहरनजरे-करिता दिनवाणी झालेली 'स्त्री' कुठल्याही स्वाभिमानी स्त्रीला पटणार नाही.

राजा, या प्रकाराला सर्वस्वी पुरुषच जबाबदार आहेत की स्त्रियाही? पुरुषांनी स्त्रियांच्या शारीरिक सौंदर्यावर भर देऊन हेतुपुरस्सर त्यांची बौद्धिक वाढ खुंटवली आहे व या पुरुषी मनोवृत्तीचा फायदा कापड विक्रेत्यांपासून सौंदर्य प्रसाधने ते ब्युटी पार्लरवाले पुरेपूर उचलत आहेत, असं तुला वाटतं का? या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू न दिल्यास शिक्षा म्हणून कलात्मकरित्या भुवया कोरणाऱ्या फॉरेन रिटर्न ब्युटी पार्लरवालीकडून तुझ्या या मस्त अक्कडबाज मिशा भादरून काढल्या जातील."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, नेपोलिअननं स्त्रिया या पुरुषांच्या मनोरंजनार्थ परमेश्वरानं पृथ्वीवर पाठवल्या आहेत, असं म्हणून समस्त पुरुषांना अडचणीत टाकलं आहे. आज नेपोलियन असता तर स्त्री–मुक्तीवाल्यांनी घेराव घालून त्याला पुन्हा एकदा वॉटरलूची आठवण करून दिली असती. मात्र इतिहास याची साक्ष देईल की, कर्तृत्ववान स्त्रियांना नेतृत्वपद बहाल करण्यात पुरुषांना कसलाही कमीपणा वाटला नाही पॉप्युलर झाशीच्या राणीपासून चांदबिबीपर्यंतच्या बऱ्याच जणींनी तलवारही फिरवली आहे. आजचं तर काही बोलायलाच नको. राकेश शर्मा पाठोपाठ उद्या एखादी रिकी शर्मा अंतराळातही जाईल. पुरुष मंडळींचा त्याला कसलाही आक्षेप राहणार नाही. उलट प्रोत्साहन

देतील. वेताळा, स्त्रियांच्या मासिकातील स्त्रियांनी नटणं, मुरडणं चांगलं का वाईट असल्या विषयांवरचे परिसंवाद तू वाचतोस की नाही ? मी तर आवडीने वाचतो. फारच मजेशीर चर्चा चाललेली असते. पण इथंही शेवटी एकवाक्यता आढळत नाही. मग पुरुषांवर दोषारोप केला जातो. अर्थात विकृत मनोवृत्तीचे नराधम पुरुषही काही कमी आढळत नाहीत. पण सगळ्यांनाच एकाच मापदंडात मोजणं बरोबर नव्हे. काही सौंदर्यदृष्टीची खास जपवणूक करणारे पुरुषही असतात. उदाहरणार्थ सौंदर्य आणि उपयुक्तता यांचा सुरेख मिलाफ घडवून आणणारा 'बिकनी' या 'महावस्त्रा'चा निर्माता रेअर्ड लुईस, पेशानं इंजिनिअर. ज्यानं मल्टी स्टेरिड बिल्डिंगच्या स्ट्रक्चरसंबंधी विचार करावा त्यानंच स्त्रीदेहाचं स्ट्रक्चर डोळ्यासमोर ठेवून बिकनीची निर्मिती करून स्त्री व पुरुष दोघांचेही लाख लाख दुवे घेतले आहेत गरज ही शोधाची जननी आहे असं म्हणतात. म्हणूनच आजच्या धावपळीच्या जगात वेणीफणीची नस्ती कटकट नको म्हणून बऱ्याच जणी बॉबकट अंगिकारतात. वाहन चालविणाऱ्या स्त्रियाही खूप झाल्यामुळे पोषाखांतील सुटसुटीतपणाही अपरिहार्य असतो. तो केवळ मॉडपणाच्या मॅडपणापायी आला आहे असं समजणं चुकीचं ठरेल. यात स्त्रियांचा दिखाऊपणा किंवा पुरुषी मनोवृत्ती हे दिसून येत नसून काळाची गरज हेच उत्तर द्यावं लागेल सौंदर्याची अन् ईश्वराची सांगड घालून मिल्टन म्हणतो, "मोर वुइ सी द ब्युटीफुल फेसेस, वुई रिअलाईज द गॉडस् ग्रॅन्ड डिझाइन ऑन द अर्थ" या 'दैवी' कामाला कापडविक्रेते, सौंदर्य प्रसाधनवाले व मुख्यत्वे करून ब्यूटी पार्लरवाल्या हातभार लावत आहेत. तेव्हा ब्युटी पार्लरकडे पाहून उगीचच नाक मुरडण्यात अर्थ नाही."

अशा प्रकारे राजाचे मौनभंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहिसा झाला व कोठल्याशा ब्युटी पार्लरच्या व्हेन्टीलेटरला लोंबकळून आतमध्ये डोकावून पाहू लागला.

□ □

# २३.

## ❋ माय मरो मावशी जगो ❋

चक्रमादित्यानं आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टॅंडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेला वेताळ राजाला म्हणाला, " राजा, फार फार वर्षांपूर्वी भारताला सर्वप्रथम व्हिजीट देणाऱ्या कोण्या चिनी महापंडिताने ' महाराष्ट्रातील लोक हे फार स्वाभिमानी आहेत, त्यांच्यावर अन्याय झाल्यास ते कोणाची गय करत नाहीत. ' हे वाक्य वाचून ग्रेट जोक म्हणत पोट धरधरून हसू लागलो. नुकतंच स्वाभिमानी मराठी लोकांचे राज्य गद्धेपंचविशीत आल्यापासून तर मऱ्हाटी अस्मिता उसळून वर यायच्या घाईला लागली आहे. अस्मिता या शब्दाला इतर भाषेत पर्यायी शब्द आहे की नाही हे आमची घोकॅबुलरी मूळातच कमी असल्याने माहीत नाही. ही पंचवीस वर्षांपासून मृतवत झालेली अस्मिता जागृत करण्यासाठी एखाद्या परदेशी दलालाने देशी दारूच्या दुकानाचे परमीट मिळवण्यासाठी मऱ्हाटी मंत्र्याकडे चिकाटीने चकरा माराव्यात, तसल्याच चिकाटीने आम्ही शिवप्रभूच्या पुतळ्याभोवती चकरा मारल्या. अवतीभोवती कोणी बिगर मराठी माणूस नाही याची खात्री पटल्यावर विचारले, " महाराज, अटकेपार झेंडे लावणाऱ्या तुम्हा पूर्वजांचे आम्ही वंशज. या मराठी राज्यातच तडीपार झाल्यासारखे चोरून का वावरतो आहोत ? " ' हू ईज रिस्पॉनसिबल फॉर धिस क्रिटीकल पोझीशन ? ' भावनावेश प्रबळ असला की इंग्रजीचा आधार घ्यावाच लागतो. ती मराठीके ' बस की बात ' किंवा ' कप ऑफ टी ' नाही. उत्तराच्या अपेक्षेने महाराजांकडे

पाहिले अन् तोच दूरदर्शनवाणी झाली, " माईंड वेल युवर लँग्वेज. "

खास महाराजांचेच उद्‌गार हे. स्वातंत्र्योत्तर काळात महाराजांचे स्टेट लेव्हल लीडरहून नॅशनल लेव्हलपर्यंत परमोशन झाल्यामुळे सरावाने इंग्रजी त्यांना येत असावं. महाराज आमच्याशी मोजकंच पण परिणामकारक बोलले. तसे महाराजांचे दप्तर डोळ्यांखालून घातल्यास महाराजांचा हा गुण प्रकर्षाने जाणवतो. आज शासकीय कामकाजात मराठीचा वापर करण्यासंबंधीचे 'सर्क्युलर' इंग्रजीत काढल्याचे पाहून मराठीयांची इज्जत वाचवणाऱ्या महाराजांची तीव्रतेने आठवण झाली व त्यांचे 'माईंड वेल युवर लॅंग्वेज' हे शब्द कानात घुमू लागले. राजा, 'चामुण्डराये करवियलेल्या' ज्ञानेश्वर माऊलीच्या 'अमृताते पैंजा जिंके' असल्या थोर थोर मराठी भाषेत 'माय मरो, मावशी जगो' अशी म्हण आहे. माय मराठीच्या दुर्दैवाने आज हीच म्हण तिच्यावरच बूमरँगसारखी उलटली आहे.

आम्हाला इंग्रजी मावशीच्या वाघिणीच्या दूधासमोर माय मराठीचे शेळीचे दूध बेचव वाटू लागलं आहे इंग्रजीच्या घुसखोरीमुळे राष्ट्रभाषा हिंदीसुद्धा 'अब मेरा कोण सहारा' असे केविलवाणेपणे म्हणत नॉर्थ साईडला घुटमळत आहे. कारण साऊथकडे तिच्यासाठी नो एन्ट्रीचे बोर्ड लागले आहेत संस्कृत आजीला तर डेड लॅंग्वेंज असे घाईघाईत घोषित करून तिचे क्रियाकर्मही आम्ही उरकून टाकले आहे. संस्कृत आजीच्या थडग्याशेजारी माय मराठीची कबर खोदण्याचे काम काही अतिउत्साही इंग्रजाळलेल्या लोकांनी हाती घेतले आहे. मग माय मराठीच्या कबरीवर हिअर शी लाईज अशा थाटाचा एपीताफ कोरला जाईल. व 'स्वकीयांनी धुडकावल्यामुळं जिला जिवंतपणीच पुरण्यात आलं अशी मराठी नामक दुर्दैवी भाषा इथे चिरनिद्रा घेत आहे.' असं त्यावर लिहिलं जाईल. मराठी माणूस सवयी-प्रमाणे सारे निमूटपणे पाहात राहील.

स्वातंत्र्योत्तर काळात इंग्रजीचे वर्चस्व कमी करण्यासाठी हिंदी राष्ट्रभाषा म्हणून जाहीर करण्यात आली. इतर अहिंदी भाषिकांपेक्षा मराठीयांनी हिंदीला फारच महत्त्व दिले. परिणामी मराठीचे महत्त्व कमी झाले. इतके की वर्षानुवर्षे महाराष्ट्रात राहणाऱ्या परप्रांतीयांना मराठी येतसुद्धा नाही, नव्हे तशी त्यांना कधी जरूरतच महसूस होत नाही. महाराष्ट्राच्या राजधानीत तर हिंदी-इंग्रजीच्या संयुक्त आक्रमणामुळे मराठी माणसं सोडल्यास बाकी सगळ्यांना 'अँट होम' असे असल्यासारखे वाटते. राष्ट्रीय एकात्मता जोपासायची म्हटलं तर थोडाफार त्याग करावाच लागेल. या समजुतीपायीच मराठी माणसांनी भाषिक व इतर अतिक्रमणे थोपवली नाहीत.

पण एवढा त्याग करून त्यांना काय मिळालं तर उपेक्षा, मानहानी, सर्वच क्षेत्रात पीछेहाट वगैरे. दाक्षिणात्यांसारखा कडवा प्रांतवाद किंवा कट्टर भाषाभिमान त्यांनी जोपासला असता तर कदाचित आजचं चित्र वेगळं असतं. हिंदीला अवास्तव महत्त्व दिल्यामुळे व त्या तुलनेने इंग्रजीकडे दुर्लक्ष केल्याने नोकरीधंद्यात मराठी माणूस मागे पडला याची जाणीव झाल्यानं मराठी माणूस द्विधा मनःस्थितीत सापडला आहे. एकीकडे तो मम्मी–डॅडी संस्कृतीची टर उडवतो तर दुसरीकडे पोरांनी लहानपणापासूनच कॉन्व्हेन्टमध्ये शिक्षण घेऊन 'फ्लूएन्ट' इंग्लिश बोलावं व परप्रांतियांशी कॉम्पीट करावे असेही त्याला वाटते.

एक मराठी माऊली आपल्या सखी शेजारणीला सांगत होती, 'वर्ष झालं बाई, पोरांना महागड्या इंग्रजी शाळेत टाकून. पण मेले अजूनही फाडफाड इंग्रजी बोलू शकत नाहीत.' अशा लोकांची समजूत असते की, एखाद्या फॅक्टरीत जसा कच्च्या मालाचा मशिनद्वारे पक्का माल बनून बाहेर येतो तद्वतच कॉन्व्हेन्टमध्ये पोरांना घातल्यास इंग्रजीत लवकर लवकर पक्के होऊन बाहेर पडावेत. घरीदारी, आजूबाजूला पोषक वातावरण नसल्यास बिच्चारी पोरं काय करणार ?

म्हणून आजचा मराठी माणूस म्हटलं की, कमरेला धोतर, अंगात कोट व गळ्यात टाय असले विचित्र चित्र डोळ्यासमोर येतं. चि. वि. जोगांपासून तर अत्र्यांपासून सर्व विनोदी लेखकांनी असल्या इंग्रजाळलेल्या लोकांची चांगलीच टर उडवली आहे. आपल्याकडला मराठीचा प्रोफेसरही 'मराठी बोलताना इंग्रजी वर्डस् यूज करण्याची हॅबीट फार डिटेस्टबल आहे' अशी विद्यार्थ्यांना 'वॉर्निंग' देतो तर त्याचे मराठी विद्यार्थी आपापसात या क्वेश्चनचा कितीही विचार केला तरी आयडिया काही विनअर होत नाही असे मराठी बोलतात. इंग्रज साहेबाची मर्जी व स्वतःची खुर्ची सांभाळण्याकरता धडपडणारे नेटीव्ह, 'ब्लन्डर मिस्टेक कमीट' वरून साहेबांचे मनोरंजन करत कोठल्याशा ऑफिसातल्या चपराशाला मोहरमचा वाघ बनून नाचायला जायचं होतं. त्याने विनंती अर्ज खरडला की, 'डिअर सर, अॅज आय वाँट टू बिकम ए टायगर टूमारो, काईंडली सॅक्शन मी वन डे सी. एल.' अंग्रेज साहेब डोके खाजवत बसला असेल.

इकडे स्वतंत्र भारतात एका कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याने लिहिलेला बदलीचा अर्ज सेन्सॉर संमत होण्यालायक नाही, बाईसाहेब पुण्यात नोकरीला होत्या अन् त्यांचे यजमान मुंबईला. म्हणून रिक्वेस्ट ट्रान्सफर खरडत बाईसाहेब लिहितात, 'सर, अॅज यू नो आय हॅवन्ट एनी हजबंड ईन पूना, काईंडली ट्रान्सफर मी टू बाँबे.' तिच्या वरच्या साहेबानं टॉप प्रायोरिटी ऐवजी टॉप सिक्रेट असा शेरा मारून फाईल कायमची बंद केली. आपल्याकडून अशा चुका होतात तशाच

मराठी बोलताना इंग्रजांकडूही होत. एका इंग्रज बहादूराला मराठीत भाषण द्यायची लहर आली होती. इंग्रज उशिरा आला. पाहतो तर लोक वाट पाहात ताटकळत उभे. विनयाने इंग्रजबहादूर म्हणाले, 'माझ्यामुळे विनाकारण आपणा सर्वांचा खोळंबा झाल्याचे पाहून मला किनई इश्श वाटतंय.' या पहिल्याच वाक्यावर साहेबानं हशा घेतला. बिच्चारा! त्याने हाऊ टू स्पीक मराठी या पुस्तकात इश्श म्हणजे लाज वाटल्यावर काढायचा उद्गार असलं वाचलं असावे. मात्र फक्त बायकांनीच विशिष्ट प्रसंगी योग्य व्यक्तीसमोर काढायचे हे उद्गार आहेत हे या बिचाऱ्याला कोण सांगणार? हल्ली स्त्रीवर्गानं सुद्धा असले सुंदर शब्द आपल्या मुखावाटे गेट आऊट केले आहेत तो भाग निराळा. मराठी मातृभाषा असणारा एकजण हिंदीत, इंग्रजी मिक्स करत आपल्या दुसऱ्या मराठी मित्राला कोण्या रामाबद्दल सांगत होता की, 'कल पिक्चर मे राम्याके साथ जो एक लेडीज थी नं उसकी पुरी हिस्ट्री मेरेको मालूम है.' त्या कोणा राम्याने एकच लेडी आणली होती की, लेडीज लोकांचा जनानखाना घेऊन तो सिनेमाला आला होता, हे कळायला मार्ग नाही. लेडी, हे एकवचन व लेडीज हे त्याचं अनेकवचन याचीच गल्लत केल्यामुळे एक लेडीज हा शब्दप्रयोग नेहमी कानावर पडतो. तसंच हिस्ट्री हा शब्द हिज स्टोरी या दोन शब्दांपासून बनला आहे. म्हणूनच कुठल्याच लेडीजची हिस्ट्री कोणालाच माहीत होऊ शकत नाही. कारण हिस्ट्री शब्द त्यांच्यासाठी वापरणे व्याकरणदृष्ट्या एकदम चूक.

राजा, १९५० साली घटना अस्तित्वात आल्यापासून पंधरा वर्षे इंग्रजीचा राज्य कारभारात वापर करण्याचे ठरले होते. पण आजही इंग्रजीचे वर्चस्व चालूच आहे. दाक्षिणात्यांच्या हिंदी डाऊन या आक्रमक भूमिकेपायी पंडित नेहरूंनाही माघार घ्यावी लागली. नैसर्गिक संकटं अकस्मात येतात पण मनुष्यनिर्मित संकटं स्वहित जोपासणाऱ्या कोत्या मनोवृत्तीतून येतात.

महाराष्ट्रानं स्वहितापेक्षा राष्ट्राच्या हितालाच नेहमी महत्त्व दिले आहे. एवढा समंजसपणा महाराष्ट्राशिवाय इतर कोणीही दाखविला नाही. याबाबतीत त्याचं कौतुक तर सोडाच पण सतत उपेक्षाच पदरी पडली. स्वतःच्या सोयीसाठी इंग्रजांनी मुंबईचे 'बॉम्बे' हे नामकरण केलं अन् साहेब मजकुरांचे उच्चारच बरोबर आहेत असे मानून तेच आम्ही जिभेवर खेळवत आहोत.

साधं इयत्ता पहिलीतलं 'आई कमळ बघ' मधलं 'कमळ' हा शब्द उच्चारणारा इंग्रज अजून जन्माला यायचा आहे. 'भारतीय इंग्रजांना' मात्र इंग्रजांसारखे उच्चार जमले नाहीत की, बोलायला ऑकवर्ड वाटते. श्रीमंता घरचं श्वानसुद्धा इंग्रजी ऑर्डरच फॉलो करतं. असल्या इंग्लिश मिडीयमवाल्या कुत्र्यांना

मालकाने डॉगफूड दाखवत सीट डाऊन म्हटले की, बूड उठवायचे एवढंच ठाऊक असतं. भाकरीच्या आशेने शेपूट हलवत ऊठ–बस करणारे चतुष्पाद प्राणी काय अन् चाकरी–भाकरी एवढ्याच गोष्टीचा विचार करणारे द्विपाद प्राणी काय दोघेही सारखेच. राजा, याबाबतीत तुला काय वाटतं ? भाषिक प्रश्नांचा गुंताडा सुटू शकेल काय ? 'माय मरो मावशी जगो' ही मराठी माणसाची भूमिका योग्य आहे का ? या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू न दिल्यास तुला माय मराठीची शानदार कबर खोलण्याचा होलसोल कॉन्ट्रॅक्ट दिला जाईल."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, खुद्द मराठी भाषेचे शिवाजी, निबंधमालाकार चिपळूणकर सतत इंग्रजीत बोलायचे पण तरीही सुबोध मराठीत लेखन करायचे. अत्र्यांनीसुद्धा 'लंडनहून आल्यापासून माझे मराठी सुधारले' असे म्हटले आहे.

रविंद्रनाथांच्या इंग्रजी गीतांजलीला नोबेल पारितोषिक मिळाले. पण तरी त्यांचं प्रेम होते ते बंगाली भाषेवरच. त्यामुळे परकीय भाषेच्या अध्ययनामुळे स्वभाषेवर वाईट परिणाम होईलच, असे म्हणता येणार नाही. शाईजीवी बाबू लोकांना पोटापुरती एखादी भाषा लागते. अशांना समृद्ध इंग्रजी वाङ्मयाशी, त्यातल्या विनोदाशी काही देणेघेणे नसते.

पहिल्या महायुद्धाच्यावेळी जर्मन्यांची सरशी होऊ लागली होती. तेव्हा या पोटभरू मंडळींनी इंग्रजीला लाथाडून जर्मन शिकायला सुरुवात केली होती. दुर्दैवाने असल्याच लोकांची संख्या आज वाढतेय. एका जपानी विद्यार्थ्याने बऱ्याच भारतीयांना 'तुम्हीसुद्धा आमच्यासारखेच स्वभाषेत शिक्षण का घेत नाही ?' असे विचारले, अन् बहुतेकांनी 'इंग्लिश ईज मस्ट' असे त्याला ऐकवून गप्प बसवले. स्वभाषेत शिक्षण देण्याकरिता शब्द अपुरे पडतात असे कारण सांगितले जाते. मग टाकसाळीतून नवी नाणी पाडावीत तसे नवे शब्द पाडायला सुरुवात होते. 'अपरीकाम्य', 'मृदसंधारण' हे सर्वसामान्यांना न कळणारे शब्द पाडले जातात. पाणिनीनं ज्यांच्या घरी पाणी भरावं असले थोर विद्वान सरकारला कुठं सापडतात, ते सरकारच जाणे. रुळलेले इंग्रजी शब्द जसेच्या तसे वापरावे. इंग्रजांनीसुद्धा आपले शब्द उचलले आहेत. उदा. खाकी, घेराव, बंदोबस्त, शॅम्पू हे सुरेख शब्द भारतीयच आहेत. अमेरिकन इंग्लिश ही ब्रिटीश इंग्लिशपेक्षा वेगळी आहे. मग इंडियन इंग्लिशही उच्चार, बोलण्याची पद्धत यात वेगळी असल्यास वावगे काय ? श्री, सर्वश्री यासारखे आदरार्थी संबोधन आपण भारतीय इंग्रजीत वापरतो. तसेच मौज या प्रकाराला थ्रेलिंग, सेरिमनी करून टाकले.

इंग्रजांवर नव्हे तर इंग्रजीवर असे बरेच अत्याचार आपण करून ठेवले आहे.

तरी इतर आशियाई विद्यार्थ्यांपेक्षा भारतीयांचे इंग्रजी निश्चितच चांगले असते. याच इंग्रजीच्या भरोशावर बुद्धीमान भारतीय इंग्लंड, अमेरिकेत स्थायिक झाले आहेत. त्यात महाराष्ट्रीयनही आहेत. तिथेही ते मराठी अस्मिता जोपासण्यासाठी महाराष्ट्र मंडळ स्थापन करून मराठी नाटक वगैरे बसवीत असतातच. तेव्हा मराठी माणूस मराठीलाच खड्डयात गाडायला उठला असे म्हणता येणार नाही. एवढ खरं की दाक्षिणात्यांना जेवढं त्यांच्या भाषेचं प्रेम असतं तेवढं मराठी माणसाला मराठीबद्दल वाटत नाही. हिंदी चित्रपटातल्या हिरोंनी कितीही अशक्य कोटीतल्या गोष्टी करून दाखवल्या तरी मराठी माणूस ते निमूटपणे पाहतो. पण तेच मराठी चित्रपटातील नायकांनी केलं की कपाळावर आठ्या चढवतो.

वेताळा, भाषेचा व लोकसंख्येचा प्रश्न स्वातंत्र्योत्तर काळात तडकाफडकी सोडवता आला असता पण अचूक निर्णय क्षमतेच्या अभावी या दोन्ही प्रश्नांनी आज विराट स्वरूप धारण केलंय. त्यातच थ्री लॅंग्वेजिजम म्हणजेच तीन भाषांचा पर्याय समोर मांडला जातो. त्यापेक्षा कार्यक्षेत्रानुसार भाषेचे शिक्षण द्यावे. अगदी सरसकटच सर्वांवर इंग्रजी लादू नये. ज्यांना खरोखरच उच्च शिक्षण घ्यावयाचे अशांनीच केवळ इंग्रजी शिकावी.

एरीनर झेलिएट या अमेरिकन महिलेला मराठी शिकायचे होते. तिने चक्क पुण्यात मुक्काम ठोकला व अल्पावधीत मराठी आत्मसात केली. आपल्या सरकारनेही बुद्धीमान विद्यार्थ्यांना विदेशातच विदेशी भाषा शिकण्याची सोय करावी. आपल्याकडली कोठलीही भाषा शिकण्याची पद्धत सदोष आहे. व्याकरणाच्या पुस्तकातून भाषा शिकता येत नाही. ती लोकांमध्ये राहूनच अधिक चांगली शिकता येते. राकेश शर्मा या अंतराळवीराने याच पद्धतीने रशियन भाषा आत्मसात केली. शाहीर दादा कोंडके यांचं शालेय जीवनापासून इंग्रजीशी वाकडं तर मराठीशी लफडं होतं. या शाहीरानंही आपल्या क्षेत्रात दादागिरी निर्माण केली. गुजराथी व्यापारी मंडळीसुद्धा हुंड्यांचा व्यवहार गुजराथीत करण्यास पसंत करतात. इंग्रजीशिवाय अडत नसल्यास इंग्रजी वापरू नये. प्रत्येक राज्य सरकारने स्वभाषेतच राज्याचा कारभार पाहणे हितावह होईल. केन्द्रीय स्तरावर हिंदी आहेच. आंतरराष्ट्रीय स्तरावर इंग्रजीचा वापर अपरिहार्य ठरेल. मराठी माणसेच काय सर्वच भारतीयांनी आपले कार्यक्षेत्र व बौद्धिक आवाका पाहून भाषेची निवड करावी."

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच प्रेतातील वेताळ प्रेतासहीत नाहिसा झाला व 'इंग्लिश ट्युशन क्लासेस'च्या बोर्डाला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

# २४.

## ❋ थँक्यू मिस्टर गॉड ❋

चक्रमादित्यानं आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बस स्टँडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतात असलेला वेताळ राजाला म्हणाला, "राजा, आज मला तुझ्याशी कुणाच्या अध्यात न मध्यात असणाऱ्या 'अध्यात्म' या गुळमुळीत विषयावर बोलायचंय.

असं म्हणतात की पंचमहाभूतांना प्रसन्न करण्यासाठी अप्रगत मानवानं त्याची उपासना चालवली होती वरुणराजा, अग्निदेवता, वायूदेवता असं देवांचं खातेवाटपही झालं होतं. आपल्या प्रमाणेच रोमन लोकांमध्येही 'सर्टन' गॉड ऑफ ॲग्रिकल्चर वगैरे प्रकार आहेत. अप्रगत मानवांचे देवही अप्रगत अवस्थेतच होते. देवांना आळवण्याच्या पद्धती प्राथमिक अवस्थेतच होत्या. नैसर्गिक आपत्तीपासून रक्षण करणारा 'रक्षणकर्ता' असंच देव या संकल्पनेबद्दल त्यांचं मत होतं. आपली कल्पनाशक्ती व आजूबाजूला उपलब्ध असलेली साधनसामुग्री यांचा मेळ बसवून या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यात येई. मनुष्य प्राण्याचं सर्व संकटातून निवारण करणारी सर्वशक्तीमान अशी एक गूढ, अदृश्य शक्ती नक्कीच या विश्वात वसते आहे ही कल्पना बहुतेक मनुष्य प्राण्यांना पटली असल्यामुळे 'देव' या विचाराला त्यांनी उचलून धरलं. मग या देवाचा शोध सुरू झाला. त्याच्या अस्तित्वाविषयी, सगुण–निर्गुणपणाविषयी, उलटसुलट बोललं जाऊ लागलं. इतर कोणत्याही विषयावर एवढा उहापोह झाला नसेल की जेवढा देवाचं अस्तित्व या विषयावर झाला आहे. अजूनही चालूच आहे. तो कधी संपेल

तेही सांगता येणार नाही. खुद्द सॉक्रेटिसनं याबाबत ‘ आय नो वन थिंग, धिस आय नो नथींग ’ अशी असमर्थता प्रगट केली आहे. तर एकाने देवांची व्याख्या ‘ ज्याच्या अस्तित्वाविषयी मनुष्यप्राणी साशंक आहे. ’ अशी केली आहे. कोण्या एकानं ‘ फॉर दोज हू बिलिव्ह इन गॉड नो एक्सप्लनेशन इज नीडेड अ‍ॅन्ड फॉर दोज हू डू नॉट विलिव्ह इन गॉड नो एक्सप्लनेशन इज पॉसीबल ’ असं म्हणून या विषयाला पूर्णविराम द्यायचा प्रयत्न केलाय. पण हा विषय काही सहजासहजी संपण्यालायक नाही. यातून धर्म, शास्त्र, नीती वगैरे विचार उदयाला आलेत. विवेकानंदांसारखा सच्चा धर्माभिमानी धर्म म्हणजे ‘ मनुष्यातल्या देवत्वाचं प्रकटीकरण ’ असं मानतो. तर ज्यांना निव्वळ स्वहीत जोपासायचं असले ‘ महापंडीत ’ कर्मकांडाला महत्त्व देतात. दुर्दैवानं बरेच अंधश्रद्धाळू या स्वार्थी पंडितांच्या जाळ्यात सापडले. मग धर्माचा विनभांडवली धंदा सुरू झाला.

राजा, पूर्वीचे ऋषी–मुनी लोक त्यामानाने फारच ‘ बॅकवर्ड ’ होते. अहर्निश ध्यानमग्न राहणं, एका पायावर उभं राहणं, अन्न-पाणी वर्ज्य करणं असले अघोरी तप करून देवाकडून आपल्या मागण्या मान्य करून घ्यायचे अरसिक तर एवढे की, देवाच्या दरबारातील सुंदर नाचनारीण काय अन् रानात काटक्या गोळा करायला आलेली भिल्लीण काय दोघींकडे एकाच नजरेने पाहायचे किंवा पाह्यचे देखील नाहीत. उगाच तपोभंग व्हायचा. त्यामानानं आजचे ऋषी–मुनी उर्फ ‘ गॉड मेन - एकदम फॉरवर्ड आहेत. भक्तगणांच्या आत्म्याच्या उन्नतीची ‘ सोल एजन्सी ’ भगवंतामे आपल्याला दिल्याचं सांगत सुटतात. काही अध्यात्मिक डीलर स्वतःच्या नावाआधी ‘ भगवान ’ शब्द वापरून परमेश्वराचे आपण एकमेव ‘ एजंट ’ असल्याच्या थाटात वावरतात. धनवान भक्त व सौंदर्यवान भक्तिणीच्या गराड्यात अध्यात्माचा कीस पाडतात. करोडोंची मालमत्ता जमवतात भौतिक सुखाला कंटाळलेल्या व ‘ पीस ऑफ माईंड ’ला आसुसलेल्या इंग्लंड–अमेरिकेतील भक्तांच्या मदतीला धावून जातात व शॅम्पेन सीप करत करत त्यांना ‘ हिंदू फिलॉसॉफी ’ समजावून देतात. मग हे फॉरीन भक्त ‘ लॅन्ड ऑफ रामा अ‍ॅन्ड कृष्णा ’ पाहायला नागवेवस्त्र सॉरी, भगवे वस्त्र घालून स्मोकिंग करत करत, मुखानं ‘ हरे राम, हरे कृष्ण ’ म्हणत धार्मिक, सांस्कृतिक प्रदूषण वाढवत इंडियात वाटेल तिथे हिंडतात. अन् ‘ पुअर इंडियन ’ ही विटंबना उघड्या डोळ्यानं पाहत बसतो.

रातोरात बांधलेली काही विशिष्ट देवांची पॉश देवळंही तो विस्मयानं पाहत बसतो. एरवी जुन्या मंदिराचा जीर्णोद्धार करायचा म्हटलं तर वर्षानुवर्षे पैशाअभावी तो होत नाही. पण या नवश्रीमंतांचे देव मात्र पटकन् ओनरशीपच्या देवळात राहायला जातात. अशा देवळांचे विश्वस्त नेहमी एकमेकांवर अविश्वास

दाखवत असतात. देवाला येणाऱ्या दक्षिणेच्या लाखो रुपयांवरही त्यांची वाईट नजर असतेच. त्यासाठी हमरीतुमरीवर येतात. भांडणं चव्हाटयावर आणतात. एवढं सगळं होऊनही भक्तांच्या संख्येत मात्र घट होत नाही. ती वाढतच जाते. श्रद्धेपोटी किंवा भावनेपोटीच श्रीमंत लोक देवांच्या हातात नोटा कोंबत असतील असं वाटत नाही. काहीतरी मोबदला मिळत असल्याशिवाय ही मंडळी पैसा खर्चतच नाहीत. श्रद्धा, भावना वगैरे गोष्टी ज्यांचे खिसे रिकामे असतात, अशांसाठीच ठीक. बरीच डोकेबाज मंडळी जनसामान्यांच्या भावनेचा स्वत:करिता फायदा करून घेतात. एखाद्या ठिकाणी रस्ता बांधणीचे किंवा इतर सरकारी बांधकाम निघालं की हे मतलबी लोक मध्येच दगडाला शेंदूर फासून दगड आडवा ठेवतील किंवा विशिष्ट रंगाचा झेंडा फडकावतील. तो दगड, झेंडा वगैरे निरुपद्रवी वस्तु सरकारला हलवणं कठीण जातं. कारण 'भावना दुखावण्याचा' प्रसंग उद्‌भवू शकेल आपल्या सरकारला विषारी वायूनं किंवा अतिरेक्यांच्या हल्ल्याला माणसं बळी पडली तरी काही वाटत नाही पण कोणी गुरकावून "आमच्या भावना दुखावतात" असले शब्द मुखावाटे काढले की, दरदरून घाम फुटतो. सरकारी विकास कार्यात अडथळे निर्माण करून मग स्वत:च्या फायद्याकरिता दंगली घडवून आणतात. त्यात निरपराधी माणसंच मारली जातात. म्हणूनच न्या. एम. सी. छगला म्हणतात की, "मानवतेच्या इतिहासात धर्मांनी चांगलं काही करण्यापेक्षा वाईटच जास्त करून ठेवलं आहे."

गाडगे महाराजांसारख्या संतांनी अंध:श्रद्धा निर्मूलनासाठी आयुष्य वेचलं. पण अजूनही बळी म्हणून बोकड कापण्याचे प्रकार सर्रास चालतात. सरकार या बाबतीत काही करेल म्हणून आशेनं पाहावं तर सर्वात अंधश्रद्ध व जात्यंध मंडळी या राजकारणी लोकांमध्येच दिसतात. आजचा युवक नास्तिक आहे म्हणावं तर पूर्वीपेक्षा आजच्या युवकांमध्येच तऱ्हेतऱ्हेच्या अंगठ्या, ताईत, गंडे-दोरे वापरण्याचं प्रस्थ फार दिसतं. परीक्षा जवळ आली की त्यांची पावलं आपोआपच पंढरीची वाट चालू लागतात

आपला हिंदी सिनेमाचा हिरोही हिरॉईनला आवळून आवळून कंटाळला की, शेवटच्या रिळात देवाला आळवतो व ठराविक साच्याचं स्वगत म्हणत जसं...' भगवान, मैंने आज तक तुझसे कुछ नही मांगा, लेकीन आज...' इथं तो लांब सुस्कारा टाकून आपली 'दर्दभरी' दास्ता भगवंताला सुनावतो. मग त्याच्या आजारी आईला देव वाचवतो किंवा आंधळ्या बापाला दृष्टी देतो. असली अंध दृश्ये पाहून आठ-आठ तास उभं राहून अतिनाजूक ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टर मंडळींना काय वाटत असेल ?

राजा, पूर्वी सुखाची कल्पना 'उदंड झाले पाणी, स्नानसंध्या कराया'

इतपत सिमित होती, परकीयांची आक्रमणे होत असल्यामुळे 'धर्म बुडेल' ही भीतीही होती. स्वधर्म टिकविण्यासाठी व परकीयांची आक्रमणे परतवण्यासाठी संत मंडळी कवनं, पोवाडे, भजन, कीर्तन करीत चहुकडे हिंडली. आज अशी गरज नसतानाही काही अतिरेकी धर्माच्या नावाखाली निरपराध लोकांचे बळी घेत आहेत. राजा, देव, धर्म या गोष्टींची काही गरज आहे का ? तुला देवाचं अस्तित्व मान्य आहे काय ? या प्रश्नांची उत्तरं तू न दिल्यास तुला करोडपती गॉडमनची अध्यात्मावरील कंटाळवाणी पुस्तकं वाचावी लागतील. त्यांच्या महागड्या कॅसेटस विकत घेऊन ऐकाव्या लागतील."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा, क्षणभर देवाचं अस्तित्व जरी मान्य केलं नाही तरी नियती – नियती जिला आपण म्हणतो तिला मात्र विसरू शकत नाही. एखादी चक्ष्मिष्ट शाळा मास्तरीण विद्यार्थ्याला फळ्यावर गणित सोडवायचं फर्मान सोडते. तो विचारा आपल्या परीनं सोडवत असतो. मास्तरीण-बाई चेहरा निर्विकार ठेवतात. त्यामुळे आपण चूक का बरोबर हेही विद्यार्थ्यास कळू शकत नाही. शेवटी उत्तर चुकलं की, मागावून दणकन पाठीत गुद्दा मिळतो. ही नियती मास्तरीणसुद्धा माणसं आयुष्याचे गणित सोडवत असतात त्यावेळी कळत न कळत धपाटे मारते. तिचाही चेहरा निर्विकार असतो. तिच्या चेहऱ्या-वरचे भाव कळावेत म्हणून देवाला पाचारण केलं जातं. 'आला ताप की, देवा तू माझा बाप, गेला ताप की मी तुझा बाप' असं दुटप्पी धोरण देवाच्या बाबतीतही असतं. याबाबत ठगणारे, ठगवणारे व दोन्हींच्या भानगडीत न पडणारे 'तटस्थ' असे तीन प्रकारचे लोक असतात. तटस्थ राहणाऱ्यांनी तटस्थतेचे धोरण सोडून ठगणाऱ्यांना ठगवणाऱ्यांपासून परावृत्त केलं पाहिजे. 'देव' या शब्दाचा अर्थ त्यांना समजावून सांगितला पाहिजे. देव ही मानवाला सुचलेली सर्वात सुंदर कल्पना होय. या मूळ कल्पनेत मग आपल्या कल्पनाशक्तीप्रमाणे लोक फेरबदल करतात. देव सर्वसामान्यांपेक्षा काहीतरी वेगळा असावा म्हणून त्याला चार हात, दोन तोंडं महाकाय रूप वगैरे बहाल केलं जातं. तर काहींना मूर्तीत बंदिस्त करणं आवडत नाही. काही बुद्धीवाद्यांच्या मते देवानंच आपलं अस्तित्व सिद्ध करावं म्हणजे या वादावर शेवटचा पडदा पडेल. म्हणजे देवानं असं जाहीर करावं की, अमक्या अमक्या वेळी, या या चौकात उभा राहीन कोणाला काय ऑटोग्राफ, फोटोग्राफ वगैरे घ्यायचे असतील, शेकहॅन्ड वगैरे करायचा असेल, काही मागण्या, निवेदने वगैरे सादर करायची असतील त्यांनी भेटावे.

ते शक्य नाही. कारण बहुसंख्य मानवांनी उचलून धरलेली देव ही एक कल्पनाच आहे. म्हणून शेक्सपिअरचा किंग रिचर्ड ऐन लढाईच्या मैदानात 'गॉड

अँड अवर गुड कॉज फाईट अपॉन अवर साईड' असं सैन्याला सांगून त्यांचं मनोबल वाढवतो. शिवप्रभूचे मावळेही 'हर हर महादेव' म्हणत शत्रू पक्षावर तुटून पडत. शुभ कार्याला चालना देणारी गूढ शक्ती असं फारतर आपल्याला म्हणता येईल. प्रत्येक गोष्ट पुराव्यानिशी सप्रमाण सिद्ध करणं तसं अवघडच. जन्मदा आपल्या अपत्याला जन्मदात्याविषयी सांगते अन् त्याच्या नावापुढे जन्मदात्याचं नाव नोंदवलं जातं. इथे कुठेच पुराव्याचा संबंध येत नाही. परस्पर विश्वासावर चालतं. तसंच या विश्वाच्या जन्मदात्यावरही विश्वास ठेवावा.

एखाद्या म्हातारीला मदत केली की, 'तुझ्या रुपानं देवच भेटला रे बाबा', असे कौतुकोद्गार ऐकू येतात. प्रेक्षागृहात बसलेल्या कॉलेज कुमाराच्या बाजूला योगायोगाने एखादी कन्यका येऊन बसली की, 'थँक गॉड' हे शब्द उत्स्फूर्तपणे त्यांच्या तोंडून बाहेर पडतात. झिम्बाब्वे विरुद्धच्या सामन्यात पावणे दोनशे धावा काढून कपीलदेव देवासारखा धावून आला होता. तर मरणासन्न झालेल्या कुष्ठरोग्यांना बाबा आमटे, तपोवनाचे पटवर्धन ही देवमाणसं वाटतात. प्रत्येकालाच असा देव कुठेतरी भेटतच असतो एवढे मात्र खरे की, एरवी कुठल्याच विषयावर सहसा सहमत न होणाऱ्या मानव जातीचं 'देव' या विषयावर बऱ्याच मोठ्या प्रमाणात सहमत झालं आहे. 'देव' ही सुंदर कल्पना अनादिकालापासून जतन करून ठेवण्यात आली आहे. तिचं जतन पुढेही व्यवस्थित चालू द्यावं."

अशाप्रकारे राजाचे मौन भंग होताच, प्रेतातील वेताळ प्रेतासह नाहीसा झाला व भारतातल्या अध्यात्माला कंटाळून अमेरिकेत सेटल झालेल्या भगवानांचा जिथे पहिला आश्रम होता त्या उघड्या बोडक्या माळरानावरील एका झाडाला जाऊन लोंबकळू लागला.

□ □

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय. ठाणे
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २९८५ 39 B/८४
विषय बा. वा.

# २५.

## * दि एन्ड *

चक्रमादित्यानं आपला हट्ट सोडला नाही. तो खांबाजवळ गेला. प्रेत खांद्यावर काढून घेतले व नेहमीप्रमाणे मौन होऊन बसस्टँडकडे चालू लागला. त्यावेळी प्रेतातील वेताळ राजाला म्हणाला, " राजा, गेले चोवीस रविवार तुझी अन् माझी ही बडबड अखंड सुरू आहे. तसं पंचवीस आठवडे, सिल्व्हर ज्युबली म्हणजे अभिमानाची गोष्ट आहे. या पंचवीस आठवड्यांत निरनिराळ्या विषयांवर आपण बोललो. कधी फिल्माळलेल्या लोकांची टिंगल–टवाळी केली. तर कधी सरकारनंही चित्रपटनिर्मितीच्या क्षेत्रात दमदार पाऊल टाकावं असं बोललो. पेशंटच्या पोटात कात्री विसरून जाणाऱ्या डॉक्टर कात्रेंना फैलावर घेत, कॅपिटेशन फी नामक भयानक रोगावर उपचारही सुचविलेत. लहान मुलांना मार्गदर्शक बनणाऱ्या मोठ्यांचे कान पकडत मुलांनाही निव्वळ मार्क्सवादी बनून पुस्तकातले किडे होऊ नका असेही सुचविले. नांदेड येथील मारुतीच्या डोळ्यातून अश्रू का निघाले असावेत, याचं स्पष्टीकरण देत अंधश्रद्धेवर बोललो. तर एका रविवारी ज्योतिष्याचं भविष्य तपासून पाहिलं. मधूनच दादा कोंडकेंच्या लगळपगळ डबल मिनिंगवाल्या हाफ-पँटीला हात घालून खळबळ माजवली. तर बहुगुणी अमिताभनं इंग्रजी चित्रपटात काम करून सुखद धक्का दिला नाही म्हणून खंतही प्रकट केली. त्यासोबतच कुटुंबनियोजन, राष्ट्रीयकृत बँकेचे चालचलन असल्या रूक्ष विषयांवरही आपण प्रकाशझोत टाकला. नाणे टंचाईवर उपाय सुचविले. एका रविवारी तर चक्क दोन वर्षांची झाली असूनही अजून नाकातला शेंबूडही पुसता येत नाही असं चिडवत

अल्लड बालिकारूपी महापालिकेला वाकुल्याही दाखविल्या. जाहिरातबाजी व ड्रायव्हरबाबूंची शेरशायरी या निरुपद्रवी विषयावरही आपण छेडले. तर कधी कॉलेजमध्ये चक्कर टाकून त्यांवर चिंतन-बिंतन केलं. तर अतिरंगेलपणाचा आव आणून ब्युटीपार्लरच्या व्हेंटिलेटरवर लोंबकळून, डावा डोळा बारीक करून आतमध्ये डोकावूनही पाहिले. हुंडाबळीसारख्या ज्वलंत समस्येवर स्वखुशीने होणारे आदर्श विवाह व कायदेशीर मार्गाने चालणारे ऑल इंडिया मॅरेज बोर्ड हे दोन पर्याय सुचविलेत. मराठी अस्मिता जागरूक करण्यासाठी भाषेच्या प्रश्नांवरही बोललो. 'ईश्वराचे अस्तित्व' या मानवाच्या बुद्धिपलिकडल्या विषयावरही आपण बोललो. एकंदरीत सर्वच विषयांवर आपण तोंडसुख घेतलं. मी समस्या मांडायची व तू त्या समस्येवर तोडगा सुचवायचा. हे गेले पंचवीस आठवडे सुरूच आहे. मागे वळून पाहताना, या सर्व खटाटोपातनं निष्पन्न काय, असा विचार मनात येतो व परत विचारचक्र सुरू होतं.

राजा, आपण वर्तमानपत्रात सरकारी अधिकारी इकडे लक्ष देतील काय ? असल्या थाटाची पत्रं नेहमी वाचतो. कधी ड्रेनेज पाईप फुटल्याबद्दल, तर कधी वस्तीतले लाईट गेल्याबद्दल, तर कुठे मटका, वाढती गुंडागर्दी याविरुद्ध बिच्चारे पत्रलेखक पेनातली शाई व कागद खर्चत असतात. पण सरकारी अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावरील कडक इस्त्री काही त्यामुळे विस्कटत नाही. गरीब बिचारा सरकारी अधिकारी तुटपुंज्या चार आकडी पगारात व दिवसाकाठी मिळणाऱ्या अवघ्या शे-पाचशे रुपयांच्या चिरीमिरीवर किती काम करणार, अन् कुठं लक्ष देणार ? एकतर सरकारी अधिकाऱ्यांचे लक्ष, त्याच्या 'सहकारी' अधिकाऱ्यांच्या घरावर कितवा मजला चढलाय यावर केन्द्रित झालं असल्यामुळे सामान्य जनतेच्या तक्रारीसारख्या अतिसामान्य गोष्टींत त्याला रस नसतो. 'होप इज पुअर मॅन्स ब्रेड' त्याच वेड्या आशेनं हे पत्रलेखक सरकारला सूचना करतच असतात. कॅपिटेशन फीच्या गंभीर परिणामांबद्दल खडसावतात. पण भलेबुरे मार्ग अवसरून खोऱ्यानं पैसा ओढावा असं बऱ्याच पालकांना वाटत असल्यामुळे ते कॅपिटेशन फीला छुपा पाठिंबा देतात. मग आयुष्यात प्रत्येकवेळी गैरमार्ग स्वीकारलेले हे लोक एका अनामिक भीतीनं अंधश्रद्ध बनतात. निव्वळ हितसंबंध जोपासायचेच संस्कार झाले असल्यामुळे सर्वंकष विचार करण्याची यांची क्षमता राहत नाही. एखादा यात ढोंगी संस्कृतीचा मंत्री साधेपणे होणाऱ्या सामुहिक विवाहाचं निमंत्रण केवळ जनसंपर्क टिकून राहावा म्हणून स्वीकारतो. स्वतःच्या पोरा-पोरींचे लग्न मात्र भपकेबाजपणे साजरे करून लग्नातले फोटोही; 'पेप्रात' छापून आणतो. उक्ती आणि कृती यात अंतर ठेवल्यानंच सगळीकडे अविश्वासाचं वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे खरोखरच कोणी काही चांगले काम केल्यासही त्याच्याकडे

संशयानं पाहिलं जातं म्हणूनच चांगलं काही करायला व रुळलेला मार्ग सोडायला सहजासहजी कोणी तयार होत नाही.

राजा, वृत्तपत्रीय किंवा अन्य लेखन, चर्चासत्र, परिसंवाद, भाषणबाजीतून प्रश्न सुटू शकतील असं तुला वाटतं का ? ज्यांच्या हातात सत्ता आहे, साधनसामुग्री आहे ते लोकहितसंबंधांना बाधा येईल म्हणून जाणीवपूर्वक प्रश्नांकडे डोळेझाक करतात. असे असताना आपल्या, हातात काहीही नसून आपण जी बडबड गेली पंचवीस आठवडे केली, ती निरर्थक म्हणावी की कुठं सार्थकी लागली असं समजावं ? राजा, या प्रश्नांची उत्तरं माहीत असूनही तू न दिल्यास आतापर्यंतच्या शिक्षेतील सर्वांत जबर शिक्षा ऐकवतो अन् ती म्हणजे तुला संदीप भगाडे लिखीत वेताळ कथा पुन्हा वाचाव्या लागतील."

त्यावर चक्रमादित्य म्हणाला, "वेताळा जन्माला आलेलं मूल सर्वप्रथम रडून आपलं या जगातील अस्तित्व सिद्ध करतं. पुढील आयुष्यात त्याच्या कोणत्याही हक्कांची पायमल्ली झाल्यास चर्चा, लेखन, भाषण, कोर्टकचेऱ्या या अनेक रुपात त्याला आपलं अस्तित्व सिद्ध करावं लागतं. संघर्ष हा जीवनाचा आत्मा आहे. त्यामुळे अस्तित्वासाठी संघर्ष अपरिहार्य ठरतो. मालकाच्या मते गुलामाला व जमिनदारांच्या मते वेठबिगारांना वेगळं अस्तित्व नसतं. आज गुलामगिरी व वेठबिगारी मृतप्राय झाली आहे. ती अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी केलेल्या संघर्षातूनच. प्रगत राष्ट्रातील नागरिक याबाबतीत सतत जागरूक असतात. पाच दिवस सपाटून मेहनत करून दोन दिवस मौजमजा मारणं हा त्यांचा स्थायीभाव. भारतीयांचा स्थायीभाव सांगणं तसं अवघडच, कारण भारतीय म्हणून जगण्यापेक्षा कुठल्यातरी एका गटाचे घटक म्हणून आपण जगत असतो आजही जातीधर्मानुसार निरनिराळे समाज, संस्था, संघटना भारतात आहेत. त्यांची शैक्षणिक संस्था, देवस्थाने, मंगल कार्यालये, वसतीस्थानं वेगवेगळी असतात. एखाद्या अतिमहत्वाच्या प्रश्नावरही सर्वांनी मिळून सरकारशी विचारविनिमय करण्यापेक्षा गटागटाने चर्चा करतात त्यामुळे म्हणावा तसा प्रभाव पडत नाही. परस्परांवर विश्वास नसल्यामुळं हे असं होतं नुकताच एका पाहणीत भारतीय लोक हे जगातील सर्वांत चिंतातूर लोक आहेत असा निष्कर्ष काढण्यात आला. नैसर्गिक आपत्तींसोबत मानवनिर्मित आपत्तींनाही भारतीयांना तोंड द्यावं लागतं. आपण काथ्याकूट केलेल्या लोकसंख्या, भाषिक प्रश्न, नाणे टंचाई, महापालिका कारभार वगैरे मानवनिर्मित समस्या प्रगत राष्ट्रांमध्ये नाहीत. कारण त्या समस्यांवर त्यांना तोडगा सापडत आहे. आपलेकडेही परस्परांवर विश्वासून माणसं तोडगा सूचवू शकतील. त्यासाठी संवाद व सरतेशेवटी एकवाक्यता हवी. आगरकरांनी एके ठिकाणी म्हटले आहे की, 'शारीरिक श्रमापेक्षासुद्धा मानसिक श्रम करण्याचा



BVBK-0402985

माणसाला जात्याच कंटाळा आहे ' म्हणूनच 'बुद्धीवादी' मध्यमवर्ग निवडणुकीच्या, सुट्टीच्या दिवशी पिक्चर पाहतो, नाहीतर तो पत्ते कुटत बसतो. मतदानाचा पवित्र हक्क नाकारून हे लोक देशाच्या भवितव्याशी आपणाला कर्तव्य नाही असंच सुचवतात व आपलं अस्तित्वच नाकारतात. इंग्लंड अमेरिकेत मध्यम वर्गियांची मतं निर्णायक असतात. आपल्याकडे मध्यमवर्गीयांच्या निष्क्रियतेमुळे प्रश्नांचा गुंताडा वाढवणारे ढोंगी राजकारणी निवडून येतात राजकारणाचं क्षेत्र जरी गढूळ असलं तरी समाजसुधारणेच्या बाबतीत काहींच्या प्रयत्नांमुळे चांगले बदल झालेले दिसून येतील. आज बुरखाधारी स्त्रियासुद्धा धर्ममार्तंडांचे बुरखे फाडायला सिद्ध झाल्या आहेत. अजूनही एखादा प्रामाणिक सरकारी अधिकारी बलाढ्य अन् धनाढ्य बिल्डर्सशी दोन हात करतो. ही माणस परिस्थितीसमोर निमूटपणे मान न तुकवता परिस्थितीलाच वाकायला लावतात. बरेचदा अपयश पदरात पडतं

विजय तेंडूलकर म्हणतात की, 'सामान्य माणूस आपण लढाई हरणार हे माहीत असूनही बड्या धेंडांशी टक्कर देतो. अन् मला त्याची ही संघर्षात्मक भूमिका महत्त्वाची वाटते.' गांधीजींनीसुद्धा 'फाईट ईटसेल्फ ईज व्हिक्टरी' असं म्हटलं आहे. तेव्हा आपल्या दोघांच्या संवादातून काहीच निष्पन्न होणार नाही असं तू समजू नकोस. माझ्या खांद्यावर विश्वासाने मान टाकून, माझ्या विचारांना चालना दिलीस याबद्दल मी तुझा आभारी आहे. आता या आभारातून खरं म्हणजे तुझ्या भारातून मला मुक्त कर. तुझं ओझं वाहून माझे खांदे दुखायला लागलेत. तेव्हा आता मुकाट्यानं माझ्या खांद्यावरून खाली उतर. सवयीप्रमाणे आता इकडेतिकडे लोंबकळू नकोस. मी केलेल्या उपदेशाचं गाठोड पाठीशी मारून आयुष्यात यशस्वीपणे मार्गक्रमण कर. परत काही अडचण आल्यास माझा भरभक्कम खांदा तुझ्यासाठी आरक्षित म्हणून मी जाहीर करतो, माझ्या खांद्यावर बसण्याची तुला मुभा आहे. जा आता."

असं म्हणून राजाने प्रेतातील वेताळाला प्रेतासह खांद्यावरून खाली उतरवले सुपरमॅनसारखा कायापालट करत वेताळाने प्रेतातून निघून स्वतःला सामान्य माणसामध्ये 'कन्व्हर्ट' केलं व तो एकदम जनसामान्याच्या प्रवाहात सामील झाला. ते पाहून चक्रमादित्यानं कर्तव्यपूर्तीच्या आनंदाने आपले गेले पचवीस आठवडे अवघडलेले खांदे झटकले व खुशीतच तो बसस्टँडकडे चालू लागला.

बाल ... विभाग
का. क्र. ९९८५ 39.13|e
दिनांक 01.01